नामार्थदीपिका

या नावांची

प्राकृत आर्याबद्ध

विष्णुसहस्रनामांची व्याख्या

परशुरामपंत गोडबोले

यांनीं केली

ती

मुंबईंत

इंदुप्रकाश छापखान्यांत छापली.

शके १७८८

सन १८६६

श्री॥

श्रीगणेशायनमः ॥ अथश्रीमद्विष्णुसहस्रनामव्याख्या ॥

मंगलश्लोक अनुष्टुप्.

वंदूनि विष्णुचरणां विष्णुनामार्थदीपिका ॥
करितों तत्कृपें होऊ भक्तां आनंदवापिका ॥ १ ॥

उपक्रम आर्या.

वैशंपायन सांगे, राया जनमेजया श्रवणसक्ता ॥
दानकथा धर्मकथा, श्रीव्यासें शांतिपर्वीं ज्या उक्ता ॥ १ ॥
ऐकूनि धर्म सारे, भीष्ममुखें आणखी पवित्र कथा ॥
धर्म पुन्हां भीष्मातें, प्रश्न करी कीं धरोनि धर्मपथा ॥ २ ॥
लोकांस एक दैवत, कोण असे तें परायणहि एक ॥
कोणा स्तवोनि कोणा, अर्चुनि कल्याण पावती लोक ॥ ३ ॥
सर्वां धर्मांमध्यें, धर्म परम कोणता तुह्मां रुचतो ॥
कोणा जपोनि संसृति, बंधापासून जंतु हा सुटतो ॥ ४ ॥
भीष्म ह्मणे वा धर्मा, या कुरुवंशांत एक तूं धन्य ॥
प्रश्न स्वपरहितावह, करिशी नाहींच तुजअसा अन्य ॥ ५ ॥
जो देव जगत्प्रभु जो, अनंत विष्णू असें ज्या ह्मणती ॥
त्याला नामसहस्रें, स्तवितां दुःखांतुनी मनुज सुटती ॥ ६ ॥
यास्तव त्याच महेशा, पूजावें भक्तिनें सदा ध्यावें ॥
त्याचें यजन करावें, स्तवन करावें तयास वंदावें ॥ ७ ॥
जो विष्णु अनादिनिधन, जो लोकाध्यक्ष होउनी राहे ॥
ब्रह्मण्य कीर्त्तिवर्धन, धर्मज्ञहि लोकनाथ जो आहे ॥ ८ ॥
ज्यापासुनि भूतांचा, होतो विस्तार जो महद्भूत ॥
स्तवितां नित्य जयाला, नर होतो दुःखमुक्त परिपूत ॥ ९ ॥
सर्वां धर्मांमध्यें, हाच अधिक धर्म वाटतो मातें ॥
कीं अर्चावें भावें, स्तोत्रांनीं नित्य वासुदेवातें ॥ १० ॥

परम महत्तेजचि जो, परम महत्तप असें जया ह्मणती ॥
परम महद्ब्रह्मचि जो, परम परायण असें जया गाती ॥ ११ ॥
जो सर्वपवित्रांचें, पवित्र मंगलहि मंगलांचें जो ॥
दैवतहि देवतांचें, जो भूतांचा पिताहि अव्यय जो ॥ १२ ॥
होतात युगारंभीं, भूतें ज्यापासुनीच हीं सारीं ॥
स्थिति पावोनि युगांतीं, पुनरपि जाती जयांत माघारीं ॥ १३ ॥
त्याचि जगन्नाथाचें, विष्णूचें पापभीति वाराया ॥
प्रेमें नामसहस्र, श्रवण करीं मजकडूनि वा राया ॥ १४ ॥
जीं गुणसंबंधाचीं, जीं मुनिगीत प्रसिद्ध जीं नामें ॥
श्रीमद्विष्णूचीं तीं, सांगेन तुला विभूतिचीं धामें ॥ १५ ॥

या ग्रंथकर्त्याची उक्ति आर्या.

ऐसें बोलुनि भीष्में, कथिलीं नामें सहस्र जीं पूर्ण ॥
अर्थासह लिहितों मी, भाविक ठेवोत तीं मनीं तूर्ण ॥ १ ॥
टीकाकारानें जे, लिहिले जे अर्थ भाष्यकारानें ॥
त्यांच्या अनुरोधानें, लिहितों मी अर्थ त्या प्रकारानें ॥ २ ॥
नामांचे अर्थ गहन, ते या प्राकृतजनांस कळवाया ॥
प्राकृतभाषेनें मी, लिहितों त्यांचें सुचित्त वळवाया ॥ ३ ॥
जाणुनि अर्थातें जे, घेती हरिनाम त्यांस बहु सुकृत ॥
मिळतें या जन्मींचें, जन्मांतरचेंहि नासतें कुकृत ॥ ४ ॥
स्तोत्रें पुष्कळ असती, परि विष्णुप्रीतिकर असे हेंच ॥
वाचा आदरपूर्वक, आयुष्याचा घडो सफल वेंच ॥ ५ ॥

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
६	४	धातू उत्तम	धातुउत्तम	७५	१०	त्यापिति	व्यापिति
८	३	भूतां ते	भूतांतें	८३	२	लागि	लागीं
१०	१	पुरुषप्रत्न	पुरुषप्रयत्न	८४	२	धेतलें	घेतलें
१४	६	केविहो	केविहा	८५	१३	श्रृंगें	शृंगें
२०	२	महा द्युती	महाद्युति	८६	१	पुषार्थ	पुरुषार्थ
२२	११	किंबा	किंवा	८६	१२	भुनि	मुनि
६३	१४	वनमली	वनमाली	९२	३	सुरशात्र	सुरशात्रु
६४	६	ह्मनती	ह्मणती	९४	१८	रवास्य	स्वास्य
६४	१०	खडपरशु	खंडपरशु	९५	४	भारभृत	भारभृत्
७०	१२	छिन्न संशाय	छिन्नसंशाय	१०१	२०	नयास	तयास
७०	१३	होऊनी	होउनी	१०३	१४	दुस्वप्न	दुःस्वप्न
७२	१६	शूरजनश्वर	शूरजनेश्वर	१०६	९	पुष्याचा	पुष्पाचा
७५	१	वंदात्मक	वेदात्मक	११२	१४	ही	हीं

॥ श्रीगणेशायनमः ॥ सहस्रनामआर्याप्रारंभः ॥

जो विश्वरूप विश्व, स्थितिकर्ता विश्व ज्यांतचि निमालें[1] ॥
जो विश्वोत्पादकही प्रथम तया **विश्व** नाम हें झालें ॥ १ ॥
विश्वांत जो प्रवेशे, किंवा विश्व प्रवेश ज्यांत करी ॥
यास्तव तत्वज्ञ ह्मणति, तो आपण **विश्व** हेंच नाम धरी ॥ १ ॥
विश्व चराचर सारें, व्यापुनि निजशक्तिनेंचि जो राहे ॥
किंवा तेयांत[2] शिरतो, ह्मणुनि तया **विष्णु** नाम हें आहे ॥ २ ॥
ज्याच्या उद्देशानें, करितात वषट्क्रिया निगमधाम[3] ॥
जो मंत्ररूप साक्षात्, ह्मणुनि **वषट्कार** हें तया नाम ॥ ३ ॥
होती वषट्क्रिया[4] ज्या, यज्ञीं तो यज्ञ विष्णुरूप असे ॥
यास्तव कविजन ह्मणती, त्यास **वषट्कार** नाम योग्य दिसे ॥ ३ ॥
ज्यां[+] भूत[5]भवत्भावी, काल प्रभु[6] ह्मणुनियां करी प्रणती ॥
येणेंचि **भूतपूर्वक[7], भव्यभवत्प्रभु** असें तया ह्मणती ॥ ४ ॥
घेउनि रजोगुणातें, विरिंचिरूपें[8]चि सर्व भूतातें ॥
जो करितो ह्मणउनि कवि, ह्मणताताचि **भूतकृत्** असें त्यातें ॥ ५ ॥
किंवा तमोगुणातें, घेउनि भूतांस क्रांतितो[9] जो कीं ॥
रुद्राच्या रूपानें, ह्मणुनि ह्मणति **भूतकृत्** असें लोकीं ॥ ५ ॥
सत्वगुणाचा आश्रय, करून होऊनि जो रमाधाम[10] ॥

---

१ लय पावलें. २ विश्वांत. ३ वेदवेत्ते ब्राह्मण. ४ होमहवनादि कर्म. ५ भूत वर्तमानभविष्यद्रूपकाल. ६ हा आमचा प्रभु ह्मणून. ७ पूर्वक शब्द सोडून भूत भव्य भवत्प्रभु एवढें नाम समजावें. ८ ब्रह्मदेवाच्या रूपानें. ९ संहारितो. १० लक्ष्मीपाति विष्णुरूप.
+ ज्या ईश्वरास.

पाळी धरी जगातें, ह्मणुनि तया **भूतभृत्** असें नाम ॥ ६ ॥
होतो प्रपंचरूपें, किंवा सत्तात्मक स्वभावानें ॥
यास्तव **भाव** असें हें, नाम यथायोग्य घेतलें त्यानें ॥ ७ ॥
जो भूतांचा अंत, यामी ह्रद्देशीं[1] जया स्थान ॥
या अर्थाला घेउनि, **भूतात्मा** हें तयास अभिधान[+] ॥ ८ ॥
सकल चराचर भूतें, किंवा भूम्यादि भूतसंघ[2] महा ॥
त्याचें सर्जन[3] वर्धन, करितो ह्मणऊनि **भूतभावन** हा ॥ ९ ॥
ज्याचा पवित्र आत्मा, किंवा शुद्ध स्वयेंचि जो आत्मा[4] ॥
यास्तव मंत्रद्रष्टे, देतात तयास नाम **पूतात्मा** ॥ १० ॥
जो कार्यकारणाहुनि, भिन्न परम शुद्ध बुद्धही झाला ॥
जो नित्यमुक्त म्हणउनि, **परमात्मा** नाम हें दिलें त्याला ॥ ११ ॥
मुक्तांला परमगती, ज्या पावुनि न फिरती अशी प्रख्या ॥
याचमुळें **मुक्तानां, परमागति** अशिच जाहली आख्या[5] ॥ १२ ॥
व्यय म्हणजे नाश नसे जरा नसे मृत्युही नसे ज्याला ॥
नाहीं विकार म्हणउनि, **अव्यय** हें नाम जाहलें त्याला ॥ १३ ॥
पुरेंचि[*] नवद्वाराचें, वपु[7] हें त्यामाजि जो सुखें राहे ॥
कीं सर्वांचा पूर्वज जो त्याला **पुरुष** नाम हें आहे ॥ १४ ॥
व्यवधान[9]रहित साक्षात्, जो सर्वांलाहि पाहतो द्रष्टा[10] ॥
यास्तव त्याची आख्या[6], **साक्षी** ऐशीच जाहली स्पष्टा ॥ १५ ॥
क्षेत्र[11] शरीर तयाचा, जो जाणे आदि मध्यही अंत ॥
त्यांतिल सुखही जाणे, म्हणुनि **क्षेत्रज्ञ** म्हणति त्या संत ॥ १६ ॥

---

१ ह्रदयकमळ. + नाम. २ पंचमहाभूतें. ३ उत्पत्ति. ४ परमात्मा. ५ ज्यापरब्रह्मास. ६ नाम. *नगर ७ शरीर. ८कूटस्थ. ९मध्यें उपाधि नसून. १०पाहणारा ११क्षेत्र ह्मणजे शरीर,

क्षेत्रांत असूनि कधीं, क्षरणं[1] नसे न स्वरूप[2]बाधा या ॥
यास्तव **अक्षर** म्हणती, क्षेत्रज्ञाशीं अभेद दावाया ॥ १७ ॥
ज्ञा[3]नाक्षनिग्रहानें, जीवब्र[4]ह्मैक्यभावना योगें[4] ॥
तो हाच होय किंवा, तद्ग[5]म्य म्हणोनि नाम त्या **योग** ॥ १८ ॥
योगज्ञा ज्ञान्यांच्या, योगक्षेमासि जो स्वयें वाहे ॥
यास्तव तो **योगविदां, नेता** हें नाम पावला आहे ॥ १९ ॥
मायेचा जीवाचा, ईश्वर *कीं शासन स्वयें करितो ॥
त्यांचें[6] **प्रधानपुरुषे, श्वर** ऐसें नाम म्हणुनि तो धरितो ॥ २० ॥
देह नराचा मस्तक, सिंहाचा धरि अशा[7] शरीराला ॥
भक्त[8]प्रियार्थ, यास्तव, तो नामें **नारसिंहवपु** झाला ॥ २१ ॥
ज्याच्या वक्षः स्थानीं, साक्षात् श्री[9] नित्य जपुनियां राहे ॥
यास्तव त्या भगवंता, **श्रीमान्** हें नाम जाहलें आहे ॥ २२ ॥
उत्तम केश जयाचे, किंवा ह[10]रिहरविधीहि वश[11] ज्याला ॥
अथवा के[12]शिनिहंता, यास्तव **केशव** असें म्हणति त्याला ॥ २३ ॥
पुरुषांमध्यें उत्तम, उत्तम किंवा क्षराक्ष[13]राहून ॥
तो **पुरुषोत्तम** जाणा, व्हा धन्य तयास चित्त वाहून ॥ २४ ॥
सर्व अ[14]सत् सत् यांचा, ज्या पासुन होतसे भव[15]विराम ॥
जो सर्वरूप सर्व[16]ग, यास्तव त्या **सर्व** हें असे नाम ॥ २५ ॥

---

१ ऱ्हास. २ स्वरूपहानि. ३ ज्ञानेंद्रियनिग्रहानें. ४ जीवात्मा परमात्मा एकच आहे असें मानणें. ५ तादृशभावना योगानें प्राप्य. ६ मायाजीव यांचें. ७ नरसिंहात्मक. ८ प्रल्हादादि भक्त. ९ लक्ष्मी. १० ब्रह्माविष्णु महेश. ११ स्वाधीन. १२ केशिनामक मारणारा. १३ शरीर जीव यांहून. १४ मिथ्या सत्यरूप सर्व जग. १५ उत्पत्ति व नाश १६ व्यापक. * किंवा.

कल्पांतसमय येतां, जो सर्वांही प्रजांसि संहरितो ॥
होऊनि रुद्ररूपी, यास्तव तो **शर्व** नाम हें धरितो ॥ २६ ॥
त्रिगुणांचा मल ज्याला, न शिवे जो शुद्ध जो करी क्षेम[1] ॥
किंवा शिवादिकांचा, भेद नसे म्हणुनि यास **शिव** नाम ॥ २७ ।
ज्यास विकार नसे जो, पूर्ण सदा आप्तकाम अविनाशी ॥
नित्यस्थिर अचलहि जो, म्हणउनियां **स्थाणु** नाम हें त्याशी ॥२८
जीं पांच महाभूतें, भू जल आकाश तेज नित्यगती[2] ॥
त्या भूतांचा आदी, म्हणउनि **भूतादि** हा असें म्हणती ॥ २९ ॥
निधि म्हणजे प्रलयांतीं, त्रिजगाला ज्यामधें मिळे ठाव ॥
तो निधि अव्यय[3] म्हणउनि, **निधिअव्यय** जाहलें असें नाव ॥ ३०
जो नाश अधर्माचा, धर्माची स्थापना करायास ॥
संभवतो याजमुळें, **संभव** हें नाम योजिलें त्यास ॥ ३१ ॥
कर्मफळाचा दाता, देतो भोक्त्यांस[4] कर्मफलदान ॥
यास्तव **भावन** ऐसें, कविनीं दिधलें तयास अभिधान ॥ ३२ ॥
हा जो प्रपंच याचें, आपण होऊनियां अधिष्ठान[5] ॥
धारण पोषण करितो, यास्तव **भर्त्ता** असेंच अभिधान ॥ ३३ ॥
जन्म महाभूतांचें, ज्यापासुन जाहलें, प्रकृष्ट[6] भव ॥
अथवा ज्याचा, यास्तव, झालें हें नाम त्याजला **प्रभव** ॥ ३४ ॥
ज्याची स्वकीय अद्भुत, शक्ती सर्वक्रियांमधें[7] राहे ॥
यास्तव मुनिनीं त्याचें **प्रभु** ऐसें नाम गाइलें आहे ॥ ३५ ॥
आहे ऐश्वर्य जया, निरुपाधिक[8] जो धणी च जगताचा ॥

१ भक्तकल्याण. २ सदागतिवायु. ३ निधि असून अव्यय. ४ कर्मकर्त्यांस. ५ आश्रय स्थान. ६ ज्याचा भवजन्म उत्कृष्ट. ७ जगदुत्पत्यादिक. ८ साधननिरपेक्ष.

यास्तव ऋषिवदनांतुनि, **ईश्वर** ऐशीच जाहली[1] वाचा ॥ ३ ६ ॥
होतो[2] स्वयेंचि आपण, किंवा विश्वीं स्वतंत्र जो राहे ॥
यास्तव तया **स्वयंभू**, ऐसें अभिधान जाहलें आहे ॥ ३ ७ ॥
भक्तांला सुख देतो, यास्तव **शंभू** असें तया ह्मणती ॥
जो सुख मूर्ति तयाच्या पदां करावी सुखेच्छुनीं प्रणती ॥ ३ ८ ॥
सुत अदितिचा असे जो, विष्णुच रविमंडळांत जो राहे ॥
पुरुष हिरण्मयवपु जो, त्याला **आदित्य** नाम हें आहे ॥ ३ ९ ॥
किंवा अदिती ह्मणजे, पृथ्वी तीचा पती ह्मणति ज्याला ॥
यास्तव **आदित्य** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ३ ९ ॥
असतां एकचि आत्मा, भिन्नशरीरांत भिन्नसा झाला ॥
पात्रीं[3] आदित्य[4] तसा, ह्मणउनि **आदित्य** नाम हें त्याला ॥ ३ ९ ॥
पुष्कर[5] तुल्य जयाचें अक्षी[6] आनंदजनक जीवांला ॥
लावण्याचें द्योतक[7] ह्मणुनि ह्मणति **पुष्कराक्ष** मुनि त्याला ॥ ४ ० ॥
ऊर्जित[8] शब्द जयाचा, श्रुति[9]लक्षण पूज्य होय सर्वांस ॥
याकारणास्तव दिली, ऋषिनीं आख्या **महास्वन** तयास ॥ ४ १ ॥
नाहीं आदि जयाला, तैसें ज्या निधन नाम[10] नाश नसे ॥
याकारणा मुळें हें, नाम तयाला **अनादिनिधन** असे ॥ ४ २ ॥
शेषाद्यनंतरूपें, घेउनि जो सर्व विश्व धरितो कीं ॥
यास्तव त्या विष्णूला, **धाता** हें नाम जाहलें लोकीं ॥ ४ ३ ॥
जो सकलाकर्मांचा, कर्मफलाचाहि जो असे कर्ता ॥
यास्तव नाम **विधाता** झालें कीं तो असे जगद्धर्ता ॥ ४ ४ ॥

---

१ निघाली. २ संभवतो. ३ जलपूर्णपात्रांत. ४ सूर्य. ५ कमळ सदृश. ६ नेत्र. ७ सूचक. ८ श्रेष्ठ थोर. ९ वेदरूप. १० ह्मणजे.

भूम्यादिकधातूंहुनि उत्तम चिंद्धातु* वर्णिला आहे ॥
तद्रूप ह्मणुनि **धातू, उत्तम** ऐसेंच नाम तो लाहे ॥ ४५ ॥
धाता ह्मणजे ब्रह्मा, त्याहुनि उत्तम असें ह्मणति ज्याला ॥
ह्मणऊनि **धातूउत्तम,** ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ४५ ॥
शब्दादिक प्रमाणें, तीं ज्याला दाखवावया शक्त ॥
नाहिंत यास्तव झालें, नाम तया **अप्रमेय** हें व्यक्त ॥ ४६ ॥
जो ईश इंद्रियांचा, किंवा वश इंद्रियें जया असती ॥
यास्तव त्या क्षेत्रज्ञा, नाम **हृषीकेश** जाहलें ह्मणती ॥ ४७ ॥
ज्याच्या नाभिस्थानीं, त्रिजगत्कारण असें असे पद्म ॥
यास्तव कविनीं दिधलें, नाम तया **पद्मनाभ** सुखसद्म ॥ ४८ ॥
अमरांचा[1] प्रभु यास्तव, **अमरप्रभु** हें असे तया नाव ॥
यदनुग्रहें[2]चि इंद्र, स्वर्गाचा जाहला असे रावें[3] ॥ ४९ ॥
शून्यापासुनि[4] केलें, विश्व जयाचें विचित्र हें कर्म ॥
यास्तवचि **विश्वकर्मा,** नाम तया जाहलेंच सुखवर्म ॥ ५० ॥
हा मंत्र हा प्रजापति[5], किंवा मंता[6] नसेचि याहून ॥
यास्तव **मनु** नाम दिलें, कविनीं अर्थत्रयास लक्षून ॥ ५१ ॥
काष्ठासि सुतार तसा जो तासितसे[7] समस्त भूतांतें ॥
सर्वतीं[8] याजमुळें, **त्वष्टा** हें नाम जाहलें त्यातें ॥ ५२ ॥
मोठ्याहुनि जो मोठा, आकाशालाहि आवरण[9] ज्याचें ॥
त्या स्थूलत्वा लक्षुनि, झालें नाम **स्थविष्ठ** हें त्याचें ॥ ५३ ॥

---

* चैतन्यरूप जगत्कारण. १ देवांचा. २ ज्या परमेश्वराच्या कृपेनें. ३ धनी किंवा स्वामी. ४ अभावापासून, अव्यक्तापासून. ५ प्रजा उत्पन्न करणारा. ६ मानणारा, मान्य. ७ क्षीण करितसे. ८ प्रळयकाळीं. ९ आच्छादन.

स्थविर[1] पुराणत्वानें[2], तैसा जो ध्रुव[+] असे स्थिरत्वानें ॥
ऐशागुणद्वयानें, **स्थविरध्रुव** नाम घेतलें त्यानें ॥ ५४ ॥
मनआदि इंद्रियें अति, यत्नानेंही न पावती ज्याला ॥
वाणीची काय कथा, यास्तव **अग्राह्य** नाम हें त्याला ॥ ५५ ॥
भूतादि[3] सर्व काळीं, मध्यें एकस्वरूप जो राहे ॥
यास्तव तो परमात्मा, **शाश्वत** हें नाम पावला आहे ॥ ५६ ॥
सत्ता आनंद जिथे, राहे जो कर्ष[4] भूमिचा करितो ॥
वर्णाहि कृष्ण जयाचा, यास्तव तो **कृष्ण** नाम हें धरितो ॥ ५७ ॥
कर्षण भूचें करितो, कृष[5] सत्ता णें सुख ज्या मधें राहे ॥
वर्णाहि कृष्ण जयाचा, यास्तव त्या **कृष्ण** नाम हें आहे ॥ ५७ ॥
ज्याचीं रक्तोत्पलसम, लोहित वर्णें अशीं असति अक्षी[6] ॥
त्या **लोहिताक्ष** ह्मणती, तोचि स्मरतांचि संकटीं रक्षी ॥ ५८ ॥
येतांचि प्रलयसमय, संहारितो जो समस्त भूतांतें ॥
ह्मणुनि **प्रतर्दन** असें अभिधान दिलें महर्षिनीं त्यातें ॥ ५९ ॥
ज्ञानैश्वर्यादिक गुण, परिपूर्णत्वें जयामधें वसती ॥
ह्मणुनि **प्रभूत** ऐसें, नाम तया गुण तसे दुज्या[7] नसती ॥ ६० ॥
ऊर्ध्वाधोमध्य अशा, तीन दिशांचें हि जो सुखद धाम ॥
आहे ह्मणुनि **त्रिककुब्धाम** असें जाहलें तया नाम ॥ ६१ ॥
जो वेदात्मा आहे, आहे तैसाचि देवतात्मा जो ॥
स्मरणें पवित्र करितो, त्यालाच **पवित्र** नाम हें साजो ॥ ६२ ॥

---

१ ह्मातारा. २ जुनाटपणामुळें. + अचल. ३ भूत भविष्य वर्तमान. ४ आकर्षण. ५ कृष शब्दें सत्ता. ण शब्दें सुख समजावें. ६ नेत्रें. ७ ईश्वराहून अन्याला. ८ स्वर्ग. मृत्यु पाताळ ह्या तीन लोकांस तीन दिशा ह्मटलें.

जो अशुभातें नाशी, जो दे मंगलहि मंगलस्थान ॥
उत्कृष्ट मंगल ह्मणुनि, **मंगलपर** हें तयास अभिधान ॥ ६३ ॥
निजसत्तेनेंचि चरा, चर भूतांतें सलील वर्तवितो ॥
कीं तो भूतनियंता, यास्तव **ईशान** नाम हें धरितो ॥ ६४ ॥
जो प्राणांतें देतो, चेतेवितो खंडितोहि कालात्मा ॥
शोधी प्राणांतें जो, तो **प्राणद** नाम घेइ परमात्मा ॥ ६५ ॥
देउनियां प्राणांतें, प्राण्याला जो स्वयेंचि जीववितो ॥
मुख्य प्राणचि जो तो, क्षेत्रज्ञ **प्राण** नाम हें धरितो ॥ ६६ ॥
आहे वृद्ध अतिशयें, जो सर्वांचेंहि आदिकारण हा ॥
ह्मणुनि **ज्येष्ठ** असें हें, नाम तया कीं पुराणपुरुष महा ॥ ६७ ॥
ज्यासम अन्य न कोणी, सर्वांहूनि प्रशस्य जो आहे ॥
तो सर्वोत्तम भगवान् सर्वात्मा **श्रेष्ठ** नाम हें लाहे ॥ ६८ ॥
ब्रह्याचें रूप धरुनि जेणें ही निर्मिली प्रजा सारी ॥
तोच **प्रजापति** असें, नाम धरी कौतुकेंचि कंसारी ॥ ६९ ॥
अंड हिरण्मय ज्याच्या, गर्भांत वसे जिथें मिळे ठाव ॥
ब्रह्यालाही पूर्वी, त्यालाच **हिरण्यगर्भ** हें नांव ॥ ७० ॥
ज्याच्या गर्भांत अशी, मोठीहि यथावकाश भू राहे ॥
जो भूमीचें कारण, त्याला **भूगर्भ** नाम हें आहे ॥ ७१ ॥
लक्ष्मीचा पति जो ती, ज्याच्या संनिध सदा करी वसती ॥
किंवा मायापति जो, यास्तव **माधव** असें तया ह्मणती ॥ ७२ ॥

१ सहज. २ सचेतन करितो. ३ नाशितो. ४ शुद्ध करितो. ५ कारण कीं. ६ श्रेष्ठ ७ कृष्ण. ८ अडचण न होतां. ९ पृथ्वी. १०आदिकारण.

जेणें कर्णमलोद्भव, मधुनामा दैत्य मारिला चक्रें ॥
यास्तव **मधुसूदन** हें, नाम तया ठेविलें समुनिशक्रें[1] ॥ ७३ ॥
सागर[2] शक्तीचा जो, किंवा शास्ता समस्त विश्वाचा ॥
यास्तव **ईश्वर** ऐशी, उद्भवली ऋषिमुखांतुनी वाचा[3] ॥ ७४ ॥
लोकोत्तर[4] शौर्य तसें, ऐश्वर्य अखंड ज्यामधें राहे ॥
यास्तव अभिधान तया, ऋषिसंमत **विक्रमी** असें आहे ॥ ७५ ॥
असति धनुर्धर बहु परि, ज्यासम कोणी नसेचि धन्वधर[5] ॥
त्याला **धन्वी** ह्मणती, ज्याचा धरिती मनांत देव दर[6] ॥ ७६ ॥
बहुत ग्रंथांचें अव, धारणसामर्थ्य होय ती मेधा[7] ॥
ती ज्यास असे यास्तव, **मेधावी** त्यास बोलिला वेधा[8] ॥ ७७ ॥
गरुडा सहाय घेउनि, किंवा असहाय ही त्रिलोकातें ॥
आक्रमितो यास्तव मुनि, जन देती नाम **विक्रम** तयातें ॥ ७८ ॥
जो क्रमितो त्रिजगातें, लीलेनें ह्मणुनियां **क्रम** तयातें ॥
नाम दिलें साधूंनीं, व्हावेंच हितेच्छुनीं विनत यातें ॥ ७९ ॥
ज्याहुनि उत्तम दुसरा, नाहीं कोणी नसे जया सम ही ॥
तोच **अनुत्तम** जाणा, जाणो ह्मणुनिच वरी[9] तयास मही ॥ ८० ॥
अतियत्नेंहि जयाचें, धर्षण[10] होणें अशक्य दैत्यांला ॥
कीं[11] अप्राप्य मनाला, ह्मणुनि **दुराधर्ष** नाम हें त्याला ॥ ८१ ॥
प्राण्यांचें सुकृत कुकृत, जो जाणे जो असोनि निष्काम ॥
भक्तार्पित अल्पहि घे, दे मोक्ष तया **कृतज्ञ** हें नाम ॥ ८२ ॥

---

१ मुनीसहित इंद्रानें. २ समुद्र. ३ वाणी. ४ लोकांत कोणास नाहीं असें. ५ धनुर्धर ६ भय. ७ बुद्धिविशेष. ८ ब्रह्मदेव. ९ पृथ्वी स्त्री झाली. १० धरणें. ११ किंवा.

पुरुषप्रत्न[१] सारे, किंवा हिंसा यदाश्रयें घडती ॥
कां कीं सर्वात्मक जो, ह्मणऊनि तयास **कृति** असें वदती ॥ ८३ ॥
आधार आपणाला, जो आपण होय जो स्वमाहिम्यांत ॥
आहे प्रतिष्ठित[२] ह्मणुनि, नाम तया **आत्मवान्** असें ख्यात ॥ ८४ ॥
इंद्रादि देव ज्याची, पाळिति आज्ञा समस्त[३] विनयानें ॥
ईश सुरांचा यास्तव, नांवचि धरिलें **सुरेश** हि तयानें ॥ ८५ ॥
दीनांचें[४] दुःख हरी, करि जो संरक्षण प्रपन्नांचें[५] ॥
जीवांचें निर्भय जो, स्थान म्हणुनि **शरण** नाम हें त्याचें ॥ ८६ ॥
जीवांला सुखदाता, सुखमूर्ती जो सदा सुखीं राहे ॥
त्या आनंदघनाला, देवाला **शर्म** नाम हें आहे ॥ ८७ ॥
जो विश्वोत्पत्तीला, बीज[६] असे सकळ विश्व जो व्यालों[७] ॥
म्हणऊनि **विश्वरेता**, अभिधान[८] असें समर्पिलें[९] त्याला ॥ ८८ ॥
नानाविध प्रजा ज्या, त्यांचा ज्या पासुनी उपज[१०] झाला ॥
ह्मणुनि **प्रजाभव** असें, नाम तया योग्य विश्वजनकाला ॥ ८९ ॥
रवित प्रकाश जैसा, तैसा ज्यांत प्रकाश नित्य वसे ॥
आहे प्रकाशरूपी, ह्मणुनि **अहन्** नाम हें तयास असे ॥ ९० ॥
क्षणं[११] लव मुहूर्त इत्या, द्यवयव[११] ज्या माजि राहति अनेक ॥
जो कालात्मा यास्तव, **संवत्सर** नाम पावला एक ॥ ९१ ॥
दुर्धर[१२] भुजंग[१३] तैसा, जो देव धरावयास शक्य नसे ॥
जो विगतबंध ह्मणुनि, **व्याल** असें नाम त्यास योग्य असे ॥ ९२ ॥

---

१ सर्व व्यवहार. २ स्थित. ३ इंद्रादि समस्त देव. ४ दुःखितांचें. ५ शरणागतांचें. ६ कारण. ७ प्रसवला. ८ नाम. ९ ठेविलें. १० उद्भव. ११ क्षणलवादिकालावयव. १२ धरावयास अशक्य. १३ सर्प.

ब्रह्म खरें जग मिथ्या, ऐसा सदसद्विचारवंताला ॥
दावी प्रत्यय[1] ह्मणुनि, **प्रत्यय** हें नाम ठेविलें त्याला ॥ ९३ ॥
सर्वत्र दृष्टि ज्याची, दिसतो सर्वत्र जो प्रबुद्धाला[2] ॥
ह्मणऊनि **सर्वदर्शन**, ह्मणति कवी त्या जगन्निवासाला ॥ ९४ ॥
नच झाला नच होतो, नच होणार हि न ज्या विषम भाव ॥
कालत्रयीं अखंड, स्थिति ज्याची त्यास **अज** असें नांव ॥ ९५ ॥
सर्वांहि ईश्वरांचा[3], जो ईश्वर ज्यास ईश[4] अन्य नसे ॥
यास्तव **सर्वेश्वर** ही, आख्या[5] लोकत्रयीं प्रसिद्ध असे ॥ ९६ ॥
नाहीं ज्याला कर्ता, कीं जो आहेच नित्यनिष्पन्न[6] ॥
यास्तव **सिद्ध** असें हें अभिधान तयास होय उपपन्न[7] ॥ ९७ ॥
सर्वांलाहि निरतिशय, फलरूप ह्मणोनि **सिद्धि** हें नाम ॥
कविनीं दिधलें ज्याला, त्यालाचि भजोत नित्य फलकाम[8] ॥ ९८ ॥
अखिल ब्रह्मांडाचें, विश्वाचें कीं समस्त भूतांचें ॥
जो आदिकारण असे, यास्तव **सर्वादि** नाम हें त्याचें ॥ ९९ ॥
ज्याची निजस्वरूपा, पासुनियां च्युति[9] कदापि होतनसे ॥
त्या शाश्वतदेवाला, **अच्युत** हें नाम फार योग्य असे ॥ १०० ॥

॥ प्रथम शतक समाप्त ॥ एकंदर आर्या १०६

---

१ अनुभव. २ ज्ञान्याला. ३ ब्रह्मेंद्रादि प्रसिद्ध ईश्वर. ४ ज्याला दुसरा धनी नाहीं. ५ नाम. ६ स्वतःसिद्ध. ७ योग्य. ८ विशेष फलरूपी. ९ फलेच्छु. १० भ्रंश. नाश.

शतक २ रें.

जो वर्षे कामांतें, जो रक्षी भूस[1] वारिपासाव[2] ॥
यास्तव मुनिनीं दिधलें, त्यालागिं **वृषाकपी** असें नाव ॥ १ ॥
वृष[3] धर्म कपि[3] वराहहि, वर्षे कामास भूमिला पाळी ॥
या अर्थावरुनि **वृषा,कपि** ऐसें नाम घेइ वनमाळी[4] ॥ १ ॥
इतकाच येवढाहा, ऐसाच असें न मोजवे ज्याला ॥
म्हणऊनि **अमेयात्मा**, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ २ ॥
सर्वां योगांपासुनि, संबंधांपासुनीहि दूर वसे ॥
जो म्हणुनि **सर्व** पूर्वक[5], **योगविनिःसृत** तयास नाम असे ॥ ३ ॥
ज्यामाजि सर्व भूतें, राहति भूतांमधींहि जो राहे ॥
किंवा वसूंत[6] पावक, यास्तव **वसु** नाम हें तया आहे ॥ ४ ॥
मन सुप्रशस्त ज्याचें, रागद्वेषादिकीं कधीं न मळे ॥
तो **वसुमना** म्हणा मन, त्याचें भक्तांस भक्तिनेंचि वळे ॥ ५ ॥
सत्य ज्ञान अनंत, ब्रह्म असें वर्णितात वेद जया ॥
जो परमात्मा अवितथ, रूप म्हणुनि **सत्य** नाम होय तया ॥ ६ ॥
संताविषयीं साधू, जो किंवा सदसदात्मक जयाचें ॥
आहे स्वरूप म्हणउनि, **सत्य** असें नाम जाहलें त्याचें ॥ ६ ॥
जो एक सर्व भूतीं, ज्याचें मनही असे समान सदा ॥
त्यास **समात्मा** म्हणती, कीं जो रागादिकीं चळे[7] न कदा ॥ ७ ॥

---

१ पृथ्वीस. २ प्रलयोदकापासून. ३ धर्मरूपी वराह. ४ विष्णु. ५ पूर्वकशब्द सोडून सर्व योगविनिःसृत येवढें नाम समजावें. ६ अष्ट वसूंत अभिरूप. ७ विकार पावत नाहीं.

शास्त्राच्या सर्वांहीं, अर्थांहीं मात्र जो परिच्छिन्न[१] ॥
संमित त्यास म्हणावें **असंमित** हि वा[२] तयांहुनी[३] भिन्न ॥ ८ ॥
सर्वहि कालीं सर्वहि, देशीं ज्याला कधीं विकार नसे ॥
किंवा लक्ष्मीसह जो वर्ते त्या **सम** असेंचि नाम असे ॥ ९ ॥
स्मरतां स्तवितां पुजितां, जो दे भक्तांस सर्व फल भोग्य[४] ॥
अवितथ[५]संकल्पाला, **अमोघ** ऐसेंच नाम त्या योग्य ॥ १०
हृदयाख्य[६]पुंडरीकीं[६], माजि दिसे वा[२] करी तिथे वास ॥
जो त्यास **पुंडरीकाक्ष** असें वा[२] नाम कमलनेत्रास ॥ ११ ॥
विश्वांत धर्मलक्षण, कर्म जयाचें प्रसिद्धतर नांदे ॥
यास्तव **वृषकर्मा** हें, नाम तया कीं सुधर्म सुजनां दे ॥ १२ ॥
धर्मार्थ आकृतीतें[७], धरितो यावरुनि घ्या असा भाव ॥
नाशावया अधर्मा, त्यालाच **वृषाकृती** असें नांव ॥ १३ ॥
प्रळयीं प्रजा रडवितो, किंवा दुःखास पळवितो दूर ॥
त्याला **रुद्र** ह्मणति जो, वाहवि भक्तांवरी कृपापूर ॥ १४ ॥
असती शिरें बहु जया, सहस्रशीर्षा[८] असें श्रुती गाती ॥
यास्तव विश्वात्म्याला, नाम **बहुशिरा** असेंच मुनि देती ॥ १५ ॥
जो निजरूपीं सकला, भूतांचें धारण स्वयें करितो ॥
याचमुळें तो विश्वा, धार प्रभु **बभ्रु** नाम हें धरितो ॥ १६ ॥
मुख्यत्वें विश्वाच्या, उत्पत्तीचें असेच जो स्थान ॥
त्या आदिकारणाला, देती मुनि **विश्वयोनि** अभिधान ॥ १७ ॥

---

१ अमुक स्वरूप. २ अथवा. ३ संमिताहून भिन्न. ४ भोगायास योग्य फल देतो.
५ सत्य संकल्प असा. ६ हृदयकमळ. ७ रूपातें. ८ हजार मस्तकांचा.

शुचि[1] आणि श्रवणीयहि[2], ज्याचीं नामें प्रसिद्ध मुनि गाती ॥
त्याला **शुचिश्रवा** ही आख्या[3] तीणेंचिं[4] पातकें जाती ॥ १८ ॥
नाहीं मरण जयाला, कीं[5] देतो अतुल[6] अमृत[7] जीवाला ॥
अजरामर ह्मणति, जया श्रुति यास्तव **अमृत** नाम हें त्याला ॥ १९ ॥
शाश्वत[8] ऐसा स्थाणू[9], जो त्याला नाम **शाश्वतस्थाणू** ॥
ज्याचा पार न लागे, विधिलां[10] मग जीव केविं हो वाणू ॥ २० ॥
वर आरोह[11] जयाचा, आरोहण[12] ज्यावरील उत्तम तें ॥
कीं पुनरावृत्ति नसे, त्यास **वरारोह** नाम साधुमतें ॥ २१ ॥
ज्ञानमयाचि तप ज्याचें, ऐश्वर्याचा नसेचि ज्या तोटा ॥
त्याला **महातपा** हें, नाम जयाचा प्रताप बहु मोटा ॥ २२ ॥
सर्वत्र गति जयाची, व्यापक सर्वत्र कारणत्वानें[13] ॥
किंवा सर्वज्ञत्वें, **सर्वग** हें नाम घेतलें त्यानें ॥ २३ ॥
सर्वज्ञ असुनि भासे, सद्रूपें ह्मणुनि **सर्वविद्वान्** ॥
ऐसें नाम जयाला, झालें त्यालाच सर्व जन वानू ॥ २४ ॥
ज्याला पाहुनि सेनां[14], दैत्यांच्या दशदिशांकडे पळती ॥
यास्तव त्याला **विष्वक्सेन** असें नाम जाहलें ह्मणती ॥ २५ ॥
जो दंडी दुष्टाला, किंवा जन यांचिती[15] कुशलें[16] ज्याला ॥
यास्तव **जनार्दन** असें, साधूंनीं नाम ठेविलें त्याला ॥ २६ ॥

---

१ पवित्र. २ ऐकायास योग्य. ३ नाम. ४ त्या आख्येनें. ५ किंवा. ६ निरुपम. ७ मोक्ष ८ अविनाशी. ९ वृक्ष. १० ब्रह्मदेवाला. ११ मांडी. १२ पोहचणें. १३ कारणरूपानें. १४ सैन्यें. १५ प्रार्थिती. १६ कल्याण.

जो वेदरूप साक्षात्, किंवा जीवास देउनि ज्ञान ॥
अज्ञान घालवी जो, यास्तव त्या **वेद** हेंच अभिधान ॥ २७ ॥
जो वेदातें जाणे, वेदार्थातेंहि जो निगमधाम[1] ॥
यास्तव त्या वेदमया **वेदवित्** असेंचि जाहलें नाम ॥ २८ ॥
ज्ञानैश्वर्यादिक जीं, अंगें[2] परिपूर्ण असति तीं ज्याला ॥
किंवा व्यक्ति[3] नसे ज्या, यास्तव **अव्यंग** नाम हें त्याला ॥ २९ ॥
पार्षद[4] वेद जयाचे, कीं ज्याला वेद सर्वही स्तविती ॥
यास्तव मंत्रद्रष्टे, **वेदांग** असेंच त्याजला ह्मणती ॥ ३० ॥
सांदीपनिगुरुपाशीं, वेदार्थाचा स्वयें विचार करी ॥
लीलामानवतनु तो, **वेदवित्** असें पुन्हाहि नाम धरी ॥ ३१ ॥
ज्या घडल्या ज्या घडती, गोष्टी घडणार त्या जया दिसती ॥
त्या सर्वद्रष्ट्याला, आगमें[5]निगमज्ञ **कवि** असें ह्मणती ॥ ३२ ॥
जो लोकांचा स्वामी, अथवा प्रत्यक्ष[6] जो करी लोका ॥
लोकाध्यक्ष अशास्तव, झाला त्याला मनांत अवलोका ॥ ३३ ॥
इंद्रादिकदेवांचा, अध्यक्ष[7] ह्मणोनि तो **सुराध्यक्ष** ॥
स्वहितेच्छूंनीं[8] ध्यावें, सोडुनि अन्यास त्याकडे लक्ष ॥ ३४ ॥
धर्माधर्मातें फल, द्याया अनुरूप निपुण जो पाहे ॥
यास्तव धर्मात्म्याला, त्या **धर्माध्यक्ष** नाम हें आहे ॥ ३५ ॥
कृत[9] होय कार्यरूपें, कारणरूपेंहि जो अकृत[10] होय ॥
त्यास **कृताकृत** ह्मणती, सुटकेची[11] त्याविणें नसे सोय ॥ ३६ ॥

---

१ वेदस्थान. २ साधनें. ३ मूर्ति. ४ अनुचर. ५ वेदशास्त्रवेत्ते. ६ जो लोकांला साक्षात् पाहतो. ७ नायक. ८ लक्षलावून. ९ केलेला. १० न केलेला. ११ संसार बंधापासून सुटण्याची.

जो सृष्ट्यर्थ चतुर्धा[1], झाला एकाचि असोनि परमात्मा ॥
विधि दक्ष काळ जंतू, यास्तव ह्मणती तयास **चतुरात्मा** ॥ ३७ ॥
जो चार वासुदेवा[2], दिक सृष्ट्याद्यर्थ धरितसे मूर्ती ॥
त्यास **चतुर्व्यूह** असें, ह्मणती करि तोचि कामना पूर्ती ॥ ३८ ॥
मोठया चार धरी जो, दाढा पुरवावया स्वजनकाम ॥
यास्तव नृ[3]सिंहरूपा, त्यास **चतुर्दंष्ट्र** हें असे नाम ॥ ३९ ॥
धर्मा[4]र्थकाममोक्ष, प्रद ऐसे चार भुज जया असती ॥
तोच **चतुर्भुज** यत्करिं, दर[5]कंज[6]गदा[7]रि[8] हीं करिति वसती ॥ ४० ॥
श्यामादि सरस सुंदर, वर्णीनीं शोभतो महाविष्णू ॥
त्रैलोक्यसुंदरा त्या, ठेवियलें योग्य नामें **भ्राजिष्णू** ॥ ४१ ॥
भोजन ह्मणजे माया, कीं ती भोगावयास योग्य असे ॥
जो तद्रूप ह्मणउनी, **भोजन** हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ४२ ॥
मायाख्यभोजनाचा, घडतो उपभोग सर्वदा ज्याला ॥
यास्तव सूक्ष्मदर्शांनीं, **भोक्ता** हें नाम ठेविलें त्याला ॥ ४३ ॥
साहे न भक्तपीडा, ज्याला बोला तयास **असहिष्णू**[9] ॥
सहन हिरण्याक्षादिक, दैत्यांचें करि आशास्तव **सहिष्णू**[10] ॥ ४४ ॥
जगदुत्पत्तीआधीं, जो होय हिरण्यगर्भरूपानें ॥
या कारणामुळें **जग, दादिज** हें नाम घेतलें त्यानें ॥ ४५ ॥

---

१ ब्रह्मा, दक्षप्रजापति, यम आणि जीव ह्या चार स्वरूपांचा. २ वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध ह्या चार मूर्त्ति. ३ नरसिंहावतारांत. ४ धर्मादि चार पुरुषार्थ देणारे. ५ शंख. ६ कमळ. ७ गदा ८ चक्र हीं चार आयुधें. ज्याच्या हातांत राहतात. ९ संयोगपरत्वअसतांही छंदोनुरोधें नाम यांतील मकारास गुरुत्व कल्पूं नये. १० सहिष्णु किंवा असहिष्णु असा नाम विकल्प आहे. + चार प्रकारचा.

तम[1] जेंवि भास्कराला, न शिवे अघ[2] तेंवि ज्या पवित्राला ॥
ह्मणती अपहतपाप्मा[3], श्रुति ज्याला **अनघ** नाम हें त्याला ॥ ४६ ॥
ज्ञानैश्वर्यादिगुणीं, जिंकी जो या सदैव विश्वाला ॥
मूर्त[4] विजय भक्ताला, ह्मणुनि असे नाम **विजय** हें त्याला ॥ ४७ ॥
जो भूतांतें जिंकी, किंवा भूताधिक स्वभावानें ॥
जो हा राहे यास्तव, **जेता** हें नाम घेतलें त्यानें ॥ ४८ ॥
जो कार्यकारणात्मा, ज्याची विश्वीं असे अभिव्यक्ती[5] ॥
ह्मणऊनि **विश्वयोनी**, ऐसें अभिधान[6] त्याजला देती ॥ ४९ ॥
विश्वांत अवतराया, पुनःपुन्हा देहवास[7] आदरितो[8] ॥
यास्तव **पुनर्वसु** असें, नाम सदवतार देव तो धरितो ॥ ५० ॥
जो अनुज[9] सुरेंद्राचा, किंवा इंद्राहुनी अधिक झाला ॥
गोवर्धन उचलुनियां, ह्मणऊनि **उपेंद्र** नाम हें त्याला ॥ ५१ ॥
बटु[10]रूपानें गेला, बळिपाशीं याचना करायाला ॥
अथवा भजनीय सुरां, ह्मणउनियां नाम **वामन** तयाला ॥ ५२ ॥
वामन असतां देहें, वाढुनियां फार थोर जो झाला ॥
बळिचें दमन कराया, ह्मणुनि असे **प्रांशु** नाम हें त्याला ॥ ५३ ॥
भक्तांचा कल्पद्रुम, ज्याचें चेष्टित कधींहि मोघ[11] नसे ॥
त्या अवितथसंकल्पा, अभिधान **अमोघ** हें जनांत असे ॥ ५४ ॥
जो स्मरतां जो स्ताविता, पूत[12] करी पूजितांहि भक्तांला ॥
जो पावना[13]हि पावन, यास्तव **शुचि** नाम हें असे त्याला ॥ ५५ ॥

---

१ अंधकार. २ पातक. ३ निष्पाप. ४ देहधारी. ५ इंद्रियगोचरता. ६ नाम. ७ देहधारण. ८ स्वीकारतो. ९ धाकटा भाऊ. १० मुंज्या मुलगा. ११ निष्फल. १२ पवित्र. १३ पवित्रांला.

जो गोवर्धनगिरितें, उचली ऐसा प्रकृष्ट[1] बलशाली ॥
बलवंतास[2] बल ह्मणुनि, आख्यां[3] ऊर्जित अशी तया झाली ॥ ५६ ॥
इंद्राचा अवरज[4] परि, इंद्रातें जो अतिक्रमुनि राहे ॥
ज्ञानबलादिगुणांनीं, त्याला आव्हां[3] अतींद्र ही आहे ॥ ५७ ॥
निजभक्तांतें घेतो, अथवा प्रळयीं समस्त भूतांतें ॥
निजरूपांताचि घेतो, यास्तव संग्रह असें ह्मणति त्यातें ॥ ५८ ॥
सृष्टीचा कारण जो, किंवा आपणाचि सृज्य[5] जो झाला ॥
अथवा सर्जन करितो, याचमुळें सर्ग नाम हें त्याला ॥ ५९ ॥
जन्मादिक नसति जया, जो धरितो एकरूप आत्म्याचें ॥
जो निर्विकार यास्तव, नाम धृतात्मा असें असे त्याचें ॥ ६० ॥
स्वस्वाधिकारपदवी, वरि योजी जो प्रजांसि नियमानें ॥
बाह्येंद्रियदमनानें, ह्मणुनि नियम नाम घेतलें त्यानें ॥ ६१ ॥
जो सर्वांतर्यामी, जो नियमी[7] अंतरिंद्रियग्राम ॥
त्याला नाम असे यम, भक्तांचे पुरवितो सकल काम ॥ ६२ ॥
कल्याणार्थिजनाला, जाणायाचा सर्दर्थ तो हाच ॥
या हेतुनें मुनिजनीं, त्यास दिलें नाम वेद्य हें साच ॥ ६३ ॥
सकलाही विद्यांचें, वेतृत्व[9] यथातथा[10] असे ज्याला ॥
किंवा भवरोगाचा, वैद्य ह्मणुनि वैद्य नाम हें त्याला ॥ ६४ ॥
सर्वक्रिया करी परि, असे अकर्ता सदा स्वयोगानें ॥
ह्मणऊनि सदायोगी, ऐसें निजनाम घेतलें त्यानें ॥ ६५ ॥

---

१ अतिशयित. २ बलंबलवतांचाहामित्युक्तेः ३ नाम. ४ धाकटा भाऊ. ५ उत्पन्न व्हावयाची वस्तु. ६ आंवरूनधरी. ७ आंतील इंद्रियगण. अंतःकरणादिक. ८ उत्तमवस्तु ब्रह्म. ९ जाणतेपणा. १० खरें.

धर्मत्राणाकरितां, जो मारी सबळ असुरवीरांतें ॥
यास्तव ह्मणती झालें, आहे अभिधान **वीरहा** त्यातें ॥ ६६ ॥
मा ही भगवद्विद्या, तीचा स्वामी म्हणोनि **माधव** हा ॥
भवसिंधूस तराया, तदु[1]पासन हाच बा उपाय महा ॥ ६७ ॥
म[2]धु जेंवि परां[3] प्रीती, उपजवितो हीं तसेंच कीं करितो ॥
आवड उपासकां बहु, याची **मधु** नाम ह्मणुनि हीं[4] धरितो ॥ ६८ ॥
शब्दा[5]दिरहित ह्मणउनि, होतनसे इंद्रियांस गोचर[6] तो ॥
त्यास **अतींद्रिय** ह्मणती, त्याच्या नामींच साधुचित्त रतो ॥६९ ॥
ज्याची मोठी प्रबळा, जीवांला मोहकारिणी माया ॥
त्यास **महामाय** असें, नाम दिलें गर्व त्यापुढें वाया ॥ ७० ॥
जगदुत्पत्तिस्थितिलय, करण्याचा ज्यास फार हव्यां[7]स ॥
त्यास **महोत्साह** असें, नामसहस्रांत बोलिला व्यास ॥ ७१ ॥
आहेच जो बळाचा, सागर ज्याच्या बळा नसे गणती ॥
ब[8]लवंताचें बल हा, ह्मणुनि **महाबल** असें तया ह्मणती ॥ ७२ ॥
मोठी बुद्धि जयाची, असती जे बुद्धिमंत त्यांमाजी ॥
जो मुख्य त्यासचि **महा, बुद्धि** ह्मणावें असा तया रा*जी ॥ ७३ ॥
ज्याचें मायालक्षण, वीर्य महा होय ज्या[9]जपासाव ॥
जग झालें ह्मणुनि **महा, वीर्य** असें हें दिलें तया नांव ॥ ७४ ॥
ज्या माजि शक्ति मोठी, का[10]र्यानुगुणा अनेक विध राहे ॥
ह्मणऊनचि त्यास **महा, शक्ति** असें नाम ठेविलें आहे ॥ ७५ ॥

---

१ विष्णूची उपासना. २ मध. ३ अन्याला. ४ ईश्वर. ५ शब्दस्पर्शादिविषयहीन. ६ गम्य. ७ औत्सुक्य. ८ बलंबलवतांचाहमित्युक्तेः ९ ज्यापासून. १० कार्यसमर्था. *वश.

मोठें तेज जयाचें, कीं आहे सकलकांतिचें धाम[1] ॥
यास्तव दिधलें कविनीं, त्यालागिं **महा द्युती** असें नाम ॥ ७६ ॥
जें दावितां नये नच, वदतां ये जेथ वाङ्[2]मना न गती ॥
ऐसें स्वरूप ज्याचें, त्यास **अनिर्देश्यवपु** असें ह्मणती ॥ ७७ ॥
ऐश्वर्यलक्षणा श्री, ती ज्यामध्यें समग्रही राहे ॥
त्याला साधुजनांनीं, नाम **श्रीमान्** असें दिलें आहे ॥ ७८ ॥
ज्याची बुद्धि विशा[3]ला, सर्वप्राण्या न जी[4] कळायाची ॥
ह्मणऊनि **अमेयात्मा**, ही आख्या जाहली पुन्हा त्याची ॥ ७९ ॥
धरिला मंदर किंवा, गोवर्धन थोर अद्रि[5] तो जेणें ॥
यास्तव धरिलें आहे, अभिधान[6] **महाद्रिधृत्** असें तेणें ॥ ८० ॥
अथवा[7] महाद्रिधरण्या, विषयीं प्रागल्भ्य थोर जो वाहे ॥
त्याला नाम कविमतें, तैसेंच **महाद्रिधृक्** असें आहे ॥ ८० ॥
मोठें धनुष्य ज्याचें, जें ख्यात जगांत शार्ङ्ग नामानें ॥
कविजन ह्मणती यास्तव, नाम **महेष्वास** घेतलें त्यानें ॥ ८१ ॥
भू[8] सिंधूंत बुडाली, असतां बाहेर काढिली जेणें॥
भूपति वा[9] ह्मणुनि **महीभर्त्ता** हें नाम घेतलें तेणें ॥ ८२ ॥
ज्याच्या वक्षःस्थानीं, श्री[10] सुखलाभार्थ नित्य वास करी ॥
तो भक्तवत्सल प्रभु, लोकांत **श्रीनिवास** नाम धरी॥ ८३ ॥
जे साधु संत वैदिक, त्यांला विश्रांतिचें असे स्थान ॥
यास्तव **सतांगति** असें, घेताझाला जनांत अभिधान ॥ ८४ ॥

---

१ स्थान. २ वाणीला मनाला. ३ मोठी. ४ बुद्धि. ५ पर्वत. ६ नाम. ७ पाठांतर. ८ पृथ्वी. ९ अथवा. १० लक्ष्मी.

ज्याचा कोठेंहि कधिंहि, कोणापासून होय न निरोध[+] ॥
अनिरुद्ध त्यास ह्मणती, ज्याचा करितात साधुजन शोध ॥ ८५ ॥
दुष्टांच्या दमनानें, आनंद सुरांस नित्य जो देतो॥
या कारणास्तव कवी, ह्मणति **सुरानंद** नाम तो घेतो ॥ ८६ ॥
गोशब्दानें गाई, वाणी भूमीहि या तिन्ही येती॥
त्यांचा पाळक ह्मणउनि, **गोविंद** असें तयास कवि ह्मणती ॥ ८७ ॥
देवांनीं तो[1] जैसा, गाईनीं इंद्र हो[2] तसा केला॥
यास्तव **गोविंद** अशी, आख्या विख्यात जाहली त्याला ॥ ८७ ॥
गोशब्दें श्रुति[3] वाणी, तीचे वेत्ते[4] जगांत जे असती॥
त्यांचा स्वामी पाळक, यास्तव त्या **गोविदांपती** ह्मणती ॥ ८८ ॥
सूर्यादिक तेजस्वी, यांजमधें जें प्रसिद्ध तेज वसे ॥
तो ईश्वरांश[5] ह्मणती, यास्तव त्याला **मरीचि** नाम असे ॥ ८९ ॥
अधिकारमत्त[6] दुर्जन, जे त्यांचें दमन जो स्वयें करितो॥
वैवस्वतरूपानें[7], यास्तव तो **दमन** नाम हें धरितो॥ ९० ॥
जो शुद्ध जो विवेकी, किंवा संसारबंध जो तोडी ॥
त्याला **हंस** ह्मणति कवि, जोडावी त्याच वस्तुची जोडी ॥ ९१ ॥
वदला हरी स्वयें कीं, पक्ष्यांत सुपर्ण[8] ती मम विभूती ॥
शोभन पर्ण[9]जयाचे, यास्तव त्याला **सुपर्ण** कवि वदती ॥ ९२ ॥
भुजंगांमध्यें[10] उत्तम, जो शेष तया अनंत ही म्हणती ॥
तो हाच ह्मणुनि याला, **भुजगोत्तम** हेंच नाम कवि देती ॥ ९३ ॥

---

१ तो प्रसिद्ध स्वर्गींचा इंद्र. २ विष्णु. ३ श्रुति किंवा वाणी ४ जाणते. ५ तेजस्तेजस्विनामहमितिभगवद्वचनं. ६ मोठा अधिकार मिळाल्यामुळें जे मत्त ७ यमस्वरूपानें दंड करतो. ८ वैनतेयश्चपक्षिणामितिभगवद्वचनं. ९ पक्ष—पंख— १० नागांमध्यें—अनंतश्चास्मिनागानामितिभगवद्वचनं. + प्रतिबंध.

ज्याची हिरण्यतुल्या[1], कल्याणी शोभना असे नाभी ॥
त्याला **हिरण्यनाभ**, प्रख्या ही जो न दे निजजना[2] भी[3] ॥ ९४ ॥
किंवा ज्याच्या उदरीं, ब्रह्मांड हिरण्यतुल्य[4] शोभतसे ॥
यास्तव त्या भगवंता, अभिधान **हिरण्यनाभ** हेंच असे ॥ ९४ ॥
नरनारायणरूपें, शोभन तप बदरिकाश्रमांत करी ॥
एकाग्रमनानें तो, **सुतपा** हें नाम आपणास धरी ॥ ९५ ॥
पद्माकार[5] सुवर्तुल शोभन नाभी अशी असे ज्याची ॥
त्याला आख्या दिधली, सत्कविनीं **पद्मनाभ** ही साची ॥ ९६ ॥
प्रद्युम्नादिक[6] विस्तृत, संततिचा जो पिता जनांचा ही ॥
ह्मणुनि **प्रजापती** तो, भक्तांचें क्षेम योग जो वाही ॥ ९७ ॥
कालत्रयींही ज्याला, विनाश किंवा विनाशहेतु नसे ॥
यास्तव त्या अमरेशा, कविनीं दिधलें **अमृत्यु** नाम असे ॥ ९८ ॥
प्राण्यांचें सुकृत[7] कुकृत, अकृतहि जो ज्ञानदृष्टिनें पाहे ॥
त्या सर्वद्रष्ट्याला, नाम ह्मणुनि **सर्वदृक्** असें आहे ॥ ९९ ॥
प्रळयीं भूतांतें[8] जो, हिंसितसे[9], वा[10] जगांत मुख्य असे ॥
शत्रुगजाचा[11] हंता, यास्तव त्या नाम **सिंह** योग्य दिसे ॥ २०० ॥

॥ **द्वितीयशतकसमाप्त** ॥ एकंदर आर्या ॥ १०५ ॥

---

१ सुवर्णकांति२ भक्तांला—३भय—४ सुवर्णतुल्य तेजस्वी—५ कमलाकृति. ६ प्रद्युम्न सांब इत्यादिक जी पुत्रसंतति तिचा किंवा जनाचा पिता— ७ चांगलें वाईट केलें नकेलें—८ पंच महाभूतांतें किंवा सृष्टीतें—९ नाशितो— १० अथवा—११ शत्रु हेच गज त्यांचा.

शतक तिसरें.

कर्मफलांशीं पुरुषा, योजी स्वपरांत वा करी साम ॥
त्या भक्तवत्सलाला, **संधाता** ठेविलें असें नाम ॥ १ ॥
कर्मफलाचा भोक्ता, किंवा जो लौकिकार्थ संधि करी ॥
ह्मणऊनि आपणाला, तो आख्या **संधिमान्** अशीच धरी ॥ २ ॥
स्थिर निजकथेंत अथवा, भक्तांच्या मानसीं स्थिरचि राहे ॥
जो एकरूपचि तया, ह्मणुनि **स्थिर** नाम जाहलें आहे ॥ ३ ॥
जातो दुर्गमदेशीं, टाकी चक्रादि शस्त्र अरिवरती ॥
अथवा जन्मरहित जो, त्याला कवि **अज** असें पुन्हा ह्मणती ॥ ४ ॥
ज्याचें सहन कराया, दानव दैत्यादि शत्रु नच शकती ॥
यास्तव महानुभावा, त्या **दुर्मर्षण** असें कवी ह्मणती ॥ ५ ॥
सर्वांस जो श्रुतिस्मृति, शास्त्रांनीं शासन स्वयें करितो ॥
दंडी दुष्टांसि ह्मणुनि, आख्या **शास्ता** अशीच तो धरितो ॥ ६ ॥
ज्याचा सच्चित्सुखमय, देह विराड्रूप वा प्रसिद्ध असे ॥
ह्मणऊनि **विश्रुतात्मा**, आख्या जी ती तयास योग्य दिसे ॥ ७ ॥
देवांचे शत्रु नरक, मधु कैटभ पुर मुरादिजे असती ॥
त्यांचा हंता यास्तव, त्याला सज्जन **सुरारिहा** ह्मणती ॥ ८ ॥
जो जनक समस्तांचा, विद्यांचा वा असेच उपदेष्टा ॥
ह्मणुनि तया **गुरु** ह्मणती, त्याचा कोणी असे न विद्वेष्टा ॥ ९ ॥

---

१ गांठ घाली. २ स्वकीय परकीय यांजमध्यें. ३ संधि. ४ कीर्त्यर्थ. ५ निर्विकार ६ इतरांस दुःसाध्य. ७ ज्याच्या शौर्याचें. ८ अथवा. ९ उत्पादक. १० चराचर जगाचा ११ किंवा. १२ उपदेश करणारा. १३ शत्रु.

ब्रह्मादिक उपदेष्टे[1], गुरु जे त्यांचाहि जो गुरू[2] आहे ॥
यास्तव देव जगद्गुरु, **गुरुतम** ऐसेंच नाम तों लाहे ॥ १० ॥
जो ज्योतीरूप असे, जो कामांचें[3] असे परंधाम[4] ॥
यास्तव तो नारायण, ह्मणति कवी **धाम** हेंच धरि नाम ॥ ११ ॥
तीन्ही काळीं ज्याचा, बाध[5] नसे स्वोक्त[6] सत्य जो करितो ॥
जो सत्यात्मा यास्तव, कवि ह्मणती **सत्य** नाम तो धरितो ॥ १२ ॥
अवितथ[7] किंवा अप्रति[8], हत ऐशा जो पराक्रमा वाहे ॥
त्याला **सत्यपराक्रम**, ऐसें अभिधान ठेविलें आहे ॥ १३ ॥
राहूनि योगनिद्रे, मध्यें जो नेत्रमीलना[9] करितो ॥
कवि ह्मणती याच मुळें, तो योगी[10] **निमिष** नाम हें धरितो ॥ १४ ॥
पक्ष्मांचें[11] चलन नसे, ज्यांत असें पाहणें सदा वरितो ॥
तो मत्स्यरूप[12] भगवान्, **अनिमिष** हें नाम आपणा धरितो ॥ १५ ॥
कंठांत वैजयंती नामक, माळेस जो सदा घाली ॥
ह्मणुनि **स्रग्वी** ऐशी, आख्या त्या विष्णुला असे झाली ॥ १६ ॥
विद्येचा पति यास्तव, ज्याची सर्वार्थविषय[13] बुद्धि दिसे ॥
ह्मणुनि तया **वाचस्पति,उदारधी** हें मिळूनि नाम असे ॥ १७ ॥
जो देव मुमुक्षूंतें, नेतो मोक्षाख्य उत्तम पदातें ॥
वा[14] प्रथम पूजिजेतो, ह्मणुनि असे नाम **अग्रणी** त्यातें ॥ १८ ॥
जो भूत[15]ग्रामातें, वर्तवितो देव आत्मशक्तीनें ॥
याचमुळें आदरिलें, **अभिधान ग्रामणी** असें त्यानें ॥ १९ ॥

१उपदेश करणारे. २ शास्ता. ३ मनोरथफलांचें. ४ मुख्यस्थान. ५ निरास किंवा अभाव. ६ निजवचन. ७ सफल. ८ अपराजित. ९ डोळे झांकणें. १० योगधारणा करणारा. ११ पापण्यांचें. १२ मत्स्यावतारी. १३ वस्तुमात्र जाणणारी. १४ अथवा. १५ भूतसमुदायातें.

अथवा मथुराग्रामा, जो नेई द्वारकेस योगानें[1] ॥
याजमुळें आदरिलें, अभिधान **ग्रामणी** असें त्यानें ॥ १९ ॥
ज्याचेठायीं शोभा, कांती सर्वातिशायिनी[2] राहे ॥
यास्तव पुन्हा तयाला, **श्रीमान्** हें नाम जाहलें आहे ॥ २० ॥
श्रुतिस्मृति पुराणांसीं, मिळणारा तर्क होय तो न्याय ॥
तद्रूप[3] ह्मणुनि हाही, **न्याय** असे जो करी न अन्याय ॥ २१ ॥
त्रिजगद्यंत्रातें[4] जो, वर्तवितो वा स्वकर्मफल देतो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **नेता** हें नाम आपाणा घेतो ॥ २२ ॥
सम्यक् भाषण ज्याचें, किंवा भूतांस वायुरूपानें ॥
चेष्टवितो[5] ह्मणुनि सभी, **रण** ऐसें नाम घेतलें त्यानें ॥ २३ ॥
ज्याला सहस्र मस्तक, धारण त्यांहींच[6] भूमिचें करितो ॥
अथवा विराट् असे जो, **सहस्रमूर्द्धा** स्वनाम तो धरितो ॥ २४ ॥
जो विश्वाचा आत्मा, किंवा हें विश्व ज्यांवरी[7] राहे ॥
यास्तव कविह्मणति तया, **विश्वात्मा नाम** जाहलें आहे ॥ २५
सर्वार्थदर्शन[8] अशीं, अनंत आहेत लोचनें[9] ज्याला ॥
कविनीं दिधलें आहे, ह्मणुनि **सहस्राक्ष** नाम हें त्याला ॥ २६ ॥
सर्वत्र गति जयांची, ऐसे बहुसंख्य पाद ज्या असती ॥
ह्मणऊनि वेदवादी, मुनि त्यास **सहस्रपात्** असें ह्मणती ॥ २७ ॥
जो संसृतिचक्रातें[10], पुनः पुन्हा फिरविती[11] स्वमायेनें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **आवर्तन** नाम घेतलें त्यानें ॥ २८ ॥

---

१ योग सामर्थ्यानें. २ सर्वोत्कृष्ट. ३ न्यायरूप- ४ चक्रातें. ५ जीवविती. ६ त्यामस्तकांनीं ७ ज्या अधिष्ठानरूपावर ८ सर्व पदार्थ पाहणारीं. ९ नेत्रें. १० संसाररूपचक्रातें. ११ उत्पत्ति स्थिति लयं वारंवार करितो.

अथवा पुनःपुन्हा जो, धर्माच्या रक्षणार्थ संभवतो[1] ॥
यास्तव ह्मणती मुनिजन, **आवर्तन** नाम आपणा घेतो ॥ २८ ॥
ज्याचा आत्मा संसृति, बंधापासूनियां[2] निवृत्त असे ॥
ह्मणऊनि **निवृत्तात्मा**, विषयविरक्तास[3] नाम योग्य दिसे ॥ २९ ॥
जो जीवांला न दिसे, कीं आच्छादित होय योगमायेनें ॥
या कारणास्तव जगीं, **संवृत**[4] हें नाम घेतलें त्यानें ॥ ३० ॥
रुद्रादिविभूतींनीं, प्रळयीं भूतांसि मर्दितो[5] जो कीं ॥
दैत्यांतें मर्दी वा, तो झाला **संप्रतर्दन** चि लोकीं ॥ ३१ ॥
सूर्याच्या रूपानें, रात्र्यन्हांची[6] प्रवृत्ति जो करितो ॥
यास्तव तो देव **अहः,संवर्तक** नाम आपणा धरितो ॥ ३२ ॥
देवांस पोंचवाया, जो आपण हुतें[7] हवीस वाहतसे ॥
अग्नीच्या रूपानें, ह्मणऊनि तयास नाम **वन्हि** असे ॥ ३३ ॥
पृथ्वीस इला ह्मणती, [8]तीं दिधली सर्व उग्रसेनाला[9] ॥
ज्याला नाहीं उरली, ह्मणउनियां **अनिल** नाम हें त्याला ॥ ३४ ॥
निद्रेस इला ह्मणती, [10]तीं सुखशयनावरी न ये ज्याला ॥
श्रीरुक्मिणीवियोगें, ह्मणउनियां **अनिल** नाम हें त्याला ॥ ३४ ॥
जो व्यापक ह्मणउनियां, कोठें निश्चित नसे निलय[11] ज्याला ॥
यास्तव तत्वज्ञांनीं, अनिल[12] असें नाम ठेविलें त्याला ॥ ३४ ॥
होऊनि शेष अथवा, घेऊनि वराहरूप धरणीला ॥
धरिता झाला यास्तव, **धरणीधर** नाम जाहलें त्याला ॥ ३५ ॥

---

१ अवतार घेतो. २ मायिक अज्ञानापासून. ३ स्वभावतःविषयासक्त नव्हे जो त्यास. ४ झांकलेला. ५ संहारितो. ६ रात्रीदिवसयांची. ७ होमिलेल्या हविर्भागास. ८ पृथ्वी. ९ कंसास मारून त्याच्या बापाला. १० निद्रा. ११ स्थान. १२ यकारलोपानें आनिलहें नाम.

ज्याचा प्रसाद भजका वरि, तैसा शत्रुवरिहि सम राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम तया **सुप्रसाद** हें आहे ॥ ३६ ॥
न मळे चित्त जयाचें, जो निर्मळ निर्विकार परमात्मा ॥
जो आप्तकाम करुणा, स्निग्ध असे ह्मणति त्या **प्रसन्नात्मा** ॥ ३७ ॥
जो प्रागल्भ्य[1] जना दे, किंवा विश्वांत जो प्रगल्भ दिसे ॥
ह्मणऊनि **विश्वधृक्** हें, नाम कविमतें तयास योग्य असे ॥ ३८ ॥
विश्वाचा जो भोक्ता, विश्वाचें पालन स्वयें करितो ॥
यास्तवचि **विश्वभुक्** हें, परमेश्वर नाम आपणा धरितो ॥ ३९ ॥
ब्रह्मयापासुनि कीटा, पर्यंत तनू[2] अनेकविध करितो ॥
किंवा सर्वव्यापक, यास्तव तो नाम **विभु** असें धरितो ॥ ४० ॥
जो धर्मरक्षणार्थी, गो ब्राह्मण भक्त यांस पूजितसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सत्कर्ता** नाम त्यास योग्य असे ॥ ४१ ॥
जो सद्भक्तजनांनीं, सत्कारुनि भक्तिनेंचि पूजियला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सत्कृत** अभिधान जाहलें त्याला ॥ ४२ ॥
न्यायप्रवृत्त[3] किंवा, न्यायानें साधितो स्वसाध्यास[4] ॥
यास्तव कविजन ह्मणती, **साधु** असें नाम जाहलें त्यास ॥ ४३ ॥
प्रळयीं जनास हरितो, टाकूनि अभक्त भक्त उद्धरितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **जन्हु** असें नाम आपणा धरितो ॥ ४४ ॥
आकाशादिक तत्वें, त्यांतें जो व्यापुनी सदा राहे ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **नारायण** नाम पावला आहे ॥ ४५ ॥
नर आत्मा त्यापासुनि, झाले ते नार जीव त्यां ह्मणती ॥
त्यांचें अयन[5] ह्मणउनी, **नारायण** नाम त्यास कवि देती ॥ ४५ ॥

---

१ प्रौढत्व. २ शरीरें. ३ न्यायानें वर्तणारा. ४ स्वकार्यास. ५ स्थान.

नर आत्मा त्यापासुनि, झाल्या ज्या आपे नार त्या ह्मणती ॥
त्या नार अयेन ज्याला, **नारायण** नाम त्यास मुनि देती ॥ ४५ ॥
जीवांचा जो नायक, जो पालक मुख्यही तयां माजी ॥
अथवा अर्जुन रूपी, तो **नर** जो निजजना असे राजी ॥ ४६ ॥
जो सांगतां नये कीं, शब्दाला विषय जो असेना च ॥
यास्तव झालें आहे, त्यास **असंख्येय** नाम हें साच ॥ ४७ ॥
ज्याचें स्वरूप नाहीं, व्हायाचें सिद्ध सत्प्रमाणानें ॥
ह्मणऊनि **अप्रमेया**, त्या ऐसें नाम घेतलें त्यानें ॥ ४८ ॥
सर्वांहूनि अतिशयें, वर्ते जो सर्वहि प्रकारानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **विशिष्ट** हें नाम घेतलें त्यानें ॥ ४९ ॥
शासन करितो किंवा, आपण वेदोक्त कर्म जो करितो ॥
तो नाम आपणाला, याजमुळें **शिष्टकृत्** असें धरितो ॥ ५० ॥
शुचि शुद्ध शुचि निरंजन, शुचि वन्हि श्वेत हे शुची असती ॥
तोही तसाचि आहे, यास्तव कवि त्यास **शुचि** असें ह्मणती ॥ ५१॥
ज्याच्या अर्थ मनांतिल, जो जो तो तोहि सिद्ध होत असे ॥
यास्तव कविजन ह्मणती, त्याला **सिद्धार्थ** नाम योग्य दिसे ॥ ५२॥
योजी मनांत जो जो, तो ज्याचा सिद्ध होय संकल्प ॥
यास्तव कवि ह्मणति तया, झालें अभिधान **सिद्धसंकल्प** ॥ ५३ ॥
जो देतो कर्म फळें, किंवा मुक्तीहि कर्मकर्त्याला ॥
अधिकार पाहुनीयां, यास्तव **सिद्धिद** असें ह्मणति त्याला ॥ ५४ ॥
त्रैवर्गिक कर्मफळें, साधाया मुख्य साधन असे जो ॥

१ उदकें. २ स्थान. ३ चांगल्या अनुमानादिप्रमाणानें. ४ शुद्ध निरंजन असा. ५ विषय ६ कल्पना. ७ धर्म अर्थ काम यां संबंधी.

त्यालाचि **सिद्धिसाधन**, हें नाम जनांत कविमतें साजो ॥ ५५ ॥
वृष पुण्य तेंच अह त,ल्लक्षित जो द्वादशाह[1] याग असे ॥
तो आहे ज्यास ह्मणुनि, नाम **वृषाही** तयास योग्य दिसे ॥ ५६ ॥
जो करितो भक्तांवरि, कामांचा देवराव वर्षाव[2] ॥
यास्तव त्याला झालें, कवि ह्मणती **वृषभ** हें असें नांव ॥ ५७ ॥
जो तीन पावलांनीं, उर्ध्वा[3]धोमध्य लोक आक्रमितो ॥
यास्तव वामन रूपी, तो भगवान् **विष्णु** नाम हें धरितो ॥ ५८ ॥
ज्याच्या पदीं[4] चढाया, धर्मचि सोपानपर्वें[5] सर्वांला ॥
यास्तव **वृषपर्वा** हें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ५९ ॥
ज्याच्या उदरीं नांदे[6], धर्मचि अथवा असे प्रजावर्षी ॥
ज्याचें[7] उदर तयाला, देति **वृषोदर** चि नाम देवर्षी ॥ ६० ॥
भक्तांनीं अल्पहि जें, दिधलें तें वाढवीतसे[9] जो कीं ॥
यास्तव **वर्धन** ऐसें, नाम तया जाहलें ह्मणति लोकीं ॥ ६१ ॥
वाढे प्रपंचरूपें, यास्तव त्या **वर्द्धमान** हें नाम ॥
त्यावांचून असेना, तापत्रयदुःखितास सुखधाम[10] ॥ ६२ ॥
जरि वाढला प्रपंचें, तरि त्यांपासून[11] वेगळा राहे ॥
यास्तव त्या पूतालों[12], **विविक्त** हें नाम जाहलें आहे ॥ ६३ ॥
जशि सागरांत रत्नें, तैशा श्रुति राहती जयांमाजी[13] ॥
ह्मणुनि **श्रुतिसागर** हा, तदाश्रिताला त्रिताप नच भांजी[14] ॥ ६४ ॥

---

१ द्वादशाह प्रभृति यागविशेष. २वृष्टि. ३ स्वर्ग पाताल मृत्यु लोक. ४स्थानीं स्वरूपीं. ५ जिन्याच्या पायऱ्या. ६ राहतो. ७ज्यांचें. उदर आहे. ८प्रजोत्पादक. ९बहुमानितो. १०सुखाचें स्थान. ११प्रपंचापासून. १२निष्कलंकाला १३ज्यामध्यें. १४ताप देत नाहीं.

शोभन[1] हि जगद्रक्षण, दक्ष असे असति चार भुज ज्याला ॥
यास्तव मुनिजन म्हणती, सुभुज असें नाम जाहलें त्याला ॥ ६५ ॥
दुःखानींहि धरा[3]या, चित्तांत मुमुक्षु न शकती ज्याला ॥
कविह्मणती याजमुळें, दुर्धर हें नाम जाहलें त्याला ॥ ६६ ॥
ज्याची प्रशस्त वाणी, वेदमयी जी मुखांतुनि निघाली ॥
ह्मणुनि श्रुतिज्ञ ह्मणती, आख्या वाग्मी अशी तया झाली ॥ ६७ ॥
ह्मणतात ईश्वरांचा, ईश्वर ऐसेंच लोकपति ज्याला ॥
यास्तव पडलें आहे, लोकांत महेंद्र नाम हें त्याला ॥ ६८ ॥
वसु ह्मणजे धन तें जो, लोकां सर्वप्रकारचें देतो ॥
यास्तवचि आपणाला, तो दाता वसुद नाम हें घेतो ॥ ६९ ॥
तें वसु आपण होतो, मा[4]येनें झांकितो स्वरूपातें ॥
वसतो स[5]दंतरिक्षीं, यास्तव वसु नाम जाहलें त्यातें ॥ ७० ॥
जो एकरूप असतां, धरितो रूपें अनेक मायेनें ॥
ह्मणऊनि घेतलें निज,नाम पहा नैकरूप हें त्यानें ॥ ७१ ॥
उचलाया पृथ्वीतें, रूपम[6]हा घेतलें वराहाचें ॥
ज्यानें यास्तव झालें, नाम बृहद्रूप सत्य हें त्याचें ॥ ७२ ॥
शिपि ह्मणतात पशूंला, त्यांजमधें जो प्रवेशुनी राहे ॥
त्या यज्ञमूर्तिला शिपि,विष्ट असें नाम जाहलें आहे ॥ ७३ ॥
शिपि ह्मणती रश्मीं[7]ला, त्यांजमधें जो प्रवेशुनी राहे ॥
त्या तेजोरूपाला शिपिविष्ट असेंच नाम तें आहे ॥ ७३ ॥

१शोभमान. २समर्थ. ३ ध्यानांत आणाया. ४किंवा मायेच्यायोगानें ५ सत्‌जेंअंतरिक्षत्यांत ६ मोठेंरूप ७किरणाला.

नैसर्गिक[1]प्रकाशें, सर्वां अर्थांस जो प्रकाशवितो ॥
ह्मणुनि **प्रकाशन** असें, नाम प्रख्यात आपणा धरितो ॥ ७४ ॥
बल तेज कांति यांचा, मुख्यत्वें धारक स्वयें झाला ॥
ओजस्तेजोद्युतिधर, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ७५ ॥
अथवा **ओज**हि **तेज**हि, **द्युतिधर**हि अशाच भिन्ननामानीं ॥
गाती मुनी तयाला, आणावीं तींहि[2] मुखिं मनीं कानीं ॥ ७५ ॥
निगमागमगीत[3] असा, आहे ज्याचा प्रकाशमय आत्मा[4] ॥
यास्तव झालें आहे, नाम तया कविमतें **प्रकाशात्मा** ॥ ७६ ॥
सूर्यादिविभूतींच्या, द्वारानें जो जगास तापवितो ॥
यास्तवचि आपणाला, घेतो नाम **प्रतापन** असें तो ॥ ७७ ॥
धर्मज्ञानादिक जे, सद्गुण त्यांहीं असेच परिपूर्ण ॥
यास्तव **ऋद्ध** असें हें, नाम तयाला भजा तुह्मी तूर्ण ॥ ७८ ॥
स्पष्टचि आहे वाचक, अक्षर ओंकार[5]लक्षण जयाचें ॥
यावरूनच कवि ह्मणती, **स्पष्टाक्षर** नाम जाहलें त्याचें ॥ ७९ ॥
जो वेदमंत्र साक्षात्, ज्यामध्यें मंत्रशक्तिही राहे ॥
यास्तव ह्मणती त्याला, **मंत्र** असें नाम जाहलें आहे ॥ ८० ॥
तापत्रयतप्तांचा, चंद्रांशु[6]समान ताप जो हरितो ॥
यास्तव ह्मणती कवि तो, भगवान् **चंद्रांशु** नाम हें धरितो ॥ ८१ ॥
भास्करकोटिसमाना, कांति जयामाजि अनवरत[7] राहे ॥
त्या **भास्करद्युति** अशी, आख्या[8] लोकांत जाहली आहे ॥ ८२ ॥

---

१ स्वभावसिद्ध. २ तींतीननामें. ३ श्रुतिस्मृतिगीत. ४ स्वरूप. ५ ओंकाररूप ६ चंद्रकिरणांप्रमाणें. ७ निरंतर. ८ नाम.

ज्यापासुनि चंद्राचा, उद्भव तो जलधि रूपचि जयाचें ॥
ह्मणउनियां **अमृतांशूद्भव** ऐसें नाम जाहलें त्याचें ॥ ८३ ॥
ज्याची भा सर्वांला, भासविते ह्मणुनि **भानु** हें नाम ॥
त्याला झालें आहे, तेजाचें मुख्य जो असे धाम ॥ ८४ ॥
शशचिन्ह ज्यावरि दिसे, ऐसा लोकीं प्रसिद्ध जो इंदू ॥
तो हाच औषधींतें, पोशी ह्मणऊनि नाम **शशबिंदू** ॥ ८५ ॥
जे शोभनफलदाते, जे वंद्य जगांत थोर सुर असती ॥
त्यांचाही जो ईश्वर, ह्मणुनि **सुरेश्वर** असें तया ह्मणती ॥ ८६ ॥
जो भक्तांच्या होतो, भेषज संसाररूपरोगाला ॥
यास्तव कविनीं समुचित, **औषध** हें नाम ठेविलें त्याला ॥ ८७ ॥
संसारमहासागर, उतराया होय साधन जगाला ॥
यास्तव **जगतःसेतू**, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ८८ ॥
ज्याचे ज्ञानादिक गुण, सत्य पराक्रमहि सत्य कीं असती ॥
यास्तवचि **सत्य पूर्वक, धर्मपराक्रम** असें तया ह्मणती ॥ ८९ ॥
जो त्रैकालिकभूत, ग्रामाचा नाथ होउनी राहे ॥
त्यालाच **भूतपूर्वक, भव्यभवन्नाथ** नाम हें आहे ॥ ९० ॥
वायूची गति जैशी, तैशी सर्वत्र गति असे ज्याची ॥
ह्मणऊनि **पवन** ऐशी, ही आख्या जाहली असे त्याची ॥ ९१ ॥
करितो पवित्र सर्वां, कीं जो सर्वांस शुद्धगति देतो ॥
यास्तव **पावन** ऐशी, आख्या तो देव आपणा घेतो ॥ ९२ ॥

---

१ समुद्र. २ कांति. ३ स्थान. ४ शशाकारलक्षण. ५ चंद्र. ६ औषध. ७ भूतवर्तमानभविष्यत्कालीं असणारा. ८ किंवा. ९ पूर्वकशब्द सोडून सत्यधर्मपराक्रम हें नाम. १० भूतभव्यभवन्नाथ हें नाम.

प्राणांतें जो घेतो, शोभवितो वा तयांस संहरितो ॥
किंवा अग्निसमचिह्ना, ह्मणउनि तो **अनल** नाम हें घेतो ॥९३ ॥
नल ह्मणजे गंध ह्मणति, तो गंध जयास लेश मात्र नसे ॥
अथवा पर्याप्त[1] असा, अर्थ[2] न ज्याला ह्मणूनि **अनल** असे ॥ ९३ ॥
निजरूपाच्या दानें, भक्तांचे नाशितो[3] विविध[4]काम ॥
यास्तव झालें आहे, देवाला **कामहा** असें नाम ॥ ९४ ॥
जो भक्तांचे सकलहि, पूर्ण करी काम जे मनीं असती ॥
किंवा जो मदनाचा, जनक तया **कामकृत्** असें ह्मणती ॥ ९५ ॥
जो खैनि[5] लावण्याची, उतरावे ज्यावरोनि शत काम[6] ॥
त्या अभिरूप[7]तमाला, कवि ह्मणती **काम** ठेविलें नाम ॥ ९६ ॥
जे असति मोक्षकांक्षी, भाविक ते मोक्ष मागती ज्याला ॥
धर्माविरुद्ध[8] कामचि, हा यास्तव **काम** नाम हें त्याला ॥ ९७ ॥
भक्तांसि जो प्रकर्षे, देतो काम प्रसन्न चित्तानें ॥
कविजन ह्मणती यास्तव, **कामप्रद** नाम घेतलें त्यानें ॥ ९८ ॥
जो प्रादुर्भावातें, पावुनियां दिव्यरूप जो धरितो ॥
कविजन ह्मणती यास्तव, तो नाम **प्रभु** असें पुन्हा धरितो ॥ ९९ ॥
आरंभ युगाचा कीं[9], कालांत युगादिभेद जो करितो ॥
ह्मणउनि तो कालात्मा, अभिधान **युगादिकृत्** असें धरितो ॥ १०० ॥

इतितृतीयशतकंसमाप्तं एकंदर आर्या १०९.

१ पुरेसा. २ पदार्थ. ३ नाहींतसें करितो. ४ विषयभोगादिवासना ५ खाण. ६ मदन. ७ सुंदराला. ८ धर्माशीं अविरोधी. ९ किंवा.

देव कृतादियुगांचें, जो परिवर्तन[1] पुनः पुन्हा करितो ॥
यास्तव तो कालात्मा, नाम **युगावर्त** आपणा धरितो ॥ १ ॥
ज्यापाशीं अत्यद्भुत, मोहक माया अनेकविध असती ॥
यास्तव तत्वज्ञ मुनी, नामानें **नैकमाय** त्या ह्मणती ॥ २ ॥
मोठें अशन[2] जयाचें, कीं कल्पांतीं समग्र विश्वाचें ॥
करितो ग्रसन ह्मणउनी, नाम **महाशन** असें असे त्याचें ॥ ३ ॥
व्यक्ति[3] नसे ह्मणउनि जो, सर्व ज्ञानेंद्रियांस गम्य नसे ॥
जो सच्चिन्मयविग्रह, यास्तव त्याला **अदृश्य** नाम असे ॥ ४ ॥
सूक्ष्मत्वें अव्यक्त, स्थूलत्वें व्यक्त रूप हें ज्याचें ॥
अव्यक्तरूप ऐसें, नाम असे **व्यक्तरूप** ही त्याचें ॥ ५ ॥
सुरशत्रुसहस्रातें, जिंकुनि त्याचें हरी स्वयें धाम[4] ॥
यास्तव कवि ह्मणति तया, झालें आहे **सहस्राजित्** नाम ॥ ६ ॥
युद्धीं किंवा क्रीडा, समयीं जिंकी अनंत भूतांतें ॥
ऐसा अचिंत्यशक्ती, यास्तव ह्मणती **अनंतजित्** त्यातें ॥ ७ ॥
मूर्तानंद ह्मणुनि जो, सर्वांला प्रिय असें ह्मणति शिष्ट ॥
अथवा जो यज्ञानें, पूजित ह्मणउनि नाम त्या **इष्ट** ॥ ८ ॥
जो उत्कृष्ट समस्तां, मध्यें ह्मणउनि **विशिष्ट** त्या ह्मणती ॥
यास्तव कायावाचा, मनें करावी तयाप्रति प्रणती ॥ ९ ॥

---

[1] पर्यायें करून पुनःपुन्हा प्रवृत्ति. [2] भक्षण. [3] मूर्ति. [4] स्थान किंवा तेज.

शिष्टांला इष्ट[+] असे, किंवा आहते शिष्ट इष्ट[+] जया ॥
यास्तव विशिष्टवेत्ते[1] ह्मणती **शिष्टेष्ट**, हेंच नाम तया ॥ १० ॥
मोरांच्या पिच्छांचा ज्याच्या माथां विचित्र मुकुट असे ॥
त्या गोपवेषधर्त्या, नाम **शिखंडी** असेंच योग्य दिसे ॥ ११ ॥
सर्वांही भूतांतें, निजमायेनेंचि बद्ध[2] जो करितो ॥
यास्तव तो मायावी, **नहुष** असें नाम आपणा धरितो ॥ १२ ॥
कामांतें वर्षे जो, भक्ताला धर्मरूप अथवा जो ॥
त्या दात्याला **वृष** हें, नाम तयाला वदान्यजन लाजो ॥ १३ ॥
भक्ताच्या चित्ताला, मळवाया क्रोध जर कधीं आला ॥
त्यातें नाशी यास्तव, अभिधान **क्रोधहा** असें त्याला ॥ १४ ॥
जे दुष्ट जे असाधू, त्यांचें ठायींच जो करी क्रोध ॥
तो **क्रोधकृत्** ह्मणावा, त्याचा श्रुतिला न लागला शोध ॥ १५ ॥
विश्वाचा करणारा, ह्मणुनि तया नाम जाहलें **कर्ता** ॥
अथवा क्रोधिष्ठांचा, छेदक तो ह्मणुनि[×] **क्रोधकृत्कर्त्ता** ॥ १५ ॥
ज्याचे बाहू विश्वा, मध्यें सर्वत्र पसरले असती ॥
त्यालाच **विश्वबाहू**, ऐसें सर्वज्ञ मुनि सदा ह्मणती ॥ १६ ॥
महिनामें[3] पूजेतें, धरणीतें वा सदा शिरीं धरितो ॥
यास्तवचि आपणाला, नाम **महीधर** असें हरी वरितो ॥ १७ ॥
नाहीं च्युति[4] स्वरूपा, कीं[5] ज्याला षड्विकार[6] ते नसती ॥
यास्तव **अच्युत** ऐशी, आख्या झाली असें तया ह्मणती ॥ १८॥

---

१ तत्वज्ञमुनि. २ मायामोहित. ३ महीह्मणजे पूजा किंवा धरणी. ४ भ्रंश. ५ किंवा. ६ आस्तिजायते वर्धते विपरिणमते. अपक्षीयते नश्यति हे सहा विकार. + प्रिय. येथें गुरुत्व अविवाक्षित आहे.

जो निजगुणकर्मांनीं, ब्रह्मांडांत प्रसिद्धतर राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, प्रथित असें नाम जाहलें आहे ॥ १९ ॥
जो प्राणरूप आपण, अथवा सर्वप्रजांसि वांचवितो ॥
आहे जीवनदाता, यास्तव तो प्राण नाम हें धरितो ॥ २० ॥
देतो प्राण सुरांतें, असुरांचे प्राण खंडितो जो कीं ॥
यास्तव ह्मणती त्याला, प्राणद हें नाम जाहलें लोकीं ॥ २१ ॥
कश्यपमहर्षिपासुनि, अदितीच्या सदुदरांत जो झाला ॥
इंद्राचा अनुज[१] ह्मणुनि, नाम असे वासवानुज तयाला ॥ २२ ॥
उदकें ज्यांत रहाती, आश्रय जो मुख्य होय उदकांला ॥
सागररूपी यास्तव, नाम अपांनिधि च जाहलें त्याला ॥ २३ ॥
भूतें ज्यांत रहोती[२], तशीं जसा मृत्तिकेंत घट राहे ॥
यास्तव ह्मणती त्याला, नाम अधिष्ठान जाहलें आहे ॥ २४ ॥
कर्मांचीं योग्य फळें, द्याया काळीं[३] कधींहि जो न चुके ॥
त्या अप्रमत्त ह्मणती, भजतां त्यालाचि जन सुखा न मुके[४] ॥ २५ ॥
निजमहिम्यांत स्थित जो, जगीं प्रतिष्ठा असे महा ज्याला ॥
यास्तव आख्या कविनीं, प्रतिष्ठित अशीच ठेविली त्याला ॥ २६ ॥
भिजवितसे अमृतानें[५], शोषितसे[६] सर्व वायुरूपानें ॥
ह्मणुनि स्कंद असें हें, समुचित अभिधान[७] घेतलें त्यानें ॥ २७ ॥
धर्मपथातें किंवा, वायूतें जो स्वशक्तिनें वाहे ॥
ह्मणउनि त्याला नाम, स्कंदधर असेंच जाहलें आहे ॥ २८ ॥

१कनिष्ठभ्राता. २कारणरूपानें असतात. ३भोगकाळीं. ४चुकतनाहीं. ५जलरूपानें. ६ शुष्ककरितो. ७नाम.

भूतांच्या जन्मादिक, कार्यांचा भार जो स्वयें वाहे॥
यास्तव धुर्य असें हें, नाम तया ह्मणति जाहलें आहे॥२९॥
ज्याला जे जे अभिमत, वर ते ते त्यास सर्व जो देतो॥
यास्तव कविजन ह्मणती, वरद असें नाम आपणा घेतो॥३०॥
वायुसदृशवेगाचें, वाहन गरुडाख्य वाहतें ज्याला॥
ह्मणऊनि वायुवाहन, नाम असें ह्मणति जाणते त्याला ॥३१॥
किंवा सप्तवहादिक[1], वायूंतें वाहवी स्वसत्तेनें ॥
अतएव वायुवाहन, नाम असें घेतलें असे त्यानें॥३१॥
वसुदेवाचा आत्मज, भूवरि लीलार्थ जो स्वयें झाला ॥
ह्मणऊनि नाम कविनीं, ठेवियलें वासुदेव हें त्याला ॥३२॥
भूतें ज्यांत रहातीं, सर्वहि भूतांत जो स्वयें राहे॥
यास्तव तत्वज्ञ ह्मणति, नाम तया वासुदेव हें आहे ॥३२॥
वासुत्वें आच्छादक, देवत्वें दीप्तिमंत गतिमंत॥
जो क्रीडावंत असे, ह्मणुनि ह्मणति वासुदेव त्या संत ॥३२॥
मोठे किरण जयाचे, जे भासविती[2] समस्त विश्वास॥
अग्न्यर्कसोमरूपा, नाम बृहद्भानु हें दिलें त्यास ॥ ३३ ॥
जो आदिकारण असुनि, देव द्युतिमंत दीप्तिगुणधाम[3]॥
यास्तव तत्वज्ञांनीं, दिधलें त्या आदिदेव हें नाम॥३४॥
शत्रूच्या नगराचें, दारण करितोचि जो सलीलगती[4]॥
त्यास पुरंदर ह्मणती, दुर्जनचेष्टा न ज्यापुढें तगती॥३५॥

---

१ वायूचीं नामें वायुविशेष. २ दाखविती. ३ तेजोरूपगुणांचें स्थान. ४ सहजगतीनें.

जातो शोक जयाच्या, भजनें अथवा नसेची शोक जया ॥
यास्तव तत्वज्ञांनीं, दिधलें आहे **अशोक** नाम तया ॥ ३६ ॥
तारी भवाब्धिपासुनि, भक्ताला तेंवि वैरकर्त्याला[1] ॥
यास्तव **तारण** ऐसें, ठेवियलें नाम साधुनीं त्याला ॥ ३७ ॥
जन्म जरा मृत्यु अशा[2], भीतीपासूनि भक्त सोडवितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **तार** असें नाम आपणा घेतो ॥ ३८ ॥
ज्यासम पराक्रमी नच, कोणीहि भितात सर्वही ज्याला ॥
यास्तव पडलें आहे, कविसंमत **शूर** नाम हें त्याला ॥ ३९ ॥
शूरकुळीं अवतरला, ज्या झाला जनक[3] शूर[4] वसुदेव ॥
यास्तव घेता झाला, **शौरि** असें नाम आपणा देव* ॥ ४० ॥
सर्वजनाचा ईश्वर, ह्मणुनि **जनेश्वर** असें तया ह्मणती ॥
यास्तव सर्वजनांनीं, नित्य करावी तयाप्रति प्रणती ॥ ४१ ॥
आत्मत्वें[5] सर्वांला, होउनि **अनुकूल** सर्वदा राहे ॥
प्रतिकूल न होय कधीं, ह्मणउनि **अनुकूल** नाम हें आहे ॥ ४२ ॥
धर्मत्राणार्थचि जो, प्रादुर्भावास[6] घेतसे शतदा ॥
त्यास **शतावर्त** असें, नाम तयाच्या धरा मतांत पदा ॥ ४३ ॥
ज्याच्या करीं निरंतर, लीलार्थ सुशोभ दिव्य पद्म[7] वसे ॥
त्या श्रीभगवंताला, यास्तव **पद्मी** असेंच नाम असे ॥ ४४ ॥
पद्मासमान ज्याचीं, सुंदर उत्फुल्ल लोचनें असती ॥
यास्तव सुरवर मुनिवर, **पद्मनिभेक्षण** असें तया ह्मणती ॥ ४५ ॥

---

१ द्वेषकर्त्याला. २ अशा जातीच्या. ३ पिता. ४ शूरोपनामक. ५ आत्म्याच्यारूपानें. ६ अवतारास. ७ कमल. * परमेश्वर.

त्हृत्[1]पद्माच्या मध्यें, कल्पुनि करिती उपासना ज्याची ॥
योगी यास्तव आख्या, पडलि पुन्हा **पद्मनाभ** ही त्याची ॥ ४६ ॥
अर[2]विंदोपम ज्याचीं, अ[3]क्षीं ह्मणऊनि ह्मणति कवि ज्याला ॥
अरविंदाक्ष असें त्या, भजतां कोण न कृतार्थ जन झाला ॥ ४७ ॥
त्हृ[1]दयाख्या पद्माच्या, मध्यें जो क[4]र्णिकासम विराजे ॥
तोचि उपास्य ह्मणउनी, नाम तया **पद्मगर्भ** हें साजे ॥ ४८ ॥
मायाबळें श[5]रीरें, धर्मत्राणार्थ नैकविध धरितो ॥
धरितो **शरीरभृत्** हें, नाम तया नी[6]ट तें नसे तरि तो ॥ ४९ ॥
अथवा अन्न प्राणहि, होउनि जो पोशितो शरीरांतें ॥
प्राण्यांच्या याजमुळें, **शरीरभृत्** नाम जाहलें त्यातें ॥ ४९ ॥
ऋद्धिस ह्मणति विभूती, ती ज्याची त्रिभुवनांत थोर असे ॥
यास्तव मुनिजन म्हणती, त्यालाच **महर्द्धि** नाम योग्य दिसे ॥ ५० ॥
वर्ते प्रपंचरूपें, ह्मणउनि बहु वाढला जया ह्मणती ॥
यास्तव योगज्ञमुनी, **ऋद्ध** असें नाम त्याजला देती ॥ ५१ ॥
वृद्ध पुरातन आहे, आत्मा ह्मणजे स्वरूप तें ज्याचें ॥
सुरमुनि ह्मणती यास्तव, **वृद्धात्मा** नाम जाहलें त्याचें ॥ ५२ ॥
इंद्रि[7]यसंघ जयाचा, मोठा कीं शक्ति अद्भुताचि ज्याला ॥
अथवा नेत्रचि मोठे, ह्मणऊनि **महाक्ष** नाम हें त्याला ॥ ५३ ॥
ज्याच्या रथध्वजावर, गरुडाचें चिन्ह सर्वदा राहे ॥
त्याला **गरुडध्वज** ही, आख्या लोकांत जाहली आहे ॥ ५४ ॥

---

१ त्हृदयकमळांत. २ कमलसदृश. ३ नेत्रें. ४ मध्यभाग. ५ मत्स्यकूर्मादिदेहें. ६ शरीरी ह्मणणें योग्य नाहीं तरी. ७ इंद्रियसमुदाय.

अद्भुत गुण कर्मे हीं, बघतां ज्याला नसेचि उपमान[1] ॥
यास्तव कविनीं त्याला, ठेवियलें **अतुल** हेंच अभिधान ॥ ५५ ॥
असतां शीर्णे[2] शरीरें, निजतेजें भासमान जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणाति जनीं, तो आपण **शरभ** नाम हें धरितो ॥ ५६
ज्यापासुनि भय आहे, इंद्राग्नियमादि लोकपालांतें ॥
कीं सन्मार्गें वर्ते, जो यास्तव **भीम** नाम हें त्यातें ॥ ५७ ॥
सन्मार्गानें वर्तति, जे त्यांला जो भयंकर नसे तो ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **अभीम** हें नाम आपणा घेतो ॥ ५७ ॥
सर्गस्थितिलय यांच्या, जो ज्ञानें जाणतोचि समयाला ॥
ज्याला यजिति समत्वें, यास्तव **समयज्ञ** नाम हें त्याला ॥ ५८ ॥
यज्ञांत यज्ञभोक्ता, दत्त हविर्भाग जो स्वयें हरितो[3] ॥
यास्तव ऋषिवर ह्मणती, नाम **हविर्हार** असेंच तो धरितो ॥ ५९ ॥
हविरूप ह्मणुनि **हवि** तो, स्मरतां अघ हरि ह्मणोनि **हरि** तो कीं ॥
आचार्यमतें करिती, नामद्वयकल्पना अशी लोकीं ॥ ५९ ॥
जो सर्वलक्षणांहीं, शास्त्रोक्तांहींच दावितां येतो ॥
यास्तवचि **सर्वलक्षण,लक्षण्य** असेंच नाम तो घेतो ॥ ६० ॥
ज्याच्या वक्षःस्थानीं, लक्ष्मी चपलस्वभाव नित्य वसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **लक्ष्मीवान्** हें तयास नाम असे ॥ ६१ ॥
दुष्टांशीं दैत्यांशीं, जेव्हां युद्धप्रसंग जे येती ॥
ते[4] तो जिंकी यास्तव, **समितिंजय** नाम त्यास मुनि देती ॥ ६२ ॥
क्षरनाम विनाश जया, पासुनियां दूर[5] सर्वथा गेला ॥
जो निर्विकार यास्तव, **विक्षर** हें नाम जाहलें त्याला ॥ ६३ ॥

---

१ तुलना. २ नाशवंत. ३ घेतो. ४तेव्हां तेव्हां ते युद्ध प्रसंग. ५नाश सर्वथा नाहीं असा अर्थ.

जग ताराया रो[1]हित, मत्स्याची मूर्ति जो स्वयें झाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **रोहित** हें नाम जाहलें त्याला ॥ ६४ ॥
जो परमानंदाच्या, प्राप्तीचा शास्त्रसंमतचि मार्ग ॥
किंवा मुमुक्षु ज्याचें, मा[2]र्गण करिती ह्मणूनि हा **मार्ग** ॥ ६५ ॥
जो होय निमित्त उपा,दानहि जो हे[3]तु या जगत्कार्या ॥
यास्तव सू[4]क्ष्मदर्शांहीं, **हेतु** असें नाम त्या दिलें आर्या ॥ ६६ ॥
देव यशोदाहस्तें, दा[5]मानें बद्ध जो उदरिं झाला ॥
भक्तवशत्व कळाया, **दामोदर** नाम जाहलें त्याला ॥ ६७ ॥
सर्वांचें सहन करी, जो सर्वांचा पराभवहि करितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सह** हें अभिधान आपणा धरितो ॥ ६८॥
डळमळ करी मही तैं[6], धरिली[7] जेणें महीध्र[8]रूपानें ॥
यास्तव पुन्हा **महीधर**, ऐसें हें नाम घेतलें त्यानें ॥ ६९ ॥
मोठें भाग्य जयाचें, किंवा भोजन असे महा ज्याचें ॥
यास्तव झालें आहे, ह्मणति **महाभाग** नाम हें त्याचें ॥ ७० ॥
मोठा वेगजयाचा, ज्या पाहुनि लाजतात पवन[9] मन ॥
त्या नाम **वेगवान्** हें, झालें, त्याला असो सदा नमन ॥ ७१ ॥
ज्याचें मोठें भक्षण, कीं प्रळयीं विश्वं[10] भक्षणा करितो ॥
यास्तव ह्मणती **अमिताशन** ऐसें नाम आपणा धरितो ॥ ७२ ॥
ज्या पासुन उद्भवला, प्रपंच[11] कीं[12] जो भवांतुनि निं[13]घाला ॥
यास्तव ह्मणती कविजन, **उद्भव** हें नाम जाहलें त्याला ॥ ७३ ॥

१ मत्स्यजातिविशेष. २ शोध. ३ कारण. ४ विचारवंतांनीं. ५ दाव्यानें ६ तेव्हां. ८ पर्वतरूपानें. ७ स्थिरकेली. ९ वायु आणि मन. १० विश्वसंहारातें. ११ जगद्विस्तार. १२ किंवा. १३ जन्ममरण रहित झाला.

सर्गार्थ शिरुनि आंत, क्षोभविता प्रकृतिपुरुष यांला जो ॥
तो **क्षोभण** होय, तया, वर्णूं जातां कवीशमति लाजो ॥ ७४ ॥
सर्गादिक्रीडांहीं, क्रीडे जो द्योतमान[1] तेजानें ॥
यास्तव ह्मणती पुनरपि, **देव** असें नाम घेतलें त्यानें ॥ ७५ ॥
संपत्ति जगद्रूपा, ज्याच्या गर्भांत सुस्थिता राहे ॥
यास्तव ह्मणती त्याला, नाम **श्रीगर्भ** जाहलें आहे ॥ ७६ ॥
जो ईश्वर परम असे, सर्वां भूतांत समपणें राहे ॥
यास्तव ह्मणती त्याला, **परमेश्वर** नाम जाहलें आहे ॥ ७७ ॥
जगदुत्पत्तीविषयीं, साधन आपणाचि मुख्य जो झाला ॥
[2]साधकमत करण ह्मणुनि, **करण** असें नाम जाहलें त्याला ॥ ७८ ॥
जगदुत्पत्तीस उपा[3], दान असुन जो निमित्तही[4] होतो ॥
यास्तव ह्मणती **कारण**, ऐसें तो नाम आपणा घेतो ॥ ७९ ॥
जो उत्पत्ति जगाची, स्वातंत्र्यें करुनि आपणाचि करितो ॥
कर्ता स्वतंत्र यास्तव, **कर्ता** हें नाम आपणा धरितो ॥ ८० ॥
भुवनें विविध विचित्रहि, इच्छामात्रें करून जो करितो ॥
यास्तव ह्मणति **विकर्ता**, ऐसें तो नाम आपणा धरितो ॥ ८१ ॥
ज्याचें स्वरूप, चेष्टित[5], सामर्थ्य जनीं कळे न कोणास ॥
यास्तव तत्वज्ञांनीं, **गहन** असें नाम ठेविलें त्यास ॥ ८२ ॥
झांकी निजरूपातें, मायेनें जो अगम्याचि मनाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **गुह** ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ८३ ॥

---

१ प्रकाशमान. २ विशेषें करून जें साधक त्याला करण ह्मणतात ह्मणून. ३ उपादान कारण. ४ निमित्त कारण. ५ क्रिया.

स[1]च्चित्सुखरूपचि, हा, ऐसें निर्धारि[2]तात वेद जया ॥
यास्तव वेदज्ञांनीं, दिधलें **व्यवसाय** हेंच नाम तया ॥ ८४ ॥
ज्याचे पो[3]टीं अनंत, ब्रह्मांडांचीहि अव्यवस्था न ॥
यास्तव योगज्ञांनीं, ठेवियलें नाम त्या **व्यवस्थान** ॥ ८५ ॥
विस्तर बहु सृष्टीचा, तरी व्यवस्था यथोचिता करितो ॥
जो तोचि आपणातें, जगीं **व्यवस्थान** नाम हें धरितो ॥८६ ॥
श्रेष्ठ स्थान जयाचें, भूतांची संस्थिती जयामाजीं ॥
त्याला **संस्थान** असें, नाम, असावें तया जनीं राजी ॥ ८६ ॥
ज्यांचीं जैशीं कर्में, तैशीं स्थानें तयांस जो देतो ॥
यास्तव कवींद्र ह्मणती, **स्थानद** हें नाम आपणा घेतो ॥ ८७ ॥
कर्में सर्गादि करी, जरी तथापि स्थिर स्वरूपानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **ध्रुव** ऐसें नाम घेतलें त्यानें ॥ ८८ ॥
ज्यां[4]चा पार नलागे, ऐसें ऐश्वर्य ज्याजवळ राहे ॥
त्याला **परर्द्धि** ऐशी, संज्ञा लोकांत जाहली आहे ॥ ८९ ॥
उत्कृष्ट असुनि ज्याच्[5]या, अन्यो[6]पेक्षा नसेच सिद्धीस ॥
तो **परमस्पष्ट** असें, नामधरी तरि अगम्य बुद्धीस ॥ ९० ॥
जो आ[7]प्तकाम होउनि, परमानंदस्वरूप जो राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **पुष्ट** असें नाम ठेविलें आहे ॥ ९१ ॥
ज्या [8]ऱ्हास नसेचि कदा, काळीं जो सर्वदाहि संपूर्ण ॥
नाम तया **तुष्ट** असे, यत्[9]स्मरणें होय विघ्नशत चूर्ण ॥ ९२ ॥

---

१ सच्चिदानंदरूपईश्वर आहे असें. २ निश्चयें मानितात. ३ पोटांत. ४ ज्या ऐश्वर्याचा. ५ ज्याच्या सिद्धीस स्वरूपसिद्धीस. ६ अन्य प्रमाणांची अपेक्षा. ७ पूर्ण काम. ८ क्षय. ९ ज्या भगवंताच्या स्मरणानें.

ज्याचें दर्शन शोभन, आहे सर्वार्थदायि सर्वांला ॥
यास्तवचि सज्जनांनीं, नाम **शुभेक्षण** असें दिलें त्याला ॥ ९३ ॥
ज्याच्या रूपीं योगी, आनंदें ध्यानभक्तिनें रमती ॥
त्यालाच **राम** ह्मणती, त्याच्या चरणीं रमेल धीरमती[1] ॥ ९४ ॥
ज्याच्या रूपांत जगत् , क्षयकाळीं पावतें विरामातें[2] ॥
यास्तव **विराम** ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्यातें ॥ ९५ ॥
जो विषयसेवनाचा, हेतु[3] रजोगुण न तो[4] असे ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **विरज** असें नाम जाहलें त्याला ॥ ९६ ॥
जाणुनि ज्यास मुमुक्षू, मोक्षाच्या लागतात पंथाला ॥
तो पंथ हाच ह्मणुनि, **मार्ग** असें नाम जाहलें त्याला ॥ ९७ ॥
जो ज्ञानें निजत्द्दयीं, भक्तांनीं शक्य होय न्यायाला ॥
यास्तव तत्वज्ञजनीं, **नेय** असें नाम ठेविलें त्याला ॥ ९८ ॥
नायक सर्वांचा जो, अथवा भक्तार्पित स्वयें नेतो ॥
अत्यल्पहि यास्तव तो, ह्मणती **नय** नाम आपणा घेतो ॥९९ ॥
नाहीं घेत अभक्तार्पित, बहुहि नसेच नायक[5] जयाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, ठेवियलें **अनय** नाम हें त्याला ॥ ४०० ॥

इति चतुर्थ शतक समाप्त. एकंदर आर्या १०८.

१ धीर पुरुषांची बुद्धि. २ लयातें. ३ कारण. ४ रजोगुण. ५ नियंता.

शतक पांचवें.

युध्[1] सत्य दया दाना, विषयीं औदार्य ज्याकडे आलें ॥
यास्तव **वीर** असें हें, नाम जगामाजि त्याजला झालें ॥ १ ॥
जे शक्तिमंत असती, जो त्यांत श्रेष्ठ होउनी राहे ॥
यास्तव त्या **शक्तिमतां,श्रेष्ठ** असें नाम जाहलें आहे ॥ २ ॥
जो धरितो भूतांतें, उपदेशी वा[2] स्वरूप धर्माचें ॥
जो धर्मरूप यास्तव, **धर्म** असें नाम जाहलें त्याचें ॥ ३ ॥
धर्माचे जे वेत्ते, प्रख्यात जगत्त्रयामधें असती ॥
हा उत्तम त्यांत ह्मणुनि, **धर्मविदुत्तम** असें तया ह्मणती ॥ ४ ॥
जगदारंभीं विविधा, भूतांची कुंठिता गती करितो ॥
अन्योन्य मेळैंना[3]स्तव, ह्मणउनि **वैकुंठ** नाम हें धरितो ॥ ५ ॥
अथवा स्वैरगति अशा, भक्तांचा आप्त होउनी राहे ॥
किंवा अकुंठगति जो, त्याला **वैकुंठ** नाम हें आहे ॥ ५ ॥
सर्वांच्या पूर्वीं जो, वसतो कीं[4] पापनाश जो करितो ॥
किंवा पुरीं[5]त निजतो, यास्तव तो **पुरुष** नाम हें धरितो ॥ ६ ॥
सर्वांचें जीवन जो, जो चेष्टवितो समस्त भूतांतें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **प्राण** असें नाम जाहलें त्यातें ॥ ७ ॥
अथवा प्रकृष्ट[6] ज्याचा, शब्द श्रुतिरूप तारक जगाला ॥
ह्मणुनि श्रुतिज्ञ ह्मणती, **प्राण** असें नाम जाहलें त्याला ॥ ७ ॥

---

१ युद्ध. २ अथवा. ३ पंचभूतांचें परस्पर मिश्रण होण्याकारितां, अशा मिश्रणावांचून ह्मणजे भूतपंचीकरणावांचून सृष्टि होत नाहीं. ४ किंवा. ५ शरीरांत. ६ उत्तम.

जो प्रळयीं प्राण्यांच्या, प्राणांतें खंडितो स्वशक्तीनें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **प्राणद** हें नाम घेतलें त्यानें ॥ ८ ॥
ब्रह्मेंद्रादि श्रेष्ठहि, नमिती स्तविती समस्त सुर ज्याला ॥
ओंकाररूप ह्मणुनि, **प्रणव** असें नाम ठेविलें त्याला ॥ ९ ॥
आहे देह जयाचा, प्रपंचरूपी ह्मणूनि बहु मोठा ॥
यास्तव **पृथु** नाम तया, त्याच्या भजनीं सुखा नसे तोटा ॥ १० ॥
अंड हिरण्मय ज्याच्या, गर्भी संभूतिहेतु[१] जें विधिचें[२] ॥
यास्तव झालें ह्मणती, अभिधान[३] **हिरण्यगर्भ** हें त्याचें ॥ ११ ॥
संहारी निजचक्रें, दानवदैत्यादि देवशत्रूंतें ॥
कवि ह्मणती ठेवियलें, यास्तव **शत्रुघ्न** नाम हें त्यातें ॥ १२ ॥
जो कारणरूपानें, व्यापुनि राहे समस्त कार्यांतें[४] ॥
यास्तव कविजन देती, **व्याप्त** असें नाम त्याचि आर्यातें[५] ॥ १३ ॥
ज्याची सर्वत्र गती, किंवा सर्वत्र गंध जो वाहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **वायु** असें नाम जाहलें आहे ॥ १४ ॥
द्यौ अक्ष[६] अधः[७] पृथ्वी, यांच्या मध्यें विराट्स्वरूपानें ॥
झाला ह्मणुनि **अधोक्षज**, ऐसें अभिधान घेतलें त्यानें ॥ १५ ॥
इंद्रियगण अंतर्मुख, झाला असतांच जाणला जातो ॥
जो यास्तव ह्मणति **अधोक्षज** ऐसें नाम आपणा घेतो ॥ १५ ॥
नाहीं इंद्रियजन्य, ज्ञान जया दाखवावया शक्त ॥
यास्तव ह्मणती झालें, नाम **अधोक्षज** असें तया व्यक्त ॥ १५ ॥

---

१ उत्पत्तिकारण. २ ब्रह्म्याचें. ३ नाम. ४ सृष्टिरूप कार्यांतें. ५ ईश्वरातें. ६ अक्षशब्दें द्यौ ह्मणजे स्वर्ग समजावा. ७ अधःशब्दें पृथ्वी समजावी.

कालात्मा ह्मणउनियां, ऋतुशब्दानेंच लक्षिती ज्याला ॥
किंवा वसंत[१]ऋतु हा, यास्तव **ऋतु** नाम जाहलें त्याला ॥ १६ ॥
शोभन नेत्र जयाचे, किंवा शुभफलद दर्शन जयाचें ॥
सुखें[२]दृश्यहि भक्तांला, नाम अशास्तव **सुदर्शन** तयाचें ॥ १७ ॥
कालें[३]वितो सर्वांला, जाणतसे वा ह्मणोनि हा **काल** ॥
वांकाति कालात्म्याला, देवहि मग कां तुह्मी न वांकाल ॥ १८ ॥
हृदयाकाशाख्य परम, जें स्थान तयांत नित्य जो राहे ॥
यास्तव ह्मणती त्याला, **परमेष्ठी** नाम जाहलें आहे ॥ १९ ॥
सर्वत्र घेइजेतो, जो त्यांहीं जे मुं[४]मुक्षुजन असती ॥
भक्तार्पित वा[५] घेतो, ह्मणुनि **परिग्रह** असें तया ह्मणती ॥ २० ॥
इंद्राग्निसूर्यवैव, स्वतवातादिक भितात हे ज्याला ॥
शिवरूपी वा[५] यास्तव, **उग्र** असें नाम जाहलें त्याला ॥ २१ ॥
ज्याचे ठायीं भूतें, सम्यँक्[६]त्वें करिति सर्वही वास ॥
यास्तव कविजन ह्मणती, **संवत्सर** नाम जाहलें त्यास ॥ २२ ॥
त्या त्या कर्मामध्यें, जो करितो वास काळरूपानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **संवत्सर** नाम घेतलें त्यानें ॥ २२ ॥
सत्कर्मीं अनँ[७]लस जो, जो करितो क्षिप्र[८] सर्व कर्मातें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **दक्ष** असें नाम ठेविलें त्यातें ॥ २३ ॥
संसारसागरीं जे, पावुनियां पतन गटकळ्या खाती ॥
विश्रांतिस्थान तयां, ह्मणउनि **विश्राम** नाम हें देती ॥ २४॥

---

१ ऋतूनां कुसुमाकरइतिभगवद्वचनं. २ सुखानें पाहतां येतो. ३ सहार करितो. ४ जे मुमुक्ष असती त्यांहीं घेइजेतो. ५ अथवा. ६ उत्तमप्रकारें. ७ आळसानें रहित. ८ त्वरित.

विश्वाहुनि शक्तचि जो, विश्वा अनुकूल होउनी राहे ॥
ह्मणऊनि **विश्वदक्षिण**, ऐसें त्या नाम जाहलें आहे ॥ २५ ॥
ज्यांत समस्तजगातें, ठाव मिळे पूर्ण विस्तरायाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें **विस्तार** नाम हें त्याला ॥ २६ ॥
स्थितिशील असुनि आपण, ज्यांत स्थितिशील राहाती भूतें ॥
ह्मणुनि **स्थावरपूर्व, स्थाणु** असें नाम जाहलें त्यातें ॥ २७ ॥
संविद्रूपी यास्तव, सर्वांचेंही प्रमाण जो झाला ॥
यास्तव वेदज्ञांनीं, **प्रमाण** हें नाम ठेविलें त्याला ॥ २८ ॥
अव्यभिचरित अबाधित, कारण, जो होय विश्वकार्याला ॥
यास्तवचि **बीजअव्यय**, ऐसें हें नाम ठेविलें त्याला ॥ २९ ॥
सुखरूप असे यास्तव, सर्वहि जन सौख्य मागती ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अर्थ** असें नाम जाहलें त्याला ॥ ३० ॥
जो आप्तकाम ह्मणउनि, न कशाचेंही प्रयोजन जयाला ॥
यास्तव **अनर्थ** ऐसें, कविजन अभिधान ठेविति तयाला ॥ ३१ ॥
परमार्थ हाच आहे, ज्याहुनि संपाद्य अर्थ अन्य नसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अनर्थ** ऐसें तयास नाम असे ॥ ३१ ॥
मोठा कोश असे हा, सांठविलीं ज्यांत तत्वसद्रत्नें ॥
ह्मणुनि **महाकोश** असें, नाम तया, त्यास भजति मुनि यत्नें ॥ ३२ ॥
अथवा अन्नमयादिक, कोश जयाच्या सभोंवते असती ॥
आनंदमय सुकोशाचि, ह्मणुनि **महाकोश** नाम हें देती ॥ ३२ ॥

१ स्थान. २ स्थिरराहण्याचा स्वभाव ज्याचा तो. ३ ज्ञानस्वरूप. ४ अपेक्षा. ५ मिळवायाचा. ६ संग्रहस्थान. ७ महदादितत्वेंहींचरत्नें. ८ अन्नमय,प्राणमय,मनोमय, विज्ञानमय हे चार कोश
+ स्थावर स्थाणु एवढें नाम.

मोठा भोग जयाचा, सुखरूप ह्मणोनि हा **महाभोग** ॥
सुखरूप भोग अथवा, जीवां येणेंचि जाय भवरोग ॥ ३ ३ ॥
संत महांत प्रिय ज्या, कीं[1] ज्याचें ते[2]चे मुख्य धन असती ॥
यास्तव **महाधन** असें, नाम तया जाहलें असें ह्मणती ॥ ३ ४ ॥
यावद्भोगां[3]चें जें, साधन ऐसें विशाल धन ज्याचें ॥
यास्तव **महाधन** असें, नाम तया जाहलें असे त्याचें ॥ ३ ४ ॥
भक्तांच्या कार्यांचा, कंटाळा सर्वथा नसे ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम **अनिर्विण्ण** जाहलें त्याला ॥ ३ ५ ॥
परिपूर्णकाम यास्तव, निर्वेद[4] मनीं कधीं नसे ज्याला ॥
ह्मणउनि कविनीं दिधलें, नाम **अनिर्विण्ण** हें असें त्याला ॥ ३ ५॥
स्थूल अतिशयें आहे, किंवा राहे विराट्स्वरूपानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्थविष्ठ** हें नाम घेतलें त्यानें ॥ ३ ६ ॥
नाहीं जन्म जयाला, ह्मणऊनि **अभू** असें तया ह्मणती ॥
किंवा सत्ता रूपी, यास्तव भू हेंच नाम त्या देती ॥ ३ ७ ॥
धर्मांचि बंधन ज्याचें, कीं[5] ज्याशीं धर्म बांधला जातो ॥
यास्तव धर्मज्ञ ह्मणति, नाम खरें **धर्मयूप** हें घेतो ॥ ३ ८ ॥
ज्याला अर्पित मख ते, देती निर्वाण[6]लक्षण फलातें ॥
यास्तव **महामख** असें, झालें अभिधान[7] या जनीं त्यातें ॥ ३ ९ ॥
जो ज्योतिश्चक्राचें, मध्यास्थित त्द्दय विष्णुरूपानें ॥
आहे यास्तव धरिली, आख्या **नक्षत्रनेमि** ही त्यानें ॥ ४ ० ॥

---

१ किंवा. २ संत. ३ भोगमात्राचें. ४ खेद. ५ किंवा. ६ मोक्ष. ७ नाम.

ज्याचें शुभनक्षत्रीं, झालें अवतरण भूमिवर ह्मणती ॥
यास्तव सर्वज्ञ मुनी, **नक्षत्री** नाम हें तया देती ॥ ४१ ॥
नक्षत्रें असति जया, परिवारत्वेंचि[1] जो असा इंदू ॥
तद्रूपचि जो यास्तव, **नक्षत्री** नाम देति त्या विंदू[2] ॥ ४१ ॥
आहे समर्थ सर्वा, कार्याविषयीं क्षमाहि जो करितो ॥
अपराधांची यास्तव, तो **क्षम** हें नाम आपणा धरितो ॥ ४२ ॥
दुःख उपस्थित होतां, भक्तांला कळवळोनि कृश होतो ॥
भक्तांचा ऋणवाही, कळवाया **क्षाम** नाम तो घेतो ॥ ४३ ॥
सृष्ट्याद्यर्थचि केवळ, घडतें सम्यक् क्रियाकरण ज्याचें ॥
यास्तव **समीहन** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याचें ॥ ४४ ॥
यज्ञचि विष्णू ऐसें, श्रुति सांगे ह्मणुनि यज्ञ रूपचितो ॥
यास्तवचि आपणा तो, ह्मणति कवी **यज्ञ** नाम हें धरितो ॥ ४५ ॥
यज्ञाचा फलदाता, हाच ह्मणुनि सर्व ऋषि यजिति ज्याला ॥
यास्तव ऋषिनीं लोकीं, **ईड्य** असें नाम ठेविलें त्याला ॥ ४६ ॥
महती[3] पूजा ज्याची, किंवा पूजार्ह हाचि मुख्य असे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **महेज्य** हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ४७ ॥
ज्या यज्ञांत स्थापिति, यूपस्तंभ ऋतू तया ह्मणती ॥
तो तद्रूप ह्मणुनियां, **ऋतु** ऐसें नाम कवि तया देती ॥ ४८ ॥
आसनविधि[4] मुख्य असे ज्या यज्ञीं त्यास सत्र मुनि ह्मणती ॥
तें तद्रूपचि यास्तव, **सत्र** असें नाम त्यास मुनि देती ॥ ४९ ॥

---

१ परिवार रूपानें. २ विद्वान् ज्ञानी. ३ मोठी. ४ आसनें घालून बसण्याचा प्रकार.

जे भक्त जे मुमुक्षू, त्यांना उत्तम गतीस जो नेतो ॥
तत्वज्ञ कवि ह्मणति तो, सतांगती नाम आपगा घेतो ॥ ५० ॥
जो प्राण्यांचें जाणे, सर्व कृताकृत निसर्गबोधानें[1] ॥
ह्मणऊनि **सर्वदर्शी**, ऐसें हें नाम घेतलें त्यानें ॥ ५१ ॥
सर्वांहीं दोषांहीं, ज्याचा मुक्तचि[2] असा असे आत्मा[3] ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम तया अर्पिलें **विमुक्तात्मा** ॥ ५२ ॥
सर्वहि जाणे यद्वा, सर्वात्मा असुनि जाणता जो कीं ॥
यास्तव **सर्वज्ञ** असें, कवि ह्मणती नाम जाहलें लोकीं ॥ ५३ ॥
सर्वज्ञानांमध्यें, उत्तम जें ब्रह्म तें असे ज्ञानें[4] ॥
तें **ज्ञानउत्तम** असें, ठेवियलें त्यास योग्य अभिधान ॥ ५४ ॥
भक्तत्राणाविषयीं, सुदृढ सुशोभन असे व्रत जयाचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सुव्रत** हें नाम जाहलें त्याचें ॥ ५५ ॥
नित्यप्रसन्न सुंदर, शोभन ऐसें असे मुख जयाचें ॥
याजमुळें कवि ह्मणती, **सुमुख** असें नाम जाहलें त्याचें ॥ ५६ ॥
अथवा समस्तविद्या, उपदेशायास योग्य मुख ज्याचें ॥
याजमुळें कवि ह्मणती, **सुमुख** असें नाम जाहलें त्याचें ॥ ५६ ॥
किंवा कार्याविषयीं, आरंभ उपाय शोभन जयाचे ॥
यास्तव तत्वज्ञांनीं, **सुमुख** असें नाम ठेविलें त्याचें ॥ ५६ ॥
जो दुर्विज्ञेय[5] असे, वा[6] ह्मणती सूक्ष्म कारण जयाला ॥
यद्वा अणुहूनि अणू, याजमुळें **सूक्ष्म** नाम हें त्याला ॥ ५७ ॥

---

१ स्वाभाविक ज्ञानानें. २ अलिप्त. ३ स्वरूप. ४ उत्तम जें ज्ञान तें ब्रह्म असे असा अन्वय करावा. ५ जाणायास अशक्य. ६ अथवा.

श्रुतिरूप शब्द ज्याचा, अथवा गंभीर मेघवत् घोष[१] ॥
त्याला **सुघोष** ऐसें, नाम असे, द्या तयास संतोष ॥ ५८ ॥
भक्तांला सुख देतो, किंवा सुख खंडितो अभक्तांचें ॥
यास्तव **सुखद** असें हें, नाम तया जाहलें ह्मणति सांचें[२] ॥ ५९ ॥
प्रत्युपकारापेक्षा[३], न धरूनि करि जो जनांत उपकार ॥
त्यास **सुहृत्** नाम असे, शतवार करा तया नमस्कार ॥ ६० ॥
सौंदर्यादिगुणांनीं, जो लोकांचीं सदा मनें हरितो ॥
यास्तव कवि ह्मणति **मनो, हर** ऐसें नाम आपणा धरितो ॥ ६१ ॥
जरि दुर्विजेय[४] आहे, तरि जेणें जिंकिला महाक्रोध ॥
त्यास **जितक्रोध** असें, नाम तयाचा तुह्मी करा शोध ॥ ६२ ॥
विक्रमशाली असती, भुज ज्याचे देवशत्रु जिंकाया ॥
त्या **वीरबाहु** ह्मणती, अर्पावें त्यास वाङ्मनःकाया ॥ ६३ ॥
करितो अधार्मिकांचें, सुरशत्रूंचेंहि जो विदारण[५] तो ॥
नाम **विदारण** ऐसें, यास्तव कवि ह्मणति आपणा धरितो ॥ ६४ ॥
जो आत्मबोधरहित[६], प्राणी मायानिशींत[७] नीजवितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्वापन** हें नाम आपणा घेतो ॥ ६५ ॥
राहे स्वतंत्र केवळ, जो अथवा जो स्वभक्तवश राहे ॥
जगदुत्पत्तिस्थितिलय, हेतु तया **स्ववश** नाम हें आहे ॥ ६६ ॥
आकाश जसा व्यापी, तैसा व्यापोनि[८] सर्व जो राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **व्यापी** हें नाम त्याजला आहे ॥ ६७ ॥

---

१ शब्द. २ खरें. ३ प्रत्युपकाराची इच्छा. ४ जिंकायास अशक्य असा क्रोध. ५ नाश. ६ आत्मज्ञानहीन. ७ मायारूप रात्रींत. ८ व्यापून राहतो.

अथवा व्यापितसे जो, सर्वाकार्यास कारणत्वानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **व्यापी** हें नाम घेतलें त्यानें ॥ ६७ ॥
सर्गादिनिमित्तानें, जो स्वात्म्याला अनेकविध करितो ॥
यास्तव ह्मणती कविजन, **नैकात्मा** नाम आपणा धरितो ॥ ६८ ॥
किंवा होय अनेका, जीवांचा बिंबरूप जो आत्मा ॥
यास्तव तत्वज्ञांनीं, ठेवियलें त्यास नाम **नैकात्मा** ॥ ६८ ॥
जो जगदुत्पत्तिस्थिति, लयादि कर्मे अनेकविध करितो ॥
तो **नैककर्मकृत्** हें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ६९ ॥
वसतें ज्यांत अखिल वां, वत्सें गोगोपिकांस जो देतो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **वत्सर** हें नाम आपणा घेतो ॥ ७० ॥
बाप जसा पुत्रांला, भक्तांला स्नेहदान जो देतो ॥
यास्तव ह्मणती कवि तो, **वत्सल** हें नाम आपणा घेतो ॥ ७१ ॥
वत्सें बहु असति जया, पाल्यत्वें गोकुळांत जीं असती ॥
वसती स्नेहाचीं हा, यास्तव **वत्सी** असें तया ह्मणती ॥ ७२ ॥
रत्नें गर्भीं ज्याच्या, सागर ऐसा प्रसिद्ध जो राहे ॥
तो याद्विभूति ह्मणउनि, नाम तया **रत्नगर्भ** हें आहे ॥ ७३ ॥
त्या त्या सर्वधनांचा, ईश्वर विश्वांत जेवढीं असती ॥
देतो सर्वधनातें, ह्मणुनि **धनेश्वर** असें तया ह्मणती ॥ ७४ ॥
अवतरुनियां प्रतियुगीं, धर्माच्या गोपनास जो करितो ॥
तो **धर्मगुप्** असें हें, नाम कवी ह्मणति आपणा धरितो ॥ ७५ ॥

---

१ सृष्ट्यादिकार्यास. २ जगदुत्पत्त्यादिकारणास्तव. ३ आपणला. ४ अनेकरूप. ५ मुख्य स्वरूप. ६ सर्वजग. ७ अथवा. ८ वांसरें. ९ स्नेह धर्माचें स्थान. १० संरक्षणास.

धर्माधर्मविहीनाहि, असतां स्थापावयास धर्मातें ॥
धर्मचि करितो यास्तव, ठेवियलें नाम धर्मकृत् त्यातें ॥ ७६ ॥
धर्म प्रशस्त ज्याचा, किंवा धर्मास कथुनि घेववितो ॥
यास्तव ह्मणती कवितो, धर्मी हें नाम आपणा घेतो ॥ ७७ ॥
व्यापक सत्य अनश्वर, पर ऐसें ब्रह्म जें मुनी गाती ॥
तें हाच ह्मणुनि याला, सत् ऐसें नाम निगमही देती ॥ ७८ ॥
जें व्याप्य वितथ नश्वर,अपर असें ब्रह्म जें मुनी ह्मणती ॥
तेंही हाच ह्मणुनियां, असत् असें नाम त्याजला देती ॥ ७९ ॥
जीं जीं नश्वर भूतें, दिसती तीं सर्व आपणचि झाला ॥
यास्तव मुनिजन ह्मणती, क्षर ऐसें नाम ठेविलें त्याला ॥ ८० ॥
अविनाशी कूटस्थहि, अंतर्यामी असें जया ह्मणती ॥
तो हाच ह्मणुनि याला, अक्षर हें नाम योगिजन देती ॥ ८१ ॥
जो होय अविद्यावृत, बोध असा जीव तोच हा झाला ॥
ह्मणुनि अविज्ञाता हें, नाम कविमतेंचि जाहलें त्याला ॥ ८२ ॥
जो मुख्य सूर्यरूपी, आहे ज्याला सहस्रकर असती ॥
ह्मणऊनि सहस्रांशू , ऐसें हें नाम त्याजला देती ॥ ८३ ॥
भूतांचे धारक अहिपति, दिग्गज भूधरादि जे असती ॥
त्यांचाही जो धारक, ह्मणुनि विधाता असें तया ह्मणती ॥ ८४ ॥
विज्ञान वेद शास्त्रें, तंत्रें हीं सर्व निर्मिलीं ज्यानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, कृतलक्षण नाम घेतलें त्यानें ॥ ८५ ॥

१ अमायिक. अक्षर. २ वेद. ३ मायिक. क्षर. ४ ज्ञान. ५ किरण. ६ भूमिद्वारा प्राण्यांचे. ७ शेषे. ८ पर्वत.

शौर्यौदार्यादिगुणीं, होउनियां ख्यात जो जगीं राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, कृतलक्षण नाम जाहलें आहे ॥ ८५ ॥
जात्यादिभेदकें जीं, चिन्हें तीं सर्व निर्मिलीं ज्यानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, कृतलक्षण नाम घेतलें त्यानें ॥ ८५ ॥
जो स्थित गभस्तिचक्रा, मध्यें तेजस्विसूर्यरूपानें ॥
यास्तव गभस्तिनेमी, ऐसें हें नाम घेतलें त्यानें ॥ ८६ ॥
सत्वगुणाला किंवा, जो प्राण्याला अधिष्ठुनी राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, त्याला सत्वस्थ नाम हें आहे ॥ ८७ ॥
आहे विक्रमशाली, किंवा नरपूर्व सिंहरूपधरी ॥
झालें नाम तयाला, सिंह असें, तोच भक्तदुःख हरी ॥८८ ॥
भूतांचा जो मोठा, ईश्वर ज्याहून अन्य ईश नसे ॥
यास्तव भूतमहेश्वर, हें नाम तयास ह्मणति योग्य दिसे ॥ ८९ ॥
जो देव आदिकारण, भूतांचा मुख्य देव ज्या ह्मणती ॥
त्या आदिदेव एसें, नाम असें, तत्पदीं असो प्रणती ॥ ९० ॥
मोठा देव ह्मणुनियां, जो झाला मुख्य पूज्य जीवांला ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम महादेव जाहलें त्याला ॥ ९१ ॥
इंद्रादिकदेवांचा, प्राधान्यें मुख्य देव जो झाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें देवेश नाम हें त्याला ॥ ९२ ॥
देवांचा पालक जो, इंद्र तयाचाहि जो गुरू झाला ॥
ह्मणऊनि देवभृद्गुरु, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ९३ ॥

---

१ जातिगुणक्रियाइत्यादि. २ रश्मिमंडळांत. ३ नरसिंहरूप.

जो सर्वोत्कृष्ट असे,भव[1]सिंधूपासुनी जना उतरी ॥
यास्तव **उत्तर**, ऐसें, नाम धरी जो भवाब्धिचीं सु[2]तरी ॥ ९४ ॥
गाईस गोपवेषें, पतिरूपें वा[3] महीस पाळितसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **गोपति** हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ९५ ॥
जो निजनिर्मित सकला, भूतांचें पालन स्वयें करितो ॥
यास्तव तो देव जनीं, **गोप्ता** हें नाम आपणा धरितो ॥ ९६ ॥
नच कर्में न धनेंही, जो होतो प्राप्त केव[4]ल ज्ञानें ॥
यास्तव धरिलें आहे, अभि[5]धान **ज्ञानगम्य** हें त्यानें ॥ ९७ ॥
सर्वांच्याही पूर्वीं, सत्तारूपें करूनि जो राहे ॥
यास्तव **पुरातन** असें, त्याला अभि[6]धान जाहलें आहे ॥ ९८ ॥
देहाचीं आरंभक, भूतें भूम्यादि त्यास जो भ[7]रितो ॥
ह्मणउनि **शरीरपूर्वक, भूतभृत्** [8] असेंच नाम तो धरितो ॥ ९९ ॥
सर्वांचा पालक जो, किंवा आनंद भोग जो करितो ॥
यास्तव **भोक्ता** ऐसें, कवि ह्मणती नाम अपणा धरितो ॥ ५०० ॥

पंचमशतकसमाप्त. एकंदर आर्या ११६.

---

१ संसारसमुद्रापासून. २नौका. ३अथवा. ४कर्मानें किंवा धनानें प्राप्त होत नाहीं तो केवल ज्ञानानेंच प्राप्त होतो. ५ नाम. ६ नाम. ७ पोशितो. ८ शरीभूतभृत् हें नाम.

शतक साहावें.

जो श्रेष्ठ ह्मणुनि इंद्रहि, कपिनाम वराहमूर्ति जो झाला ॥
स्वामीहि वानरांचा, ह्मणऊनि **कपींद्र** नाम हें त्याला ॥ १ ॥
यज्ञाविषयीं दक्षिण[1], ऐसे धार्मिक बहू असाति ज्याला ॥
ह्मणऊनि **भूरिदक्षिण**, ऐसें, हें नाम जाहलें त्याला ॥ २ ॥
यज्ञांत देवतांच्या, रूपानें सोमपान जो करितो ॥
यास्तव **सोमप** ऐसें,नाम कवी ह्मणति आपणा धरितो ॥ ३ ॥
पीतो स्वात्मामृतरस[2], किंवा जो मथित[3] अमृतही प्याला ॥
यास्तव **अमृतप** ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ४ ॥
करितोचि औषधींचें, पोषण जो नित्य सोमरूपानें[4] ॥
उमयासह[5] राहे जो, कीं धरिलें **सोम** नाम हें त्यानें ॥ ५ ॥
जे उन्मत्त अधर्मी, सद्द्वेषी बहुत जिंकिले त्यानें ॥
कवि ह्मणती याजमुळें, **पुरुजित्** हें नाम घेतलें त्यानें ॥ ६ ॥
पुरु विश्वरूप असुनी, सत्तम उत्कृष्ट तोच जाणावा ॥
यास्तव **पुरुसत्तम** हा, झाला ऐसा मनांत आणावा ॥ ७ ॥
लोकीं दुष्ट असति ज्या, प्रजा तयांलाचि दंड जो करितो ॥
वरितो नय आपणही, ह्मणुनि **विनय** नाम आपणा धरितो ॥ ८ ॥
क्रोधादिकांस किंवा, सर्वां भूतांस जिंकिता झाला ॥
यास्तव सर्वज्ञांनीं, **जय** ऐसें नाम ठेविलें त्याला ॥ ९ ॥

१ कुशल. २ निजानंदरस. ३ समुद्रमंथनापासून निघालेलें. ४ चंद्ररूपानें. ५ पार्वतीसह राहणारा शिव.

ज्याची संधा[1] किंवा, संकल्पहि सत्य सर्वदा राहे ॥
यास्तव नाम तयाचें, कवि ह्मणती **सत्यसंध** हें आहे ॥ १० ॥
दानास योग्य किंवा, दशार्हवंशांत[3] देव अवतरला ॥
यास्तव **दाशार्ह** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ११ ॥
पति होय यादवांचा, किंवा जो नारदादि भक्तांचें ॥
पालन करितो यास्तव, नाम असे **सात्वतांपति** तयाचें ॥१२ ॥
देउनियां प्राणातें, प्राण्याला जो सदैव जीववितो[4] ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **जीव** असें नाम आपणा धरितो ॥ १३ ॥
विनयित्व[5] विनीतांचें, जो साक्षात् नित्य पाहतचि राहे ॥
त्यास **विनयितासाक्षी**, ऐसें हें नाम जाहलें आहे ॥ १४ ॥
गतिमंत तो विनयिता, जो पाहे सर्व होय तो साक्षी ॥
असुनि विनयिता साक्षी, ह्मणुनि असे नाम **विनयितासाक्षी** ॥ १४॥
भक्तांस मुक्ति देतो, ह्मणऊनि **मुकुंद** नाम हें त्याला ॥
घाला मुक्त्यर्थ तुह्मी, नित्य नमस्कार त्याच देवाला ॥ १५ ॥
अगणित शौर्य जयाचें, किंवा दुर्ज्ञेय विक्रमण[6] ज्याचें ॥
यास्तवचि **अमितविक्रम**, एसें हें नाम जाहलें त्याचें ॥ १६ ॥
देव मनुज पितर असुर, हीं अंभें[7] चार ज्यामधें वसती ॥
किंवा सागर रूपी, यास्तव **अंभोनिधी** असें ह्मणती ॥ १७ ॥
पार न लागे ज्याच्या, रूपाचा देशकालवस्तूनें ॥
ह्मणऊनि **अनंतात्मा**, धरिलें ह्मणतात नाम हें त्यानें ॥ १८ ॥

---

१ प्रतिज्ञा. २ ज्याला आत्मार्पण करणें योग्य असा. ३ यादव विशेष. ४ वांचवितो. ५ नम्रत्व. ६ पराक्रम. ७ उदकें.

संहारुनि भूतांतें, प्रळयीं एकार्णवांत जो निजतो ॥
यास्तवचि तो **महोदधि,शय** एसें नाम आपणा धरितो ॥ १९ ॥
कल्पांतीं भूतांचा, प्राण्यांचा नित्य नाश जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **अंतक** हें नाम आपणा धरितो ॥ २० ॥
नाहीं जन्म जयाला, किंवा विधि हरि हर स्वयें होतो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अज** ऐसें नाम आपणा घेतो ॥ २१ ॥
विष्णूस नाम अ[1] असे, त्यापासुनि जात[2] जो असे काम[3] ॥
तो तद्रूप ह्मणुनियां, **अज** ऐसें जाहलें तया नाम ॥२१ ॥
देवांनीं मनुजांनीं, पूजाया योग्य जो असा झाला ॥
यास्तव झालें आहे, कवि ह्मणति **महार्ह** नाम हें त्याला ॥ २२ ॥
निष्पन्न[4] नित्य असतां, ज्याचें होणें असे स्वभावानें[5] ॥
यास्तवचि घेतलें कवि, ह्मणती **स्वाभाव्य** नाम हें त्यानें ॥ २३ ॥
आंतिल[6] बाहेरिलही[7], शत्रू सारेच जिंकिले जेणें ॥
यास्तव कवि ह्मणति **जिता, मित्र** असें नाम घेतलें तेणें ॥ २४ ॥
ध्यानेंचि ध्यात्यांला, चित्तीं आनंद अतिशयें देतो ॥
ह्मणुनि **प्रमोदन** असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ २५ ॥
देतो आनंद जना, कीं आनंदस्वरूप जो राहे ॥
यास्तव **आनंद** असें, अभिधान[8] तयास जाहलें आहे ॥ २६ ॥
भक्तांचा सुत[9] होतो, लोकांतें सुखसंमृद्ध जो करितो ॥
यास्तव काविजन ह्मणती, **नंदन** हें नाम आपणा धरितो ॥ २७ ॥

---

१ अकारो वासुदेवः २ उत्पन्न. ३ मदन. ४ सिद्ध झालेला ५ स्वेच्छेनें. ६ कामक्रोधादिक. ७ दैत्यादिक. ८ नाम. ९ पुत्र. ५ सुखपरिपूर्ण.

सर्वा उपपत्तींनीं[1], नित्य समृद्ध[2] स्वयें सदा राहे ॥
यास्तव ह्मणति तयाला, **नंद** असें नाम जाहलें आहे ॥ २८ ॥
धर्म ज्ञानादिक जे[3], ते ज्याचे सत्य सर्वदा असती ॥
यास्तवचि **सत्यधर्मा**, ऐसें लोकांत त्यास कवि ह्मणती ॥ २९ ॥
तीन्ही लोकीं ज्याचा, पादप्रक्षेप[4] जाहला ह्मणती ॥
ह्मणुनि **त्रिविक्रम** असें, नाम तया सुज्ञ साधुजन देती ॥ ३० ॥
जो अखिल वेदवेत्ता, सांख्याचार्यहि[5] जया कपिल ह्मणती ॥
तो हा ह्मणुनि **महर्षी**, **कपिलाचार्य**चि असें तया गाती ॥ ३१ ॥
आत्मकृता जो जाणे, जैसें तैसेंच परकृता जाणे ॥
यास्तव **कृतज्ञ** ऐसें, कवि ह्मणती नाम घेतलें त्याणें ॥ ३२ ॥
लक्षीचा पति जैसा, तैसा जो होय भूमिचाहि पती ॥
अथवा भूपतिरूपी, ह्मणुनि तया **मेदिनीपती** ह्मणती ॥ ३३ ॥
ज्याचीं पदें त्रिलोकीं, मध्यैंही समचि विक्रमा[6] करिती ॥
त्याच त्रिविक्रमाला, **त्रिपद** असें नाम सुज्ञमुनि देती ॥ ३४ ॥
तीन दशांचा[7] किंवा, देवांचा अधिप होउनी राहे ॥
यास्तव त्याला **त्रिदशाध्यक्ष** असें नाम जाहलें आहे ॥ ३५ ॥
मोठें शृंग जयाचें, झालें जें[8] घेइ मत्स्यरूपातें ॥
ह्मणुनि **महाशृंग** असें, ठेवियलें नाम साधुनीं त्यातें ॥ ३६ ॥
अथवा उत्कर्ष महा, लोकीं मुख्यत्वही महा ज्याचें ॥
ह्मणुनि **महाशृंग** असें, ठेवियलें नाम साधुनीं त्याचें ॥ ३६ ॥

---

१ उपायांनीं. २संपन्न. ३ ज्ञानादिक जे धर्म ह्मणजे गुण. ४ पादारोहण. ५सांख्यशास्त्राचा प्रवर्तक. ६ स्वारोपणक्रिया. ७ जाग्रत्स्वमसुषुप्ति किंवा बाल्य तारुण्य वार्द्धक्य ८ जेव्हां.

कृतकार्याचा[1] किंवा, मृत्यूचाही विनाश जो करितो ॥
वा[2] अकुशलकर्माचा, तो नाम **कृतांतकृत्** असें धरितो ॥ ३७ ॥
भूमीच्या उद्धारा, स्तव लोकोत्तर वराहतनु झाला ॥
यास्तव झालें आहे, अभिधान[3] **महावराह** हें त्याला ॥ ३८ ॥
जो वेदांतोपनिष, द्वाक्यांनीं मात्र जाणला जातो ॥
पावे गाईतें वा[2], यास्तव **गोविंद** नाम तो घेतो ॥ ३९ ॥
शोभन ज्याची सेना, किंवा शोभन जयास गण[4] असती ॥
यास्तव **सुषेण** ऐसें, अभिधान[3] तयास साधुजन देती ॥ ४० ॥
कनकमय बाहुभूषण, शोभे ज्याच्या भुजावरी रुचिर ॥
त्यास **कनकांगदी** हें, नाम असे त्याजला भजा सुचिर ॥ ४१ ॥
श्रुतिलाहि अगम्य असे, जो किंवा हृद्गुहेत[5] जो राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **गुह्य** असें नाम जाहलें आहे ॥ ४२ ॥
ज्ञानैश्वर्यबलांचा, ज्याच्या न कळेचि पार कोणाला ॥
यास्तव **गभीर** ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ४३ ॥
वाणीसहित मनाचा, अतियत्नेंही जिथे प्रवेश नसे ॥
त्या सद्वस्तूस **गहन**, नाम दिलें तें तयास योग्य दिसे ॥ ४४ ॥
वा तीन अवस्थांचा[6], साक्षी होऊन तींत जो राहे ॥
ह्मणती जिला तुरीया, ह्मणुनि तया नाम **गहन** हें आहे ॥ ४४ ॥
अग्राह्य इंद्रियांहीं, सकला भूतांत गूढ जो राहे ॥
यास्तव **गुप्त** असें हें, नाम तया ह्मणति जाहलें आहे ॥ ४५ ॥

---

१ सृष्ट्यादिकांचा. २ अथवा. ३ नाम. ४ पार्षदगण. ५ हृदयरूप गुप्तस्थानीं. ६ जाग्रत्स्वप्नसुषुप्ति.

चक्र मनस्तत्व करीं, धरितो जो बुद्धितत्वरूप गदा ॥
त्याला **चक्रगदाधर**, ह्मणती ध्यावें मनांत त्यास सदा ॥ ४६ ॥
करितो हित भक्तांचें, किंवा जो सर्व सृजितो भूतें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **वेधा** हें नाम जाहलें त्यातें ॥ ४७ ॥
अंगें भक्त जयाचीं, किंवा सहकारि जो स्वकार्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्वांग** असें नाम जाहलें त्याला ॥ ४८ ॥
कैशाही अवतारीं, कोणीं शत्रू न जिंकिती ज्याला ॥
यास्तव **अजित** असें हें, नाम कवी ह्मणति जाहलें त्याला ॥ ४९ ॥
नर कृष्ण कृष्ण नारा,यण तैसा व्यासही असे कृष्ण ॥
हे तीन तोच ह्मणउनि, नाम तया योजिलें असे **कृष्ण** ॥ ५० ॥
होईना न्यून कधीं, सामर्थ्य तसें स्वरूपही ज्याचें ॥
स्थूल असे शक्त असे, यास्तव **दृढ** नाम जाहलें त्याचें ॥ ५१ ॥
आकर्षितो प्रजांला, प्रळयीं नाहीं च्युति स्वरूपाला ॥
ह्मणउनियां **संकर्षण, अच्युत** हें नाम जाहलें त्याला ॥ ५२ ॥
वरिती भक्त जयाला, सांजे जाणार वरुण देशाला ॥
तो रवि हाच ह्मणुनियां, **वरुण** असें नाम जाहलें त्याला ॥ ५३ ॥
कुंभजवसिष्ठरूपें, वरुणाचा पुत्र जो स्वयें झाला ॥
ह्मणुनि श्रुतिज्ञ ह्मणती, **वारुण** हें नाम जाहलें त्याला ॥ ५४ ॥
भक्तांस कल्पवृक्षचि, किंवा जो स्तब्ध वृक्षसा राहे ॥
ताप हरी तप्तांचा, ह्मणुनि तया **वृक्ष** नाम हें आहे ॥ ५५ ॥

---

१ मनस्तत्वात्मक चक्र. २ बुद्धितत्वात्मक गदा. ३ उत्पादितो. ४ नाशनाहीं. ५ सायंकाळीं. ६ पश्चिम दिशेस. ७ अगस्ति आणि वसिष्ठ यांच्या रूपानें. ८ निश्चल.

आकाशाला ह्मणती, पुष्कर त्यां व्यापुनी सदा राहे ॥
रूप जयाचें यास्तव, नाम तया **पुष्कराक्ष** हें आहे ॥ ५६ ॥
सृष्टिस्थितिलयकार्यें, ज्याच्या केवळ मनेंकरुनि घडती ॥
ऐसें मोठें ज्याचें, मन होय तया **महामना** ह्मणती ॥ ५७ ॥
घेतो अल्पचि भक्ता, पासून तया अनंतगुण देतो ॥
यास्तव **महामना** हें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ५७ ॥
षड्विधें ऐश्वर्य जया, पाशीं स्थिर सुवश होउनी राहे ॥
यास्तव त्याला **भगवान्**, ऐसें हें नाम जाहलें आहे ॥ ५८ ॥
कल्पांतीं भर्गनामक, ऐश्वर्याचाहि नाश जो करितो ॥
कविजन ह्मणती यास्तव, **भगहा** ऐसेंच नाम तो धरितो ॥ ५९ ॥
आनंद असे ज्याला, नित्यानंदस्वरूप जो राहे ॥
संपत्समृद्ध ह्मणउनि, **आनंदी** नाम हें तया आहे ॥ ६० ॥
जी भूतसूक्ष्मनिर्मित, माळ जिला वैजयंति ही ह्मणती ॥
ती यत्कंठीं शोभे, **वनमाली** नाम हें तया देती ॥ ६१ ॥
आपादलंबिनी जी, माला कवि ह्मणति तीस वनमाला ॥
कंठीं शोभे ज्याच्या, **वनमाली** नाम ठेविलें त्याला ॥ ६१ ॥
हलनामें आयुध जें, ज्याच्या हातीं सदैवही राहे ॥
बलभद्ररूप ह्मणउनि, नाम **हलायुध** असें तया आहे ॥ ६२ ॥
कश्यपमुनिपासुन जो, वामनरूपेंचि आदितिला झाला ॥
यास्तव **आदित्य** असें, साधूंनीं नाम ठेविलें त्याला ॥ ६३ ॥

---

१ आकाशाला. २ मनःसंकल्पानें. ३ भक्ताला. ४ घेतल्यापेक्षां अनंतपट देतो. ५ संपत्ति, धर्म, यश, श्री ज्ञान, वैराग्य असे सहा प्रकारचें. ६ पूर्वोक्तषड्विध ७ नांगर. ८ कश्यपाच्या स्त्रीच्या पोटीं.

ज्योतींचें[1] मंडल त्या, मध्यें आदित्यरूप जो राहे ॥
यास्तव त्याला ज्योतिः, पूर्वकआदित्य[+] नाम हें आहे ॥ ६४ ॥
शीतोष्णादि द्वंद्वें, किंवा भक्तापराध साहतसे ॥
यास्तव **सहिष्णु** ऐसें, नाम तया योग्य कविस वाटतसे ॥ ६५ ॥
जो परमा गति देतो, उत्तम आधार आत्मनिष्ठाला ॥
यास्तव कविजन ह्मनती, **गतिसत्तम** नाम जाहलें त्याला ॥ ६६ ॥
जें इंद्रियादिमय धनु, शार्ङ्ग[2] सुशोभन जयाजवळि नांदे ॥
त्यास **सुधन्वा** ऐसें, नाम असे तोच अभय सुजनांदे ॥ ६७ ॥
खंडनकर्ता परशू, जो धरितो जामदग्न्यरूपानें ॥
यास्तव **खंडपरशु** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ६८ ॥
भक्तांला सौम्य असे, परि दारुण भासतो विरोध्यांला ॥
दैत्यांचें दारण करि, ह्मणुनि असे नाम **दारुण** तयाला ॥ ६९ ॥
द्रविणाची[3] इच्छा जे, करिती त्यांला यथेष्ट तें देतो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **द्रविणप्रद** नाम आपणा घेतो ॥ ७० ॥
वामन असतां केला, स्पर्श स्वर्गास वाढुनी ज्यानें ॥
ह्मणऊनि **दिवस्पृक्** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ७१ ॥
सर्वज्ञ असुनि जेणें, विभागिलें भिन्नभिन्न वेदास ॥
तो हाच ह्मणुनि त्याला, ठेवियलें नाम **सर्वदृग्व्यास** ॥ ७२ ॥
असुनि पती विद्यांचा, योनीपासूनि ज्यास जन्म नसे ॥
याजमुळें **वाचस्पति, अयोनिज** असेंच नाम त्यास असे ॥ ७३ ॥

---

१ तेजाचें. २ शार्ङ्ग नामक. ३ धनाची. + ज्योतिरादित्य येवढें नाम.

देवव्रताभिध[1] अशीं, जीं सामें तीन तीं स्तविति ज्याला ॥
ह्मणऊनियां **त्रिसामा**, नाम असें जाहलें असे त्याला ॥ ७४ ॥
आत्म्यास[3] रंजवाया, आनंदें सामगान जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **सामग** हें नाम आपणा धरितो ॥ ७५॥
वेदांत सामनामा, वेद असें मी[4] असें स्वयें ह्मणतो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **साम** असें नाम आपणा धरितो ॥ ७६ ॥
जौंती समस्त दुःखें, ऐसें आनंदरूप जें स्थान ॥
तें हाँच ह्मणुनि झालें, **निर्वाण** असें तयास अभिधान ॥ ७७ ॥
नामेंचि अच्युतादिक[7], ज्याचीं नाशिति भवाख्यरोगाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **भेषज** हें नाम जाहलें त्याला ॥ ७८ ॥
संसाररोगनाशक, विद्या उपदेशितो जनाला जो ॥
यास्तव झालें त्याला, **भिषक्** असें नाम तें तया साजो ॥ ७९ ॥
द्याया मोक्ष जनाला, केला आश्रम चतुर्थ तो ज्यानें ॥
यास्तव अपुली केली, आख्या **संन्यासकृत्** अशी त्यानें ॥ ८० ॥
शमें हेंच मुख्य साधन, ऐसा उपदेश करि यतिजनाला[10] ॥
यास्तव कविजन ह्मणती, **शम** ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ८१ ॥
विषयसुखीं संग नसे, ज्याचा ज्याला सदा समाधान ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, त्यास असे **शांत** हेंच अभिधान ॥ ८२॥
ज्याचेठायीं प्रळयीं, भूतांचें होतसे अवस्थान[11] ॥
यास्तव कवि ह्मणति तया, झालें **निष्ठा** असेंच अभिधान[12] ॥ ८३ ॥

---

१ देवव्रत नामक. २ सामें. ३ स्वाचित्तास. ४ वेदानांसामवेदोस्मीति गीतायां. ५ जें स्थान प्राप्त झालें असतां दुःखें जातात. ६ ईश्वरच. ७ अच्युतानंतगोविंद इत्यादि. ८ संन्यासाश्रम. ९ शांति. १० संन्यासाला. ११ स्थिति. १२ नाम.

जी सकल अविद्येची, निवृत्ति ती शांति हें मनीं आणा ॥
ती ब्रह्मरूप ह्मणउनि, **शांति** च हें नाम त्याजला जाणा ॥ ८४ ॥
पुनरावृत्ति नसे ज्या, पासुनि ऐसेंच उत्तम स्थान ॥
यास्तव ह्मणती झालें, त्यास **परायण** असेंच अभिधान ॥ ८५ ॥
शोभन ज्याचीं अंगें, जीं देती चिंतनेंचि भव्याला ॥
यास्तव **शुभांग** ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ८६ ॥
निरसुनि रागद्वेषा, जो देतो शांति शुद्धचित्ताला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **शांतिद** हें नाम जाहलें त्याला ॥ ८७ ॥
सर्गाच्या आरंभीं, भूतें सारींच निर्मिलीं ज्यानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्रष्टा** हें नाम घेतलें त्यानें ॥ ८८ ॥
निजनिर्मित जी पृथ्वी, तिजवरि अवतरुनि हर्ष पावतसे ॥
यास्तव **कुमुद** असें हें, कविजन ह्मणती तयास नाम असे ॥ ८९ ॥
क्षीरोदधिच्या उदकीं, करितो शेषोदरावरी शयन ॥
यास्तव **कुवलेशय** हें, झालें आहे तयास अभिधान ॥ ९० ॥
गोरूपा भूमीचें, अवतारें भार हरुनि हित करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **गोहित** हें नाम आपणा धरितो ॥ ९१ ॥
गाईचें हितें केलें, गोवर्धन गिरिस उचलुनी ज्यानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **गोहित** हें नाम घेतलें त्यानें ॥ ९१ ॥
गोशब्दें भूम्यादिक, त्या सर्वांचाहि जो पती झाला ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **गोपति** हें नाम जाहलें त्याला ॥ ९२ ॥

---

१ नाम २ कल्याणाप्रत. ३ घालवून. ४ नाम. ५ कृष्णादि अवतारांच्या योगानें. ६ रक्षण. ७ भूमी, वाणी, गाई इत्यादि. * विश्वोत्पत्तीच्या

जो विश्वाचा रक्षक, मायेनें आपणास गुप्त करी ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **गोप्ता** हें नाम आपणास धरी ॥ ९३ ॥
धर्मस्वरूप ऐशी, किंवा वर्षे समस्त कामांतें ॥
ऐशी दृष्टि जयाची, यास्तव **वृषभाक्ष** नाम हें त्याचें ॥ ९४ ॥
वृष ह्मणती धर्माला, तो धर्म प्रिय असे सदा ज्याला ॥
यास्तव **वृषप्रिय** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ९५ ॥
देवासुरसंग्रामा, पासुन मागें कधीं न फिरला जो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अनिवर्ती** नाम त्याजला साजो ॥९६॥
किंवा धर्मप्रिय[1] हा, धर्मापासुन कधींहि न परतला[2] ॥
यास्तव **अनिवर्ती** हें, नाम तया तत्पदीं सुजन रतला[3] ॥ ९६ ॥
विषयापासुनि ज्याचा, निवृत्त आत्मा[4] असे स्वभावानें ॥
यास्तवाचि **निवृत्तात्मा**, ऐसें हें नाम घेतलें त्यानें ॥ ९७॥
विस्तारिल्या जगातें, संक्षेपी[5] प्रलयिं सूक्ष्मरूपानें ॥
यास्तव **संक्षेप्ता** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ९८ ॥
प्राप्तार्थांचें[6] रक्षण, किंवा कल्याण साधुचें करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, अभिधान[7] **क्षेमकृत्** असें धरितो ॥ ९९ ॥
निजनामस्मृतिमात्रें[8], निजभक्तांला पवित्र जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणति पुन्हा, **शिव** ऐसें नाम आपणा धरितो ॥ ६००॥

इतिषष्ठशतकसमाप्त. एकंदर आर्या ॥१०८॥

---

१ धर्म ज्याला प्रिय असा. २ धर्म सोडून मागे फिरला नाहीं. ३ रमला. ४ अंतःकरण ५ आटोपी. ६ भक्तास मिळालेल्या अर्थाचें. ७ नाम. ८ आपल्या नामाचें स्मरण भक्तानीं केलें असतां.

शतक सातवें.

श्रीवत्स चिन्ह ज्याच्या, ह्रदयावर शोभतें प्रभाधाम[१] ॥
यास्तव झालें आहे, त्याला श्रीवत्सवक्ष हें नाम ॥ १ ॥
ज्याच्या वक्षस्थानीं, श्रीलक्ष्मी नित्य करितसे वास ॥
यास्तव झालें आहे, नाम श्रीवास हें असें त्यास ॥ २ ॥
सोडुनि सर्वा देवां, वरिती झाली जया उदधितनया[२] ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें श्रीपति असेंच नाम तया ॥ ३ ।
जीस पराशक्ति[३] असें, ह्मणती तीचा असे प्रसिद्ध पती ॥
त्या मायापतिला कवि, लोकांत श्रीपती असें ह्मणती ॥ ३ ॥
वेदैश्रीनें[४] असती, श्रीमंत तयांत मुख्य जो आहे ॥
यास्तव त्याला संज्ञा, ठेवियली श्रीमतांवर अशी हे ॥ ४ ॥
श्री[५] ह्मणजे वेदत्रय, ती भक्ताला सदैव जो देतो ॥
यास्तव ह्मणतात कवी, श्रीद असें नाम आपणा घेतो ॥ ५ ॥
लक्ष्मीचा पति ह्मणुनि, श्रीश असें नाम जाहलें त्याला ॥
ह्मणुनि श्रीकामांनीं, पूजावें नित्य त्या रमेशाला ॥ ६ ॥
श्रीशब्दें श्रीमंताचि, यांचे ठायीं सदैव वास करी ॥
कवि ह्मणति आपणाला, यास्तवतो श्रीनिवास नाम धरी ॥ ७ ॥
धन[६]शोभामायांचा, ज्याचे ठायीं असे सदा वास ॥
यास्तव कवि ह्मणति श्री, निवास हें नाम जाहलें त्यास ॥ ७ ॥

---

१ तेजाचेंस्थान. २ समुद्रकन्या लक्ष्मी. ३ उत्कृष्ट मायाशक्ति. ४ वेदरूप संपत्तीनें. ५श्रीशब्दें वेदत्रय लक्षिजेतें. ६ धन, शोभा, आणि माया यांचा.

ज्याचेठायीं निखिल, श्री राहति सागरीं जशा आप[१] ॥
तोच **श्रीनिधि** त्याला, भजतां श्री येतसे घरिं अपाप ॥ ८ ॥
कर्मानुरूप देतो, जो विविध श्री समस्त भूतांतें ॥
याचमुळें नाम **श्रीविभावन** असेंच जाहलें त्यातें ॥९ ॥
भूतांची जननी जी, लक्ष्मी तिजला उरींच वाहतसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **श्रीधर** ऐसेंच नाम त्यास असे ॥ १० ॥
ज्याच्या करीं वसे श्री, भक्ताला श्री सदैव जो करितो[२] ॥
ह्मणुनि **श्रीकर** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ११ ॥
अव्यय[३] सुख ज्यांत वसे, मुनिगीत श्रेय जें असें पाहे ॥
तें ब्रह्मरूप यास्तव, नाम तया **श्रेय** ठेविलें आहे ॥ १२ ॥
लोकीं प्रसिद्ध जी श्री, ज्याच्या स्वाधीन ती सदा राहे ॥
यास्तव नाम **श्रीमान्**, पुनरपि हें त्यास जाहलें आहे ॥ १३ ॥
लोकत्रयास ज्याचा, आश्रय ऐसें समस्त मुनि गाती ॥
लोकत्रयाश्रय असें, यास्तव अभिधान त्यास कवि देती ॥ १४ ॥
श्वेतांभोजस्पर्धी[४], ज्याचीं अक्षी[५] सुशोभनें असती ॥
यास्तव त्या देवाला, **स्वक्ष** असें नाम साधुजन देती ॥ १५ ॥
शोभन ज्याचीं अंगें[६], जीं लक्ष्मीलोचनास लोभविती ॥
त्या लावण्यांबुधिला, **स्वंग** असें नाम साधुजन देती ॥ १६ ॥
ज्या आनंदात्म्याचे, शतधा आनंद या जगीं होती ॥
यास्तव मुनिजन त्याला, योग्य **शतानंद** नाम हें देती ॥ १७ ॥

---

१ उदकें. २ देतो. ३ अनश्वर. ४ शुभ्रकमलाची बरोबरीकरणारीं. ५ नेत्रें. ६ मुखभुजादि अवयव.

परमानंदाचि ज्याचा, विग्रह ह्मणऊनि नंदि हें नाम ॥
झालें आहे ह्मणती, यास्तव त्याला भजोत सुखकाम ॥ १८ ॥
नक्षत्रादि ज्योति, र्गण याचा ईश हा असें ह्मणती ॥
यास्तव त्याला ज्योति, र्गणेश्वर असेंच नाम कवि देती ॥ १९ ॥
मन होय परम दुर्जय, परि तें कुतुकेंचि जिंकिलें ज्यानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, विजितात्मा नाम घेतलें त्यानें ॥ २० ॥
ज्याचा आत्मा कोणी, वश्य कराया जगीं नसे शक्त ॥
यास्तव अविधेयात्मा, हें नाम तयास जाहलें व्यक्त ॥ २१ ॥
सत्या शुभ्रा निर्मळ, कीर्ति जयाची सदा स्थिरा राहे ॥
त्याला सत्कीर्ति असें, कवि ह्मणती नाम जाहलें आहे ॥ २२ ॥
सर्वहि साक्षात् बघतो, कोठें नाहींच संशय जयाला ॥
यास्तव नांव कवींनीं ठेवियलें छिन्न संशय तयाला ॥
सर्वां भूतांहुनिही, जो अधिकचि होऊनी जगीं राहे ॥
त्याला उदीर्ण ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें आहे ॥ २४ ॥
सर्वत्र दृष्टि ज्याची, ज्यास न दिसला असा पदार्थ नसे ॥
ह्मणऊनि सर्वतश्च, क्षु असें लोकीं तयास नाम असे ॥ २५ ॥
जो ईश समस्तांचा, ज्याला कोणी कधींच ईश नसे ॥
कविजन ह्मणती यास्तव, लोकीं त्याला अनीश नाम असे ॥ २६ ॥
शाश्वत असोनि जो स्थिर, केव्हांही विक्रिया नव्हे ज्याला ॥
यास्तव कविजन देती, अभिधानहि शाश्वतस्थिर तयाला ॥ २७ ॥

१ आनंदमय. २ मूर्ति. ३ स्वरूप. ४ गुणांनीं श्रेष्ठ. ५ विकार. ६ नाम

लंका१प्रयाणसमयीं, सागरतीरींच भूमिवर ज्यानें ॥
केलें शयन ह्मणउनी, **भूशय** हें नाम घेतलें त्यानें ॥ २८ ॥
स्वेच्छावतार घेउनि, आत्मगुणांहींच भूषवी क्षितिला ॥
यास्तव **भूषण** ऐसें ठेवियलें नाम त्या रमापतिला ॥ २९ ॥
ऐश्वर्य त्रिजगाचें, किंवा सत्तास्वरूप जो राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **भूति** असें नाम त्याजला आहे ॥ ३० ॥
गेला शोक जयाचा, परमानंदैकरूप सत्तेनें ॥
यास्तव **विशोक** ऐसें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ३१ ॥
स्मरतां धांवा करितां, भक्तांचा शोक दूर जो करितो ॥
यास्तवचि **शोकनाशन**, ऐसें हें नाम आपणा धरितो ॥ ३२ ॥
रविचंद्रास उजेळितें, ऐसें अर्ची३ महा असे ज्याला ॥
याकारणेंच कविनीं, **अर्चिष्मान्** नाम ठेविलें त्याला ॥ ३३ ॥
जो विश्वपूज्य ह्मणउनि, सुरमानव सर्व पूजिती ज्याला ॥
यास्तव कविनीं **अर्चित**, ऐसें हें नाम ठेविलें त्याला ॥ ३४ ॥
कुंभांत वारि४ तैसें, ज्याच्या उदरांत विश्व हें राहे ॥
यास्तव कविनीं त्याला, **कुंभ** असें नाम ठेविलें आहे ॥ ३५ ॥
ज्याचा विशुद्ध आत्मा५ कीं त्रिगुणाचा नसेचि संग६ जया ॥
ह्मणउनि **विशुद्धात्मा**, हें कविनीं ठेविलें सुनाम तया ॥ ३६ ॥
स्मृतिमात्रें पाप्याच्या, क्षाळण करितोचि पापपंकाचें७ ॥
यास्तव **विशोधन** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याचें ॥ ३७ ॥

---

१ लंकेत जाण्याच्या वेळेस. २ प्रकाशित करणारें. ३ तेज. ४ उदक. ५ स्वरूप ६ संबंध ७ पापरूप चिखलाचें.

ज्याचा कोठेंहि कधिंहि, निरोध[1] शत्रूकडून होतनसे ॥
यास्तव **अनिरुद्ध** असें, नाम पुन्हा त्यास जाहलेंच असे ॥ ३८ ॥
झाला नाहीं ज्याला, विप्रति[2]पक्षी कधीं असें ह्मणती ॥
यास्तव त्याला **अप्रति,रथ** ऐसें नाम साधुजन देती ॥ ३९ ॥
द्युम्नास द्रव्य ह्मणति, उत्कृष्ट द्युम्न तें असे ज्याचें ॥
वा[3] आहे व्यूहात्मा[4], ह्मणुनि **प्रद्युम्न** नांव हें त्याचें ॥ ४० ॥
ज्याच्या पराक्रमाचें, गणन कराया न शक्ति कोणाला ॥
ह्मणऊनि **अमितविक्रम**, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ४१ ॥
जो कालनेमिनामा, दानव तो सहज निवटिला[5] जेणें ॥
ह्मणऊनि **कालनेमिनि,हा** ऐसें नाम घेतलें तेणें ॥ ४२ ॥
गरुडाचें ईरण[6] करि, कीं मारी एकटाचि शत्रूतें ॥
यास्तव **वीर** असें हें, नाम पुन्हा जाहलें असे त्यातें ॥ ४३ ॥
शूर[7]कुळीं वसुदेवा, पासुनि भक्तप्रियार्थ उद्भवला ॥
जो यास्तव साधुजनीं, **शौरि** असें नाम ठेविलें त्याला ॥ ४४ ॥
जे शूर वासवादिक[8], त्यांचा ईश्वर तयांस इष्ट असे ॥
यास्तव **शूरजनश्वर**, हें नाम तयास ह्मणति योग्य दिसे ॥ ४५ ॥
आहे त्रैलोक्याचें, मुख्य अधिष्ठान[9] कीं[10] असे आत्मा[11] ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम तया जाहलें **त्रिलोकात्मा** ॥ ४६ ॥
ह्मणतें त्रैलोक्य जया, आह्मां आज्ञाधरांस तूं ईश ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम असे त्याजला **त्रिलोकेश** ॥ ४७ ॥

---

१ प्रतिबंध. २ बरोबरी करणारा शत्रु. ३ अथवा. ४ संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध वासुदेव या चार मूर्तींतला एक. ५ मारिला. ६ प्रेरणा. ७ शूरनामक यादवाच्या कुळांत. ८ इंद्रादिक. ९ त्रैलोक्य राहण्याचें स्थान. १० किंवा. ११ त्रैलोक्याचा आत्मा.

सूर्यादिकांत असती, जे अंशू[१] केश ते असति ज्याला ॥
यास्तव सर्वज्ञांनीं, केशव हें नाम योजिलें त्याला ॥ ४८ ॥
जो दैत्य केशिनामा, दुर्जय वधिला सलील[२] तो ज्यानें ॥
यास्तवचि आपणाला, धरिलें अभिधान[३] केशिहा त्यानें ॥ ४९ ॥
जो हरितो पापातें, किंवा संसारहेतुतें[४] हरितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, हरि ऐसें नाम आपणा धरितो ॥ ५० ॥
याचिति[५] भक्त जयाला, तो कामि[६] तसा असोनि जो देवं[७] ॥
त्या **कामदेव** ह्मणती, ठेवा त्याच्या पदीं मनोभाव[८] ॥ ५१ ॥
जो निजभक्तजनाच्या, कामाचें पालन स्वयेंकरितो ॥
तो **कामपाल** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ५२ ॥
भक्तार्पित वस्तूतें, घ्याया चित्तांत जो धरी काम[९] ॥
असतां निष्कामहि तो, **कामी** ऐसेंच पावला नाम ॥ ५३ ॥
द्विपरार्धाच्या[१०] अंतीं, ब्रह्म्याचा नाश होतसे ह्मणती ॥
ज्यापासून तयाला, **कांत** असें नाम साधुजन देती ॥ ५४ ॥
किंवा विश्वमनोहर, ऐसा अभिरूप[११] देह जो धरितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **कांत** असें नाम आपणा धरितो ॥ ५४ ॥
दावाया मार्ग जना, ह्मणती केल्या श्रुति स्मृती ज्यानें ॥
ह्मणऊनियां **कृतागम**, ऐसें अभिधान घेतलें त्यानें ॥ ५५ ॥
हें, तें, असें[१२], ह्मणुनि वपु, ज्याचें दावावयास शक्य नसे ॥
कीं जो अरूप निर्गुण, त्यास **अनिर्देश्यवपु**चि नाम असे ॥ ५६ ॥

---

१ किरण. २ लीलेनें. ३ नाम. ४ जन्ममरणाचें कारण जें कर्म त्यातें. ५ मागति. अर्थात् सुखादिक. ६ ज्यापाशीं मागतात तो काम. अर्थात् इष्टफलदाता. ७ देदीप्यमान, किंवा ईश्वर. ८ भक्ति. ९ इच्छा. १० ब्रह्मदेवाच्या शतवर्षांच्या अंतीं. ११ अतिसुंदर. १२ अमुकप्रकारचें असें.

ज्याची कांती व्यावा, पृथ्वीला वेष्टुनी अधिक राहे ॥
यास्तव **विष्णु** असें हें, नाम पुन्हा त्यास जाहलें आहे ॥ ५७ ॥
गतिमत्त्वादि जयाच्या, आंगीं विश्रुत विशुद्ध गुण असती ॥
यास्तव **वीर** असें हें, नाम तया जाहलें पुन्हा ह्मणती ॥ ५८ ॥
ज्याचा पार न लागे, जो अपरिच्छिन्न देशकालानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अनंत** हें नाम घेतलें त्यानें ॥ ५९ ॥
दिग्विजयीं धन जिंकी, ह्मणुनि धनंजयचि जाहला पार्थ ॥
तो मीच ह्मणे यास्तव, नाम **धनंजय** तया असे सार्थ ॥ ६० ॥
तप, वेद, जाति, चवर्थें, ज्ञान तयां ब्रह्म ह्मणति वेदांती ॥
त्यांला जो हितकारक, ह्मणुनि **ब्रह्मण्य** नाम त्या देती ॥ ६१ ॥
पूर्वोक्त ब्रह्माचा, लोकीं झाला प्रसिद्ध जो कर्त्ता ॥
तो **ब्रह्मकृत्** ह्मणावा, तोचि असे मानवांस उद्धर्त्ता ॥ ६२ ॥
ब्रह्म्याच्या रूपानें, विश्वाच्या सर्जनास जो करितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **ब्रह्मा** हें नाम आपणा धरितो ॥ ६३ ॥
मोठ्याहुनि जो मोठा, किंवा बृंहण जगास जो करितो ॥
सत्यादिलक्षणहिं जो, यास्तव तो **ब्रह्म** नाम हें धरितो ॥ ६४ ॥
तप आदिक पूर्वोक्त, ब्रह्माच्या वर्धनास जो करितो ॥
ह्मणुनि **ब्रह्मविवर्धन**, ऐसें तो नाम आपणा धरितो ॥ ६५ ॥
वेदातें वेदाच्या, अर्थातेंही यथार्थ जो जाणे ॥
ह्मणऊनि नाम लोकीं, आदरिलें **ब्रह्मवित्** असें तेणें ॥ ६६ ॥

---

१ गतिमान्. वेगवान्. मतिमान् इत्यादि. २ प्रख्यात. ३ पांडवानां धनंजय इति गीतावाक्यं. ४ मागील आर्येंत सांगितलेलें. ५ उत्पत्तीस. ६ वृद्धि. ७,६१ व्या आर्येंत सांगितलेलें.

वेदात्मक ह्मणउनि जो, लोकीं वेदप्रवर्त्तना[1] करितो ॥
यास्तव ह्मणती कविजन, तो **ब्राह्मण** नाम आपणा धरितो ॥ ६७ ॥
ज्ञानितपोवेदात्म, ब्रह्म जयांत प्रभूततर[2] राहे ॥
ह्मणुनि मुनि ह्मणति त्याला,**ब्रह्मी** हें नाम जाहलें आहे ॥ ६८ ॥
वेदस्वरूप यास्तव, जो जाणे स्वात्मभूत वेदातें ॥
ह्मणुनि कवी वदति जनीं, नाम **ब्रह्मज्ञ** जाहलें त्यातें ॥ ६९ ॥
जो आवडे द्विजांला, द्विजही ज्याला बहूत आवडती ॥
त्या **ब्राह्मणप्रिय** असें, ठेवुनियां नाम साधुजन गाती ॥ ७० ॥
मोठे असती ज्याचे, पादप्रक्षेप जे त्रिलोकातें ॥
त्यापिति यास्तव झालें, नाम **महाक्रम** असें जनीं त्यातें ॥ ७१ ॥
मोठें कर्म जयाचें, जगदुत्पत्यादिरूप जें ह्मणती ॥
ह्मणऊनि **महाकर्मा**, ऐसें हें नाम त्यास कवि देती ॥ ७२ ॥
ज्याच्या तेजें सूर्या,दिक तेजस्वी जगामधें दिसती ॥
यास्तवाचि **महातेजा**, ऐसें अभिधान[3] त्यास मुनि देती ॥ ७३ ॥
मोठा उरग जयाला, वासुकि ह्मणतात तो कला[4] ज्याची ॥
यास्तव **महोरग** अशी, आख्या कवि ह्मणति जाहली त्याची ॥ ७४ ॥
जो अश्वमेधनामा, महाक्रतू[5] तोच हा असें ह्मणती ॥
यास्तव **महाक्रतु** असें, नाम तयाला महामती[6] देती ॥ ७५ ॥
यज्ञ करुनियां मोठा, दीक्षित जनसंग्रहार्थ[7] जो झाला ॥
ह्मणऊनि **महायज्वा**, हें कविनीं नाम ठेविलें त्याला ॥ ७६ ॥

---

१ वेदप्रवृत्ति. २ ज्ञान, तप, वेद एतत्स्वरूप ब्रह्म ज्यांत पुष्कळ आहे तो ब्रह्मी. ३ नाम. ४ अंश. ५ मोठा यज्ञ. ६ विद्वान्. ७ लोकांत प्रवृत्ति होण्याकरितां.

सर्वां यज्ञांमध्यें, जो मोठा त्यास ह्मणति जपयज्ञ ॥
तो[1] मी असें प्रभु ह्मणे, ह्मणुनि तया नाम हें **महायज्ञ** ॥ ७७ ॥
ब्रह्माग्नींत सकल जग, आत्मत्वें हविच होमिलें जातें ॥
यास्तव **महाहवि** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्यातें ॥ ७८ ॥
सर्वांहीं स्तविजेतो, कोणाच्याही करी न जो स्तुतिला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्तव्य** असें नाम जाहलें त्याला ॥ ७९ ॥
जो जो स्तव जन करिती, तो तो बहु गोड वाटतो ज्याला ॥
ह्मणऊनियां **स्तवप्रिय**, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ८० ॥
ज्या शब्दांनीं हरिची, स्तुति घडते स्तोत्र ह्मणति मुनि त्याला ॥
तें हरिरूपचि आहे, ह्मणउनियां **स्तोत्र** नाम देवाला ॥ ८१ ॥
समजावी ती स्तुति हरि, गुणकीर्तनरूप जी क्रिया घडती ॥
ती हरिरूपचि ह्मणती, ह्मणुनि **स्तुति** नाम कवि तया देती ॥ ८२ ॥
जो प्रेमानें हरिला, स्तवितो स्तोता असें तया ह्मणती ॥
तो हरिरूपचि ह्मणुनि, **स्तोता** ऐसेंच नाम त्या देती ॥ ८३ ॥
दैत्यांशीं संग्रामचि[3], भूभरहरणार्थ आवडे ज्याला ॥
यास्तव **रणप्रिय** असें, भक्तांनीं नाम ठेविलें त्याला ॥ ८४ ॥
सकलांहीं कामांहीं, शक्तींहीं युक्त जो सदा राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **पूर्ण** असें नाम जाहलें आहे ॥ ८५ ॥
आपण पूर्ण असोनीं, भक्तांला पूर्ण जो तसा करितो ॥
यास्तव **पूरयिता** हें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ८६ ॥

---

१ यज्ञानांजपयज्ञोस्मीति गीतावचनं. २ अग्नींत होमिलेलें हवि जसें अग्निरूप होतें तसें सकल जग ब्रह्मस्वरूपीं आत्मरूपानें रहातें तें ब्रह्मस्वरूप ह्मणून महाहवी हें नाम. ३ युद्ध.

ज्याच्या स्मरणें मोठ्या, पाप्यांचीं पातकें मही जाती ॥
तो पुण्यात्मा यास्तव, पुण्य असें नाम त्यास कवि देती ॥ ८७ ॥
पुण्या कीर्ति जयाची, कीं देते पुण्य कीर्तिही ज्याची ॥
यास्तवचि **पुण्यकीर्ती**, आख्या ऐशीच जाहली त्याची ॥ ८८ ॥
आंतरें बाह्य अशा त्या, व्याधींनीं जो न पीडिला जातो ॥
यास्तव **अनामय** असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ८९ ॥
वेग मनाचा जैसा, तैसा गमनास वेग जो वरितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, नाम **मनोजवचि** आपणा धरितो ॥ ९० ॥
पतितांला भक्तांला, स्वस्पर्शानें पवित्र जो करितो ॥
यास्तव **तीर्थकर** असें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ९१ ॥
जो सकलां विद्यांचा, उपदेष्टा जाहला असें ह्मणती ॥
यास्तव **तीर्थकर** असें, नाम तयालागिं साधुजन देती ॥ ९१ ॥
ज्याच्या रेतापासुनि, अंडे हिरण्मयचि जाहलें ह्मणती ॥
यास्तव **वसुरेता** हें, नाम तयाला श्रुतिज्ञ जन देती ॥ ९२ ॥
जो मुख्य धनाध्यक्षचि, ह्मणुनि विशेषें करूनि धन देतो ॥
यास्तव **वसुप्रद** असें, नाम कवी ह्मणति आपणा घेतो ॥ ९३ ॥
दुसरें वसु मोक्षाख्यचि, भक्तांला देतसे प्रकर्षानें ॥
यास्तव पुन्हा **वसुप्रद**, ऐसें हें नाम घेतलें त्यानें ॥ ९४ ॥
झाला वसुदेवात्मज, जन्मांतरच्या वरप्रसादानें ॥
यास्तव धरिलें ह्मणती, नाम पुन्हा **वासुदेव** हें त्यानें ॥ ९५ ॥

---

१ महापातकें. २ पवित्र. ३ किंवा. ४ आंतील. ५ बाहेरील. ६ अंगीकारितो. ७ उपदेश करणारा. ८ ब्रह्मांड बीज. ९ विशेषें करून. १० पूर्व जन्मींच्या.

वसतात ज्यांत भूतें, भूतांमध्यें स्वयेंहि वास करी ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **वसु** ऐसें नाम आपणास धरी ॥ ९६ ॥
सर्वां विषयांमध्यें, जें वसतें त्यास वसु असें ह्मणती ॥
वसु आहे मन ज्याचें, त्याला अभिधान **वसुमना** देती ॥ ९७ ॥
ब्रह्मार्पणमित्यादि[1], श्लोकीं गीतेंत जें हवी कथिलें ॥
तें ब्रह्मरूप ह्मणउनि, **हवि** ऐसें नाम त्या पुन्हा दिधलें ॥ ९८ ॥
आहे ब्रह्म असें जे, ह्मणती[2] ते संत त्यांस जो सुगती ॥
देतो यास्तव त्याला, **सद्गति** ऐसेंच साधुजन ह्मणती ॥ ९९ ॥
विश्वांत जगद्रक्षण, रूपा ऐशी असे कृती ज्याची ॥
यास्तव ह्मणती आख्या, **सत्कृति** ऐशीच जाहली त्याची ॥ ७०० ॥

इति सप्तमशतक समाप्त. एकंदर आर्या १०४

---

१ ब्रह्मार्पणंब्रह्महविर्ब्रह्माग्नौब्रह्मणाहुतमिति. २ ब्रह्म आहे खरें असें ह्मणणारे जे आस्तिक त्यांस.

शतक आठवें.

अस्तित्वरूप किंवा, सर्वाधिष्ठानरूप अनुभूती[1] ॥
ती सत्ता तद्रूपचि, ह्मणउनि सत्ता असें तया ह्मणती ॥ १ ॥
ज्या पासुनि संताला, मिळतें ऐश्वर्य कवि असें गाती ॥
यास्तव दिधलें आहे, साधूंनीं त्यास नाम सद्भूती ॥ २ ॥
जे संत तत्ववेत्ते, त्यांचें प्राप्य[2] प्रकृष्ट जो स्थान ॥
ह्मणऊनि सत्परायण, ऐसें दिधलें तयास अभिधान ॥ ३ ॥
शूराधिष्ठित[3] ज्याची, सेना ऐसेंच वर्णिति पुराणें ॥
यास्तव ह्मणती आख्या, आदरिली शूरसेन ही त्याणें ॥ ४ ॥
यदु ते यादव जाणा, त्यां मध्यें श्रेष्ठ होउनी राहे ॥
ह्मणुनि यदुश्रेष्ठ असें, हें नाम तयास जाहलें आहे ॥ ५ ॥
जे साधु संत विद्वान्, त्यांचा आश्रय असें जया ह्मणती ॥
यास्तव सर्वज्ञ कवी, नाम तया सन्निवास हें देती ॥ ६ ॥
ज्याच्या योगें शोभन यमुना, संबंधि देश तो झाला ॥
अथवा वारि[4] ह्मणुनियां, अभिधान[5] असे सुयामुन तयाला ॥ ७ ॥
शोभन ज्याचे यामुन[6], परिवेष्टे[7] गोपवेषधर असती ॥
यास्तव सुयामुन असें, नाम तया योगयुक्त[8] मुनि देती ॥ ७ ॥
ज्याचे ठायीं सर्वहि, भूतें वसतात आभिमुख्यानें ॥
यास्तव ह्मणती भूता, वास असें नाम घेतलें त्यानें ॥ ८ ॥

---

१ अनुभव. २ गम्य. ३ शूर पुरुषांनीं परिपूर्ण. ४ जल. ५ नाम. ६ यमुनातीरीं रहाणारे. ७ वाढपी. ८ योगी.

आच्छादितो जगातें, जो मायेनेंचि वासु[1] त्या ह्मणती ॥
वासु असुनि देवें[2]हि जो, नाम तया **वासुदेव** हें देती ॥ ९ ॥
सर्व प्राणो[3]पाधिक, जीव जिथें पावतात निलयातें[4] ॥
यास्तवचि शास्त्रवेत्ते, **सर्वासुनिलय** असें ह्मणति त्यातें ॥ १० ॥
संपत्ति शक्ति यांची, पर्याप्ती[5] ही कधीं नसे ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अनल** असें नाम जाहालें त्याला ॥ ११ ॥
धर्मविरुद्धपथानें, वागति त्यांचाच दर्प[6] जो हरितो ॥
तो नाम आपणाला, कवि ह्मणती **दर्पहा** असें धरितो ॥ १२ ॥
जे धर्मपथें वागति, त्यांला तद्विषय[7] गर्व जो देतो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **दर्पद** हें नाम आपणा घेतो ॥ १३ ॥
स्वानंदरसास्वादन, तृप्त्युत्थसुखप्रमत्त[8] जो झाला ॥
यास्तव साधुजनांनीं, ठेवियलें **दृप्त** नाम हें त्याला ॥ १४ ॥
ज्याचें धारण ह्रदयीं, करिती दुःखें[9]चि तत्प्रसादानें[10] ॥
यास्तव कविजन ह्मणती, **दुर्धर** हें नाम धरियलें त्यानें ॥ १५ ॥
आंतिल बाहेरिल जे, शत्रू त्यांहीं नव्हे पराजित तो ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **अपराजित** नाम आपणा धरितो ॥ १६ ॥
विश्वव्यापक आहे, मूर्ति जयाची असें श्रुती[11] गाती ॥
ह्मणऊनि **विश्वमूर्ती**, ऐसें हें नाम त्यास मुनि देती ॥ १७ ॥
मोठी मूर्ति जयाची, जीला आनंदलक्षणा ह्मणती ॥
यास्तवाचि **महामूर्ती**, ऐसें अभिधान[12] त्यास मुनि देती ॥ १८ ॥

---

१ आच्छादक. २ देदीप्यमान. ३ प्राणयुक्त. ४ अत्यंत लयातें. ५ पूर्ती. ६ गर्व. ७ धर्म रक्षणाचा गर्व. ८ निजानंदरूप रसाच्या उपभोगानें जी तृप्ति तीपासून उत्पन्न जें सुख त्यानें प्रमत्त. ९ आयासानें. १० ईश्वरकृपेनें. ११ वेद. १२ नाम.

ज्ञानमयी मूर्त्ति असे, किंवा तेजोमयी असे ज्याची ॥
ह्मणउनि **दीप्तमूर्ती**, ऐशी आख्या जनीं असे त्याची ॥ १९ ॥
जशि जीवाला तैशी, कर्मार्जित मूर्ति ती नसे ज्याला ॥
यास्तव साधुजनानीं, **अमूर्त्तिमान्** नाम ठेविलें त्याला ॥ २० ॥
अवतरूनि भूमिवर जो, भक्तार्थ अनेक मूर्तितें धरितो ॥
यास्तव **अनेकमूर्ती**, ऐसें तो नाम आपणा धरितो ॥ २१ ॥
धरितो व्यक्ति बहुत परि, पर[1]मार्थी [2]व्यक्तिशून्य जो राहे ॥
यास्तव **अव्यक्त** असें, कवि ह्मणती नाम त्याजला आहे ॥ २२ ॥
शतशा मूर्ति जयाच्या, असती [3]कीं विश्वरूप जो नट[4]ला ॥
ह्मणउनि **शतमूर्त्ति** असें, ठेवियलें सा[5]र्थ नाम त्या प्रभुला ॥ २३ ॥
मूर्ति जशा [6]शत असती, असति तशीं आननेंहि [6]शत ज्याला ॥
यास्तव **शतानन** असें, साधुजनीं नाम ठेविलें त्याला ॥ २४ ॥
भेद[7]त्रयरहितत्वें, जो केवळ एकरूपची राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **एक** असें नाम त्याजला आहे ॥ २५ ॥
एकहि असतां धरितो, निजमायेनें अनेकरूपांतें ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **नैक** असें नाम जाहलें त्यातें ॥ २६ ॥
सोमा[8]चें कं[9]डण ज्या, मध्यें त्या अध्वरास सव ह्मणती ॥
तो विष्णुरूप यास्तव, **सव** ऐसें नाम त्यास कवि देती ॥ २७ ॥
सुख लक्षिती क[10]शब्दें, सुखशब्दें लक्षिती तया प्रभुला ॥
[11]कीं तो सुखरूप ह्मणुनि, झालें **क** असेंच नामाहि तयाला ॥ २८ ॥

---

१ खरें पाहिलें तर. २ मूर्त्तिशून्य. ३ किंवा. ४ झाला. ५ यथायोग्य. ६ शतशः अनंत. ७ सजातीयविजातीय स्वगत भेदशून्यत्वें. ८ सोमवल्लीचें. ९ रस काढण्याकरितां कांडणें. १० क ह्मणजे सुख सुख ह्मणजे ब्रह्म. ११ कारण कीं.

किं[१] प्रश्नाचा विषय, ब्रह्मचि कीं तें विचारणीय भलें ॥
सर्वपुरुषार्थरूपचि, यास्तव **किं** हें तयास नाम दिलें॥ २९ ॥
यच्छब्द[२] दाखवीतो, उद्देश्यत्वेंचि सिद्धवस्तूला ॥
तैसें ब्रह्मचि यास्तव, **यत्** ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ३० ॥
तच्छब्द विधेयत्वें, दाखवितो स्पष्ट सिद्धवस्तूला ॥
तैसें ब्रह्मचि यास्तव, **तत्** ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ३१ ॥
ज्याला मुमुक्षु पावति, ऐसें उत्कृष्ट जें असे स्थान ॥
तें हाच यास्तव **अनुत्तमपद** हें होय त्यास अभिधान ॥ ३२ ॥
दावूनियां हिताहित, लोकांचें बंधुकृत्य[३] जो करितो ॥
तो **लोकबंधु** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ३३ ॥
जो स्वामी लोकांचा, मोक्षादिक लोक मागती ज्याला ॥
यास्तव कविनीं दिधलें, नाम खरें **लोकनाथ** हें त्याला ॥ ३४ ॥
लक्ष्मीचा धव किंवा, लोकीं जो मधुकुळांत उद्भवला ॥
यास्तव **माधव** ऐसें, सत्कविनीं नाम ठेविलें त्याला ॥ ३५ ॥
माय जशी बाळाचें, भक्तांचें प्रेम मानसीं धरितो ॥
ह्मणऊनि **भक्तवत्सल**, ऐसें तो नाम आपणा वरितो ॥ ३६ ॥
सोन्याचा वर्ण जसा, तैसा जो वर्ण आपणा वरितो ॥
ह्मणऊनि आपणा तो, अभिधान[४] **सुवर्णवर्ण** हें धरितो ॥ ३७ ॥
ज्याच्या भव्यांगावर[५], हेमालंकार दिव्य बहु असती ॥
हेमानिभ अंग ज्याचें, यास्तव **हेमांग** त्यास कवि ह्मणती ॥ ३८ ॥

---

१ किं विचारणीयं ब्रह्म २ यत् अस्ति तत् ब्रह्म ३ बंधूनीं करावयाचें कृत्य. ४ नाम.
५ स्वतः शोभमान अंगावर.

ज्याचीं करचरणादिक, अंगें दिव्यें सुशोभनें दिसती ॥
यास्तव **वरांग** ऐसें, नाम तयालागि भक्तजन देती ॥ ३९ ॥
आल्हादजनक[1] ज्याच्या, बाहूंवर बाहुभूषणें असती ॥
यास्तव तत्वज्ञकवी, नाम तया **चदनांगदी** देती ॥ ४० ॥
जो मारी संग्रामीं, धर्मत्राणार्थ दैत्यवीरांतें ॥
यास्तव कविजन देती, लोकीं अभिधान[2] **वीरहा** त्यातें ॥ ४१ ॥
लोकविलक्षण[3] यास्तव, ज्यासम कोणीहि या जगांत नसे ॥
ह्मणउनि कविजन ह्मणती, **विषम** असें नाम हें तयास असे ॥ ४२ ॥
जो निर्विशेष[4] आहे, यास्तव जो सर्वधर्मशून्य दिसे ॥
ह्मणउनि कविजन ह्मणती, **शून्य** असें नाम त्यास योग्य दिसे॥ ४३ ॥
ह्मणती ज्याच्या संतत, आशीर्धारा[5] जगावरी गळती ॥
कीं तो कृपाळु आहे, ह्मणुनि **घृताशी** असें तया ह्मणती ॥ ४४ ॥
न घडे निजस्वरूपा, पासून कदापिही चलन ज्याचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अचल** असें नाम जाहलें त्याचें ॥ ४५ ॥
घडतें चलन जयाचें, प्रतिक्षणीं प्राणवायुरूपानें ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **चल** ऐसें नाम घेतलें त्यानें ॥ ४६ ॥
जीं जीं अनात्मवस्तू[6], त्यांचा अभिमान लव नसे ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम **अमानी** असें असे त्याला ॥ ४७ ॥
भक्तांचीं लघु गुरुहीं, कार्यें साधावयास जो झटतो ॥
ह्मणुनि **अमानी** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ४७ ॥

---

१ आनंद देणारीं. २नाम. ३लोकोत्तर. ४भेदकगुणरहित. ५आशीर्वादरूप घृताच्या धारा. ६ जड, अचेतन.

जो देहादिजडाचा, देतो अभिमान आत्ममायेनें ॥
भक्ता दे मान ह्मणुनि, **मानद** हें नाम घेतलें त्यानें ॥ ४८ ॥
सर्वेश्वर ह्मणउनियां, सर्वांला पूजनीय जो होतो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **मान्य** असें नाम आपणा घेतो ॥ ४९ ॥
जो तीनें कीं चतुर्दश[1], लोकांचा मुख्य ईश्वरचि झाला ॥
यास्तव झालें **लोक,स्वामी** ऐसेंच नाम हें त्याला ॥ ५०॥
निजशक्तीच्या योगें, जो करितो धारण त्रिलोकाचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **त्रिलोकधृत्** नाम जाहलें त्याचें ॥ ५१॥
कुशल सुशोभन ऐशी, प्रज्ञा[2] स्वाभाविकी असे ज्याची ॥
कविजन ह्मणती आख्या, ह्मणुनि **सुमेधा** अशी असे त्याची ॥ ५२ ॥
जो यज्ञांत निजहवि, भोगातें घ्यावया प्रकट होतो ॥
यास्तव तो **मेधज** हें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ५३ ॥
ज्ञानानें शक्तीनें, ऐश्वर्यानें कृतार्थ जो झाला ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **धन्य** असें नाम जाहालें त्याला ॥ ५४ ॥
सत्या मेधा ह्मणजे, मेधाकृतकल्पना खरी ज्याची ॥
यास्तवचि **सत्यमेधा**, ही आख्या ह्मणति जाहली त्याची ॥५५॥
शेषादि निजांशांहीं, पृथ्वीच्या धारणास जो करितो ॥
यास्तव **धराधर** असें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥५६॥
आदित्याच्या रूपें, अंभांची[3] वृष्टि जो सदा करितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **तेजोवृष** नाम आपणा धरितो ॥५७ ॥
द्युति ह्मणजे अंगगता, कांती भव्या सुशोभना वरितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **द्युतिधर** हें नाम आपणा धरितो ॥ ५८ ॥

---

१ तीन लोकांचा किंवा चवदा भुवनांचा. २ बुद्धि. ३ उदकांची.

जो सर्वशस्त्रधर्त्ते, त्यांमध्यें श्रेष्ठ शक्तिसद्धाम ॥
ह्मणऊनि सर्वपूर्वक, शस्त्रभृतांवर असें तया नाम ॥ ५९ ॥
प्रेमानें जो भक्ता, र्पित वस्तूच्या प्रतिग्रहा करितो ॥
ह्मणुनि प्रग्रह ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥६० ॥
दुर्दांतेंद्रियवाजी, स्वैर विषयकाननांत धांवति जे ॥
त्यांला बांधी ह्मणुनि, प्रग्रह हें नाम त्याजला साजे ॥ ६०॥
निजशक्तीनें शासन, सर्वांला तद्धितार्थ जो करितो ॥
यास्तव तो निग्रह हें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ६१ ॥
अग्र ह्मणति नाशाला, नाहीं तो नाश सवर्था ज्याला ॥
भक्तार्थ चंचलहि वा, ह्मणुनि असे व्यग्र नाम हें त्याला ॥ ६२ ॥
अथवा यावत्कर्मा, विषयीं व्याकुल कधीं असेना तो ॥
यास्तव अव्यग्र असें, भक्त ह्मणति नाम आपणा घेतो ॥ ६२ ॥
श्रृंगें चार जयाला, असती यावरुनि दीप्तिचें धाम ॥
अग्निस्वरूप जाणा, यास्तव त्या नैकशृंग हें नाम ॥ ६३ ॥
निगदेंचि अग्रभागीं, होतो ऐसें जया मुनी ह्मणती ॥
लोपवुनि निवर्णातें, नाम गदाग्रज असें तया देती ॥६४॥
किंवा गदनामा जो, बंधू त्याहून जो असे ज्येष्ठ ॥
यास्तव गदाग्रज असें, नाम तयालागिं ठेविती श्रेष्ठ ॥ ६४ ॥
मूर्ती चार जयाच्या, विराट् इत्यादि वर्णिल्या असती ॥
किंवा शुक्लादि ह्मणति, ह्मणुनि चतुर्मूर्ति नाम त्या देती ॥ ६५॥

१शक्तीचें मुख्य स्थान. २ सर्वशस्त्रभृतांवर इतकें नाम. ३ उन्मत्त जे इंद्रियरूप अश्व. ४ यथेच्छ. ५ विषयरूप वनांत ६ जीवकल्याणार्थ. ७ वेदोक्त स्तवनानें. ८निगद यांतील नि- वर्णाचा लोप करून ९ भ्राता. १०विराट्, सूत्रात्मा, अव्यक्त, तुरीय. ११शुक्ला, रक्ता पीता, कृष्णा.

पुषार्थ चार[१] द्याया, बाहूही चार घेतले ज्यानें ॥
ह्मणुनि चतुर्बाहु असें, धरिलें कवि ह्मणति नाम हें त्यानें ॥ ६६ ॥
चार व्यूह[२] जयाचे, शरीरपुरुषादि वर्णिले असती ॥
ह्मणुनि चतुर्व्यूह असें, अभिधान तयास साधुजन देती ॥ ६७ ॥
जो चार आश्रमांला[३], वर्णांला[४] उत्तमा गती देतो ॥
यास्तव चतुर्गति असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ६८ ॥
रागद्वेषादिरहित, आहे ह्मणऊनि चतुर मन ज्याचें ॥
यास्तव कवि जन ह्मणती चतुरात्मा नाम जाहलें त्याचें ॥ ६९ ॥
चित्त मनो बुद्धि अहंकार असे चार भेद ज्या असती ॥
ऐसा आत्मा ज्याचा, चतुरात्मा नाम त्यास मुनि देती ॥ ६९ ॥
ज्यापासुनि धर्मादिक, मोठे पुरुषार्थ चार उद्भवती ॥
यास्तव त्या विष्णूला, नाम चतुर्भाव हेंच मुनि देती ॥ ७० ॥
जो चारी वेदांचा, अर्थ यथावत् समग्र जाणतसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम चतुर्वेदवित् तयास असे ॥ ७१ ॥
ज्याच्या एका पादीं, चवदा भुवनें समावलीं[५] असती ॥
ह्मणऊनि विश्वरूपा, त्याला मुनि एकपात्, असें ह्मणती ॥ ७२ ॥
संसाररूपचक्र, भ्रमवुनि फेरे पुनः पुन्हा देतो ॥
ह्मणुनि समावर्त असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ७३ ॥
सर्वत्र व्याप्त ह्मणुनि, कोठुनिहीं जो कधींहि न परतला ॥
यास्तव अनिवृत्तात्मा, ऐसें हें नाम जाहलें त्याला ॥ ७४ ॥

---

१ धर्म अर्थ काम मोक्ष. २ शरीरपुरुष, छंदःपुरुष, वेदपुरुष, महापुरुष. असे चार व्यूहह्म. मूर्त्ती. ३ ब्रह्मचर्यादि. ४ ब्राह्मणादि. ५ राहिलीं.

जो अतिकष्टानेंही, कोणा[1] जिंकावयास शक्य नसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **दुर्जय** हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ७५ ॥
सूर्यादिकांहि भयातें, धरूनि जयाचा अतिक्रम[2] न करिती ॥
यास्तव **दुरतिक्रम** हें, अभिधान तयास साधुजन देती ॥ ७६ ॥
दुर्लभ भक्तीनेंही, कष्टें भक्तांस लभ्य जो होतो ॥
यास्तव **दुर्लभ** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ७७ ॥
योग्यांनींही मोठ्या, कष्टानें सत्य जाणला जातो ॥
यास्तव **दुर्गम** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ७८ ॥
विघ्नं[3]बहुत्वासाठीं, दुःखानें ज्ञानगम्य जो होतो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **दुर्ग** असें नाम आपणा घेतो ॥ ७९ ॥
योगी समाधिकाळीं, कष्टें चित्तांत ज्यास राहविती[4] ॥
ह्मणुनि **दुरावास** असें, नाम तयालागिं योगिजन देती ॥ ८० ॥
दुर्धर दानव शत्रू, यांतें संहारितो स्वशक्तीनें ॥
यास्तव **दुरारिहा** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ८१ ॥
शोभन अवयव ज्याचे, मुनिला ध्यायास योग्य [5]जे असती ॥
यास्तव **शुभांग** ऐसें, ठेवुनियां नाम त्यास मुनि गाती ॥ ८२ ॥
भ्रमर जसा पुष्पांचा, लोकांचा सारभूत गुण वरितो[6] ॥
ह्मणऊनि लोक[7]पूर्वक, **सारंग** असेंच नाम तो धरितो ॥ ८३ ॥
विश्व प्रपंच ज्याचा, विस्तीर्ण असोनि फार शोभतसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सुतंतु** हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ८४ ॥

---

१ कोणाशत्रूला. २ उल्लंघन. ३ ब्रह्मज्ञानास विघ्नें फार ह्मणून प्रयासानें ज्ञानें करून जाणला जातो. ४ स्थिर करिती. ५ जे अवयव. ६ अंगीकारतो. ७ लोकसारंग इतकें नाम आहे.

जो वाढवितो किंवा, छेदितसे जो तया प्रपंचाला ॥
ह्मणऊनि **तंतुवर्धन**, नाम असें ह्मणति जाहलें त्याला ॥ ८५ ॥
इंद्र जसा देवांला, ऐश्वर्यें[1] जो जगास वागवितो ॥
ह्मणऊनि **इंद्रकर्मा**, ऐसें हें नाम आपणा धरितो ॥ ८६ ॥
मोठीं कर्में ज्याचीं, करितो उत्पन्न कीं महाभूतें ॥
ह्मणऊनि **महाकर्मा**, ऐसें हें नाम जाहलें त्यातें ॥ ८७ ॥
सारें कर्म[2] जयानें, केलें कर्तव्य किमपि ज्यास नसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, **कृतकर्मा** नाम त्यास योग्य असे ॥ ८८ ॥
वेदात्मक जो आगम, तो विश्वाधार निर्मिला ज्यानें ॥
यास्तव **कृतागम** असें, मुनि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ८९ ॥
उत्कृष्ट जन्म ज्याचें, कीं ज्यापासून विश्व उद्भवतें ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **उद्भव** हें नाम जाहलें त्यातें ॥ ९० ॥
विश्वातिशायि[3] ऐसें, सौभाग्य जयावरी सतत राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **सुंदर** हें नाम जाहलें आहे ॥ ९१ ॥
ऱ्हदयांतुन करुणारस, वाहे अतएव आर्द्र[4] जो राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **सुंद** असें नाम जाहलें आहे ॥ ९२ ॥
रत्नापरी सुशोभित, नाभि जयाची सदा बहु विराजे ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम तया **रत्ननाभ** हें साजे ॥ ९३ ॥
सुंदर लोचन ज्याचे, किंवा ज्ञानाचि सुशोभन जयाचें ॥
ह्मणऊनि **सुलोचन** हें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याचें ॥ ९४ ॥

---

१ ईश्वरीसामर्थ्यानें. २ जितकीं करावयाचीं तितकीं सारीं कर्में. ३ सर्वोत्कृष्ट. ४ ओला.

विश्वांत पूज्यतम जे, ब्रह्मादिक तेहि पूजिती ज्याला ॥
यास्तव **अर्क** असें हें, नाम पुन्हा साधु ठेविती त्याला ॥ ९५ ॥
वाज ह्मणाति अन्नाला, अन्नार्थी यांस वाज जो देतो ॥
यास्तव **वाजसन** असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ९६ ॥
प्रलयार्णवांत होउनि, मत्स्य धरी शृंग मस्तकावरि जो ॥
ह्मणउनि **शृंगी** ऐसें, मुनि ह्मणती नाम त्याजला साजो ॥ ९७ ॥
जो जयहेतू किंवा, अरि जिंकायास जड नसे ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **जयंत** हें नाम जाहलें त्याला ॥ ९८ ॥
सर्वज्ञ असोनि जगीं, दुर्जय शत्रूंस सहज जिंकितसे ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, नाम तया **सर्वविज्जयी** च असे ॥ ९९ ॥
शोभन वर्ण जयाचे, अवयव हि असें जया श्रुती गाती ॥
ह्मणऊनि नाम मुनिजन, **सुवर्णबिंदू** असें तया देती ॥ ८०० ॥
मंत्रांत वर्ण शोभन, असती तैसेच बिंदुही असती ॥
जो मंत्रात्मा यास्तव, **सुवर्णबिंदू** असें तया ह्मणती ॥ ८०१ ॥

इति अष्टमशतक समाप्त. एकंदर आर्या १०७

---

१ अन्न. २ मत्स्यावतार. ३ स्मरणें जय देणारा. ४ अवयवही शोभन. ५ अनुस्वार. गोविंद इत्यादि. ६ अक्षरें.

रागादिक शब्दादिक, विषयांहीं क्षोभै होइना ज्याला ॥
यास्तव **अक्षोभ्य** असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ १ ॥
जे सर्व ब्रह्मादिक, वाक्पति त्यांचा धनीच जो झाला ॥
यास्तवचि **सर्ववागी, श्वरेश्वर** असेंच नाम हें त्याला ॥ २ ॥
डोहचि आनंदाचा, योगी न्हाउनि जयांत विश्रमती ॥
यास्तव त्या भगवंता, साधु **महान्हद** असें जगीं ह्मणती ॥ ३ ॥
ज्याचा गर्त्त दुरत्यय, मायारूपी महा असें ह्मणती ॥
ह्मणऊनि वेदवेत्ते, नाम **महागर्त्त** हें तया देती ॥ ४ ॥
कालत्रयेंहि अनैव, च्छिन्नचि परमार्थसत्य ज्या ह्मणती ॥
ह्मणऊनि तत्ववेत्ते, नाम **महाभूत** हें तया देती ॥ ५ ॥
ह्मणती हीं ब्रह्मांडें, उदरीं ज्याच्या अनंत सांठवती ॥
यास्तव **महानिधि** असें, नाम तयाला श्रुतिज्ञजन देती ॥ ६ ॥
भार हरूनि पृथ्वीचा, तिजला आनंदयुक्त जो करितो ॥
ह्मणउनियां तो भगवान्, **कुमुद** असें नाम आपणा धरितो ॥ ७ ॥
कुंदासम शुभ्र फलें, घेतो किंवा जनास जो देतो ॥
यास्तव **कुंदर** ऐसें, मुनि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ८ ॥
किंवा वराहरूपें, जेणें केलें विदारण महीचें ॥
यास्तव **कुंदर** ऐसें, मुनि ह्मणती नाम जाहलें त्याचें ॥ ८ ॥
कुंदापरि आति सुंदर, अंग सुनिर्मळ सुशोभन जयाचें ॥
किंवा कुं देइ विप्रा, ह्मणउनियां **कुंद** नाम हें त्याचें ॥ ९ ॥

---

१ अंत:करणचांचल्य. २ खंदक. ३ अभिन्न. ४ वस्तुत्वें सत्य. ५ पृथ्वी. परशुरामावतारीं.

कामांस वर्षतो कीं, त्रितापतप्तांस शांत जो करितो ॥
यास्तव **पर्जन्य** असें, मुनि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ १० ॥
ज्याच्या स्मरणें पापी, पवित्र होती [1]समीररूपानें ॥
करितो शुद्ध जना जो, ह्मणुनि **पवन** नाम घेतलें त्यानें ॥ ११ ॥
प्रेरक नव्हे नव्हे जो, अज्ञ नव्हे गहन ही असें ह्मणती ॥
यास्तव वेदज्ञ मुनी, **अनिल** असें नाम त्याजला देती ॥ १२ ॥
अमृत [2]अनश्वर ऐशी, ज्याची [3]वांच्छा असे असें ह्मणती ॥
यास्तव **अमृताश** असें, अभिधान तयास साधुजन देती ॥ १३ ॥
[4]स्वात्मानंदामृतरस, याचें संततचि [5]अशन जो करितो ॥
किंवा [6]सुधाशन ह्मणुनि, **अमृताश** असें स्वनाम तो धरितो ॥ १३ ॥
मरणरहित वपु ज्याचें, ह्मणुनि तया **अमृतवपु** असें ह्मणती ॥
चुकवाया [7]मरणातें, त्यास करावी जनीं सदा प्रणती ॥ १४॥
सर्वज्ञ नाम त्याला, झालें कीं तोच जाणतो सर्व ॥
ह्मणुनि त्यापुढें कोणीं, स्वज्ञानाचा धरूं नये गर्व ॥ १५ ॥
जिकडे जिकडे पाहे, तिकडे तिकडे जया सुखें असती ॥
ह्मणऊनि **सर्वतोमुख**, ऐसें अभिधान त्यास मुनि देती ॥ १६ ॥
जो लभ्य सहज देतां, भक्तींनें पत्र पुष्प फल तोय ॥
ह्मणुनि **सुलभ** नाम तया, [8]हींच धरावी जनीं बरी सोय ॥ १७ ॥
व्रत [9]सद्रक्षणलक्षण, किंवा मितभोजनप्रभृति ज्याचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **सुव्रत** हें नाम जाहलें त्याचें ॥ १८ ॥

---

१ वायुरूपानें. २ अमृतह्मणजे अनश्वर ३ फलदेण्याची इच्छा. ४ निजानंदरूपअमृतरस ५ पान. ६ समुद्रमंथनोद्भव जें अमृत त्याचें अशन. ७ आपलें जन्ममरण चुकवाया. ८ भक्तीनें अर्पिण्याची. ९ साधुरक्षणरूप.

ज्याच्या सिद्धीविषयीं, कधीं अपेक्षा नसेचि अन्याची ॥
यास्तव ह्मणती आख्या, सिद्ध अशी जाहली पुन्हा त्याची ॥ १९ ॥
जे सुरशत्र ते निज, शत्रू जाणोनि त्यांस जिंकितसे ॥
ह्मणऊनि शत्रुजित् हें, ह्मणती लोकीं तयास नाम असे ॥ २० ॥
देवांच्या साधूंच्या, शत्रूंला ताप जो सदा देतो ॥
ह्मणऊनि शत्रुतापन, ऐसें तो नाम आपणा घेतो. ॥ २१ ॥
खालीं खालीं रोहण[1], होतें ज्याचें प्रपंचरूपानें ॥
यास्तव मुनिजन ह्मणती, धरिलें न्यग्रोध नाम हें त्यानें ॥ २२ ॥
अथवा समस्त भूतें, नीचि[2] करूनि रोधितो स्वमायेनें ॥
यास्तव मुनिजन ह्मणती, धरिलें न्यग्रोध नाम हें त्यानें ॥ २२ ॥
अन्न उदुंबर ह्मणती, तद्रूपें सर्व विश्व पोशितसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम उदुंबर, चि हें तयास असे ॥ २३ ॥
पासूनें[3] अंबराच्या, जो उद्भवलाचि कारणत्वानें ॥
ह्मणऊनि उदुंबर हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ २३ ॥
राहील उद्यां ऐसा, नाहिं भरंवसा जया प्रपंचाचा ॥
तद्रूप ह्मणुनि झाला, वाचक अश्वत्थ शब्द हा त्याचा ॥ २४ ॥
चाणूर आंध्रदशी, इव मल्ल तयास मारिता झाला ॥
याजमुळें चाणूरां, ध्रनिषूदन नाम जाहलें त्याला ॥ २५ ॥
असती अनंत ज्याला, अर्चीं[4] कीं ज्या सहस्रकर ह्मणती ॥
जो सूर्यरूप यास्तव, नाम सहस्रार्चि हें तया देती ॥ २६ ॥

---

१ वाढणें. ऊर्ध्वमूलमधःशाखमिति. २ खालीं करून. ३ अंबरापासून. ४ तेजें किरणरूप.

जिव्हा सात जयाला, काली[1] इत्यादिवर्णिल्या असती ॥
जो अग्निरूप ह्मणउनि, नाम तया **सप्तजिह्व** हें देती ॥ २७ ॥
सातचि एधें ह्मणजे, समिधा कीं दीप्ति हीं असति ज्याला ॥
जो अग्निरूप यास्तव, **सप्तैधा** नाम जाहलें त्याला ॥ २८ ॥
वाहति सात जयाला, अश्व असा अंबरांत जो[2] तपतो ॥
तो मीच ह्मणुनि आरण, नाम तसें **सप्तवाहन** चि घेतो ॥ २९ ॥
कीं एक सप्तनामा, अश्व जया वाहतो असा रवि जो ॥
तो हाच ह्मणुनि ह्मणती, नाम तया **सप्तवाहन** चि साजो ॥ २९ ॥
नाहीं मूर्ति जयाला, जो निरवयव निरीह निष्काम ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें त्याला **अमूर्त्ति** हें नाम ॥ ३० ॥
अघ ह्मणती पापाला, दुःखाला तें कधीं नसे ज्याला ॥
यास्तव कविह्मणति जनीं, **अनघ** असें नाम जाहलें त्याला ॥ ३१ ॥
जो चित्तास अगोचर, यास्तव करवे न चिंतन जयाचें ॥
ह्मणुनि कवि ह्मणति झालें, **अचिंत्य** हें नाम योग्यचि तयाचें ॥ ३२ ॥
जे वर्तती कुमार्गीं, त्यांस अभक्तांस जो भयचि करितो ॥
यास्तव मुनिह्मणती तो, **भयकृत्** हें नाम आपणा धरितो ॥ ३३ ॥
सन्मार्गानें वर्तति, जे त्यांच्या नाशितो समस्त भया ॥
यास्तव लोकीं झालें, **भयनाशन** नाम हें प्रसिद्ध तया ॥ ३४ ॥
सूक्ष्माहुनि सूक्ष्म असे, ब्रह्म ह्मणुनियां जया श्रुती गाती ॥
यास्तव वेदज्ञमुनी, **अणु** ऐसें नाम त्याजला देती ॥ ३५ ॥

---

१ कालीकरालीचमनोजवाचसुधूम्रवर्णाचसुलोहिताच स्फुलिंगिनीविश्वरुचीचदेवीलेला-यमानाइतिसप्तजिव्हाः २ जो सूर्यरूपानें.

मोठ्याहुनही मोठें, ब्रह्म असें ह्मणुनि वेद गाति जया ॥
ह्मणुनि श्रुतिज्ञ मुनिनीं, बृहत् असें नाम योजिलेंच तया ॥ ३६ ॥
अस्थूलत्वें[1] ज्याचा, द्रव्यत्वनिषेध[2] करिति वेदांती ॥
यास्तव तत्वज्ञ मुनी, कृश ऐसें नाम त्याजला देती ॥ ३७ ॥
कृश असतां आरोप, स्थूलत्वाचा जयावरी करिती ॥
सर्वात्मा ह्मणउनियां, स्थूल असें नाम त्यास मुनि देती ॥ ३८ ॥
सृष्टयाद्यर्थ जगाच्या, सत्वादि गुणांसि जो स्वयें वरितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, गुणभृत् हें नाम आपणा धरितो ॥ ३९ ॥
कार्यार्थ सगुण झाला, तरि परमार्थात[3] गुणरहित राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, निर्गुण हें नाम जाहलें आहे ॥ ४० ॥
ज्याला शुद्धहि बुद्धहि, सर्वगताहि सूक्ष्महीं असें गाती ॥
शब्दादिगुणरहितही, ह्मणुनि तयाला महान् असें ह्मणती ॥ ४१ ॥
हा धारक सर्वांचा, यास्तव कोणी नसे जया धरिलें ॥
ह्मणऊनि अधृत ऐसें, कवि ह्मणती नाम त्याजला झालें ॥ ४२ ॥
नाहीं धरिला कोणी, तो आपण आपणा स्वयें धरितो ॥
ह्मणुनि स्वधृत असें हें, कवि ह्मणती नाम आपणा वरितो ॥ ४३ ॥
पद्मोदरतुल्य दिसे, ज्यापासुनि निघाति वेदँ[4] निश्वास ॥
ऐसें शोभन ज्याचें, मुख ह्मणुनि स्वास्य नाम हें त्यास ॥ ४४ ॥
इतरा वंशां आधीं, वंश जयाचा प्रपंच हा झाला ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें प्राग्वंश नाम हें त्याला ॥ ४५ ॥

---

१ सूक्ष्मत्वामुळें २ ईश्वर द्रव्य नव्हे असा. ३ खरेपणानें. ४ वेदरूपश्वासोच्छास.

वंशप्रपंच अपुला, छेदवितो वा तयांस वाढवितो ॥
ह्मणऊनि **वंशवर्धन**, ऐसें हें नाम आपणा धरितो ॥ ४६ ॥
होउनि अनंतरूपी, भूमीचा भार मस्तकीं धरितो ॥
ह्मणऊनि **भारभृत** हें, कवि ह्मणती नाम आपणा वरितो ॥ ४७ ॥
देवांनीं वेदांनीं, परस्वरूपेंचि गाइला जातो ॥
यास्तव मुनि ह्मणति जनीं, **कथित** असें नाम आपणा घेतो ॥ ४८ ॥
मोठा योग जयाचा, किंवा योगेंचि जाणला जातो ॥
यास्तव **योगी** ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ४९ ॥
जो योग्यांचा राजा, योगापासुनि नव्हे कधीं भ्रष्ट ॥
यास्तव **योगीश** असें, नाम तया ठेविती महाशिष्ट ॥ ५० ॥
कर्मफळांचा दाता, ह्मणउनि देतो समस्त कामांतें ॥
यास्तवचि **सर्वकामद**, ऐसें हें नाम जाहलें त्यातें ॥ ५१ ॥
विश्रामस्थान तयां, जे संसाराटवीमधें भ्रमती ॥
यास्तव **आश्रम** ऐसें, नाम तया जाहलें सुकवि ह्मणती ॥ ५२ ॥
जे जे असति विरोधी, अविवेकी त्यांस ताप जो देतो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **श्रमण** असें नाम आपणा घेतो ॥ ५३ ॥
प्रळयीं समस्तही निज, शक्तीनें क्षीण जो प्रजा करितो ॥
यास्तव मुनि ह्मणती तो, **क्षाम** असें नाम आपणा धरितो ॥ ५४ ॥
ज्याला शोभन पर्णें, छंदोरूपेंच कल्पिलीं असती ॥
त्या संसारतरूला, **सुपर्ण** ऐसेंच साधुजन ह्मणती ॥ ५५ ॥

---

१ अथवा. २ प्रपंचास. ३ शेषरूपी. ४ परब्रह्मरूपानें. ५ महार्षि. ६ विश्रांतिस्थान ७ संसाररूप अरण्यांत. ८ द्वेषी. ९ लीन. १० वेदरूपें.

वायूला वाहवितो, वायू ज्याच्या भयेंचि वाहतसे ॥
ह्मणऊनि **वायुवाहन**, हें कवि ह्मणती तयास नाम असे ॥ ५६ ॥
रविवंशीं अवतरला, धरिता झाला करीं धनुष्याला ॥
श्रीमद्राम प्रभु जो, नाम **धनुर्धर** असें दिलें त्याला ॥ ५७ ॥
तोचि धनुर्वेदाचा, ज्ञाता दाशरथि राम ज्या ह्मणती ॥
मूर्त धनुर्वेदचि जो, ह्मणुनि **धनुर्वेद** नाम त्या देती ॥ ५८ ॥
विश्वांत दमनकर्ते, जे असती त्यांत दंड मी वदला[1] ॥
भगवान् स्वयें ह्मणुनियां, **दंड** असें नाम ठेविलें त्याला ॥ ५९ ॥
यम होऊनि प्रजांचें, वा नृप होऊन दमनें[2] जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, नाम **दमयिता** असें स्वयें धरितो ॥ ६० ॥
दंडापासुन जें फल, होतें त्यालाच दम[3] असें ह्मणती ॥
तो तद्रूपचि आहे, यास्तव **दम** हेंच नाम त्या देती ॥ ६१ ॥
जो सर्व शक्ति भगवान्, शत्रूंपासुनि पराजित[4] न झाला ॥
यास्तव सर्वज्ञ कवी, **अपराजित** नाम ठेविती त्याला ॥ ६२ ॥
जो शक्त सर्व कर्मीं, किंवा जो सर्व शत्रुतें सोहे[5] ॥
यास्तव **सर्वसह** असें, कविनीं त्या नाम ठेविलें आहे ॥ ६३ ॥
सर्वांस आपलाल्या, कर्त्यांत[6] स्थापितो व्यवस्थेनें ॥
यास्तव ह्मणती धरिलें, नाम **नियंता** असें स्वयें तेणें ॥ ६४ ॥
आहे सर्वनियंता, ह्मणुनि नसे नियम[7] अन्यकृत ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **अनियम** हें नाम जाहलें त्याला ॥ ६५ ॥

---

१ गीतेंत दंडोदमयितामस्मीति. २ शासन. ३ वासनाक्षय. ४ पराभूत. ५ सहन करितो. ६ कर्तव्य कर्मांत. ७ शास्त्रनियम.

यमशब्दानें मृत्यू, समजावा मृत्यु तो नसे ज्यास ॥
यास्तव साधुजनांनीं, **अयम** असें नाम ठेवलें त्यास ॥ ६६ ॥
जे योगांग नियम यम, ते भगवत्प्राप्ति साधनें असती ॥
ते भगवद्रूप ह्मणुनि, **नियमयम** असेंहि नाम त्या देती ॥ ६६ ॥
जें शौर्य वीर्य धैर्या,दिक सत्व जयांत तें प्रशस्त वसे ॥
यास्तवाचि **सत्ववान्** हें, कविजन ह्मणती तयास नाम असे ॥ ६७ ॥
ह्मणती ज्याचेठायीं, प्राधान्यें करुनि सत्व गुण राहे ॥
ह्मणऊनि **सात्विक** असें, त्या प्रभुला नाम जाहलें आहे ॥ ६८ ॥
संतांविषयीं ज्याच्या, ठायीं साधुत्व नित्य अचल वसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, कीं त्याला **सत्य** हेंच नाम असे ॥ ६९ ॥
सत्याविषयीं धर्मा,विषयीं जो नित्य तत्पराचि राहे ॥
ह्मणऊनि **सत्यधर्मप,रायण** हें नाम जाहलें आहे ॥ ७० ॥
सारें जग कल्पांतीं, अभिमुख होऊन ज्यामध्यें जातें ॥
यास्तव कवि ह्मणति **अभि, प्राय** असें नाम जाहलें त्यातें ॥ ७१ ॥
जें जें प्रियेतम वस्तू, त्या त्या वस्तूस योग्य तोचि असे ॥
ह्मणुनि **प्रियार्ह** ऐसें, नाम दिलें तें तयास योग्य दिसे ॥ ७२ ॥
आसनपाद्यार्घ्यादिक, पूजेला योग्य होउनी राहे ॥
यास्तव **अर्ह** असें हें, नाम तया ह्मणति जाहलें आहे ॥ ७३ ॥
जे आपणांस पुजिति, स्ताविती त्यांचें सदा प्रियचि करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **प्रियकृत्** हें नाम आपणा धरितो ॥ ७४ ॥
जो प्रीति आपणावर, भक्तांच्या मानसांत वाढवितो ॥

---

१ विशेषेंकरून. २ फारआवडतें.

तो प्रीतिवर्धन असें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ ७५ ॥
आकाशीं गति ज्याची, किंवा आकाश आश्रय जयाला ॥
आदित्यरूप यास्तव, विहायसगती असें ह्मणाति त्याला ॥ ७६ ॥
ज्योतिस्वरूप[1] केवळ, आहे जो कीं स्वतः प्रकाश असे ॥
त्याला मुनिजन ह्मणती, लोकांत ज्योति नाम योग्य दिसे ॥ ७७ ॥
शोभन दीप्ति जयाची, किंवा इच्छाहि शोभना ज्याची ॥
यास्तव ह्मणती आख्या, सुरुची ऐशीच जाहली त्याची ॥ ७८ ॥
देवांच्या उद्देशें, जें हुत त्यातें स्वयेंचि भोगितसे ॥
जो अग्निरूप यास्तव, हुतभुक् हें नाम त्यास योग्य दिसे ॥ ७९ ॥
त्रैलोक्याचा स्वामी, किंवा व्यापून सर्व जो राहे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, विभु ऐसें नाम जाहलें आहे ॥ ८० ॥
करितो सर्वरसांचें, पृथ्वीपासून नित्य आदान[2] ॥
आदित्याच्या रूपें, ह्मणुनि तया रवि असेंच अभिधान ॥ ८१ ॥
नाना विधवर्णांच्या[3], तेजांनीं जो जनांत शोभतसे ॥
वन्ह्यर्करूप[4] ह्मणउनि, नाम विरोचन असें तयास असे ॥ ८२ ॥
प्रसवे संपत्तीतें, वा[5] आकाशांत जो सदा भ्रमतो[6] ॥
यास्तव कवि ह्मणती तो, सूर्य असें नाम आपणा धरितो ॥ ८३ ॥
प्रसवे सर्व जगातें, यास्तव सविता असें तया नाम ॥
दिधलें आहे कविनीं, भक्तांचे पुरवितो सकल काम ॥ ८४ ॥

---

१ तेजोरूप.तेजोमय. २ ग्रहण. ३ रंगांच्या. ४ अग्नि सूर्यएतद्रूप. ५ अथवा. ६ फिरतो.

विश्वांत सर्व साक्षी, जो रवि तो होय लोचन जयाचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **रविलोचन** नाम जाहलें त्याचें ॥ ८५ ॥
सर्वगत नित्य अपरि,च्छिन्न असें वर्णितात वेद जया ॥
जो शेषरूप अथवा, यास्तव देती **अनंत** नाम तया ॥ ८६ ॥
याज्ञिक जें जें होमिति, घेतो तें हव्य अग्निरूपानें ॥
यास्तव **हुतभुक्** ऐसें, नाम पुन्हा ह्मणति घेतलें त्यानें ॥ ८७ ॥
भोगी निजमायेतें, किंवा पाळी समस्त विश्वातें ॥
यास्तव **भोक्ता** ऐसें, नाम पुन्हा जाहलें असे त्यातें ॥ ८८ ॥
भक्तांस मोक्षलक्षण, सुख देतो खंडितो अभक्तांचें ॥
सुख यास्तव **सुखद** असें, नाम तया जाहलें असे साचें ॥ ८९ ॥
धर्मातें रक्षाया, जो वारंवार देहधर झाला ॥
यास्तव **नैकज** ऐसें, नाम कवी ह्मणति जाहलें त्याला ॥ ९० ॥
ह्मणतात अग्रभागीं, जो होय हिरण्यगर्भरूपानें ॥
यास्तव **अग्रज** ऐसें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ९१ ॥
जो पूर्ण काम यास्तव, अप्राप्तीचा नसेच खेद जया ॥
ह्मणुनि **अनिर्विण्ण** असें, मुनि ह्मणती नाम जाहलेंच तया ॥ ९२ ॥
किंवा समस्त कार्यां, विषयीं ज्याचा प्रयत्न शिथिल नसे ॥
उद्योगी उत्साही, ह्मणुनि **अनिर्विण्ण** नाम त्यास असे ॥ ९२ ॥
साधूंच्या कृत्यांचें, अभिमुख होऊनि जो सहन करितो ॥
ह्मणऊनि **सदामर्षी**, ऐसें तो नाम आपणा धरितो ॥ ९३ ॥

---

१ नेत्र. २ सर्वव्यापक. ३ अविनाश. ४ प्रमाणरहित. ५ यज्ञकर्ते६ होमद्रव्य. ७ अनुभवितो. ८ देह धारण करणारा. ९ सृष्टीच्या आरंभीं. १०ब्रह्मदेवाच्या रूपानें.

असुनि निराधार सदा, झाला आधार जो त्रिलोकाला ॥
ब्रह्मचि साक्षात् ह्मणउनि, लोकाधिष्ठान नाम हें त्याला ॥ ९४ ॥
ज्याचें स्वरूप शक्ति, व्यापारहि सर्व अद्भुतचि असती ॥
सर्वाश्चर्यमय ह्मणुनि, अद्भुत ऐसें कवी तया ह्मणती ॥ ९५ ॥
अर्थ सनात्‌शब्दाचा, चिरकाल असाच होतसे ह्मणती ॥
तो[1] ब्रह्मरूप ह्मणउनि, नाम सनात् हेंच त्यास कवि देती ॥ ९६ ॥
ब्रह्मादि जे सनातन[2], त्यांत सनातन असे अतिशयें जो ॥
ह्मणऊनियां सनातन, तम ऐसें नाम त्याजला साजो ॥ ९७ ॥
वडवाग्नीचा आहे, वर्ण कपिल वर्णिती असें ज्ञानी ॥
तो भगवद्रूप ह्मणुनि, ठेवियलें कपिल नाम सुज्ञांनीं ॥ ९८ ॥
पीतो जल रश्मींनीं, रविरूपानें असें ह्मणति ज्याला ॥
किंवा वराहरूपी, यास्तव कपि नाम जाहलें त्याला ॥ ९९ ॥
प्रलयीं ज्याचेठायीं, सर्व जगें पावतात विलयातें ॥
यास्तव अप्यय ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्यातें ॥ १०० ॥

नवम शतकसमाप्त. एकंदर आर्या ॥ १०७ ॥

---

१ चिरकाल, ब्रह्म अनादिचिरकालिक आहे इत्यर्थः २ पुरातन.

भक्तां मंगल देतो, कीं तो आहेच मंगलस्थान ॥
यास्तव कविजन देती, **स्वस्तिद** ऐसें तयास अभिधान ॥ १ ॥
करितो मंगल संतां, दुष्टांच्या मंगलास खंडितसे ॥
ह्मणुनि **स्वस्तिकृत्** असें, कविजन ह्मणती तयास नाम असे ॥ २ ॥
आनंदलक्षण परम, मंगल आहे स्वरूप आत्म्याचें ॥
यास्तव साधुजनांनीं, **स्वस्ति** असें नाम ठेविलें त्याचें ॥ ३ ॥
भोगी स्वमंगलातें, भक्तांच्या मंगलास पाळितसे ॥
कविजन ह्मणती यास्तव, नाम तया **स्वस्तिभुक्** असेंच असे ॥ ४ ॥
वाढे मंगलरूपें, मंगल द्यायास जो समर्थ असे ॥
तो **स्वस्तिदक्षिण** असें, नाम धरी तें तयास योग्य दिसे ॥ ५ ॥
किंवा स्मृतिमात्रें जो, मंगल भक्तांस शीघ्रतर देतो ॥
तो **स्वस्तिदक्षिण** असें, नाम कवी ह्मणति आपणा घेतो ॥ ५ ॥
ज्याचें कर्म भयानक, नाहीं न द्वेष रागही ज्याला ॥
जोपूर्णकाम ह्मणउनि, **अरौद्र** हें नाम जाहलें त्याला ॥ ६ ॥
आहेत सांख्ययोगा, त्मक मकराकार कुंडलें ज्याला ॥
अथवा अहीनरूपी[१], ह्मणुनि असे नाम **कुंडली** त्याला ॥ ७ ॥
हस्तांत मनस्तत्वा,त्मक चक्र सुदर्शनाख्य जो धरितो ॥
रक्षार्थ समस्तांच्या, तो **चक्री** नाम आपणा वरितो ॥ ८ ॥
पादक्रमण जयाचें, शौर्य जयाचें विलक्षणचि राहे ॥
यास्तव कवि ह्मणति पुन्हा, अभिधान तयास **विक्रमी** आहे ॥ ९ ॥
ज्याच्या मोठ्या आज्ञा, श्रुति[२] स्मृति अलंघ्य ज्या जना असती ॥
यास्तव **ऊर्जितशासन**, ऐसें लोकीं तयास कवि ह्मणती ॥ १० ॥

---

१ शेषवासुकीरूप कुंडलें. २ वेदशास्त्ररूप.

शब्दास विषय नोहे, जो शब्दाला अतिक्रमुनि राहे ॥
यास्तव नाम तयाला, **शब्दातिग**, योग्य जाहलें आहे ॥ ११ ॥
असतां अशब्द सारे[1], तात्पर्यें वर्णितात वेद जया ॥
यास्तव कविनीं दिधलें, **शब्दसह** असेंच योग्य नाम तया ॥ १२ ॥
तापत्रयतप्तांला, विश्रामाचें[2] सुशीतल स्थान ॥
जो होय ह्मणुनि झालें, कवि ह्मणती **शिशिर** हेंच अभिधान[3] ॥ १३ ॥
संसाऱ्याला आत्मा, ज्ञान्या संसार शर्वरी[4] करितो ॥
ह्मणऊनि **शर्वरीकर**, हें तो अभिधान[5] आपणा धरितो ॥ १४ ॥
नाहीं क्रूरत्व जया, कीं[6] कोप नसे अवाप्तकामाला[7] ॥
यास्तव कविजन ह्मणती, झालें **अक्रूर** नाम हें त्याला ॥ १५ ॥
कर्में मनें शरीरें, वाचेनें नित्य शोभनचि राहे ॥
यास्तव ह्मणाति तयाला, **पेशल** हें नाम जाहलें आहे ॥ १६ ॥
आहे सुशीघ्रकारी, प्रवृद्ध शक्तहि समस्तकर्मीं जो ॥
यास्तव कविजन ह्मणती, **दक्ष** असें नाम त्याजला साजो ॥ १७ ॥
दक्षिण ह्मणजे दक्षचि[8], किंवा सर्वत्र गति असे ज्याची ॥
भूतांतें संहारी, **दक्षिण** आख्या असे ह्मणुनि त्याची ॥ १८ ॥
आहेत जे क्षमावान्, किंवा भूम्यादिभारधारक जे ॥
त्यांत श्रेष्ठ ह्मणुनियां, **क्षमिणांवर** नाम हें तया साजे ॥ १९ ॥
विश्वामध्यें जे जे, क्षमीं क्षमावंत वर्णिले असती ॥
त्यांत श्रेष्ठ ह्मणउनी, **क्षमिणांवर** नाम हें तया देती ॥ १९ ॥

---

१ वेद किंवा मुनि. २ विश्रांतीचें. ३ नाम. ४ रात्रितुल्या अविज्ञात. ५ नाम. ६ किंवा. ७ पूर्णकामाला. ८ कुशल किंवा समर्थ.

ह्मणती ज्याचेठायीं, निरतिशय ज्ञान सर्वदा राहे ॥
यास्तव विद्वत्तम हें, नाम तया ह्मणति जाहलें आहे ॥ २० ॥
जो नित्यमुक्त ह्मणउनि, सांसारिक भय कधीं नसे ज्याला ॥
यास्तव वीतभय असें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ २१ ॥
वर्णिति वेदपुराणें, पुण्यकर श्रवण कीर्तन जयाचें ॥
झालें नाम सुकविला, मत पुण्यश्रवणकिर्त्तन तयाचें ॥ २२ ॥
जो संसारसमुद्रापासुन जीवांस तारितो ज्ञानें ॥
यास्तव उत्तारण हें, नाम कवी ह्मणति घेतलें त्यानें ॥ २३ ॥
दुष्कर्मीचा किंवा, दुष्कर्म्यांचा विनाश जो करितो ॥
यास्तव कविजन ह्मणती, दुष्कृतिहा हेंच नाम तो धरितो ॥ २४ ॥
स्मरणस्तवनादिक जे, कारिति तयां पुण्य जो स्वयें देतो ॥
पुण्यात्मा यास्तव तो, पुण्य असें नाम आपणा घेतो ॥ २५ ॥
ध्यातां स्तवितां दुष्ट, स्वप्नांचा नाश कीर्त्तितां करितो ॥
दुस्वप्ननाशन असें, ह्मणउनि तो नाम आपणा धरितो ॥ २६ ॥
जीवांच्या गति विविधा, खुंटवितो मुक्तिच्या प्रदानानें ॥
ह्मणउनि वीरहा हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ २७ ॥
सत्वगुणांगीकारें, त्रिजगाच्या रक्षणास जो करितो ॥
ह्मणउनि रक्षण ऐसें, कवि ह्मणती नाम आपणा धरितो ॥ २८ ॥
सन्मार्गानें वर्तति, संत ह्मणुनि संत आपणचि झाला ॥
वृद्ध्यर्थ सद्गुणांच्या, ह्मणुनि असे संत नाम हें त्याला ॥ २९ ॥

---

१ अत्यंत. २ संसारसंबंधी. ३ ज्ञानोपदेशानें. ४ दुष्कर्म कर्त्यांचा. ५ सत्वगुणाचा अंगीकार करून.

वृद्ध्यर्थ सद्गुणांच्या, सन्मार्गानेंचि संत वर्तति जे ॥
तद्रूप हा ह्मणुनियां, संत असें नाम त्याजला साजे ॥ २९ ॥
सर्वांही जीवातें, प्राणांच्या[1] जीवेवी स्वरूपानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **जीवन** हें नाम घेतलें त्यानें ॥ ३० ॥
वेढूनि सर्वभागीं, विश्वाला व्यापुनीच जो राहे ॥
ह्मणऊनि **पर्यवस्थित**, हें नाम तयास जाहलें आहे ॥ ३१ ॥
राहे अनंतरूपें, किंवा विश्वप्रपंचरूपानें ॥
ह्मणउनियां आदरिलें, अभिधान **अनंतरूप** हें त्यानें ॥ ३२ ॥
ज्याची अपरिमिता[3] श्री, किंवा शक्ती असे असें ह्मणती॥
ह्मणऊनि **अनंतश्री**, ऐसें अभिधान त्यास मुनि देती ॥ ३३ ॥
दुर्वार जनाला जो तो मन्यु क्रोध जिंकला जेणें ॥
यास्तव **जितमन्यु**, असें कवि ह्मणती नाम घेतलें तेणें ॥ ३४ ॥
संसाररूप मोठें, जें भय त्याचा विनाश जो करितो ॥
यास्तव **भयापह** असें, तो भगवान् नाम आपणा धरितो ॥ ३५ ॥
न्याय[4]समेत चतुर जो कीं[5] तो कर्मानुरूप फल देतो ॥
यास्तव **चतुरस्र** असें, कवि ह्मणती नाम आपणा घेतो ॥ ३६ ॥
दुर्योधन दुःशासन, कर्ण शकुनि या खळांस चवघांस ॥
जो रडवी[6] यास्तव कवि, **चतुरस्राचें** नाम ठेविती त्यास ॥ ३६ ॥
गंभीर रूप ज्याचें, किंवा गंभीर चित्तही ज्याचें ॥
ह्मणऊनि **गभीरात्मा**, ऐसें हें नाम जाहलें त्याचें ॥ ३७ ॥

---

१ प्राणांच्या स्वरूपानें. २वांचवितो. ३ अगणित. ४ न्याययुक्त असून चतुर ५कारण कीं. ६ द्रौपदीला गांजल्यामुळें.

देतो विविध फलांतें, अधिकाऱ्यालाच जो विशेषानें ॥
यास्तव कविजन ह्मणती, विदिश असें नाम घेतलें त्यानें ॥ ३८ ॥
इंद्रादिकांस करितो, किंवा जो त्यांकडून[1] करवीतो ॥
आज्ञा विविधा ह्मणुनि, **व्यादिश** हें नाम आपणा घेतो ॥ ३९ ॥
जीं जीं कर्में करिती, त्यांचीं देतो फलें समस्तांला ॥
जो वेदात्मा ह्मणउनि, दिश ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ४० ॥
सर्वांला कारण हा, ह्मणुनि नसे आदिकारण जयाला ॥
यास्तव **अनादि** ऐसें, कवि ह्मणती नाम जाहलें त्याला ॥ ४१ ॥
भूरूपें जो सकला, लोकां आधार होउनी राहे ॥
यास्तव कविजन ह्मणती, भू ऐसें नाम त्याजला आहे ॥ ४२ ॥
भूरूपें राहुनिही, शोभा जो भूमिची स्वयें झाला ॥
यास्तवचि **भुवोलक्ष्मी**, ऐसें अभिधान जाहलें त्याला ॥ ४३ ॥
शोभन विविध गति जया, किंवा तैसेंच ईरेंण जयाचें ॥
शोभन वीर जयाचे, वा[4] ह्मणुनि **सुवीर** नाम हें त्याचें ॥ ४४ ॥
कल्याणप्रद शोभन, हीं असतीं बाहुभूषणें ज्याला ॥
यास्तव कविजन ह्मणती, **रुचिरांगद** नाम जाहलें त्याला ॥ ४५ ॥
जंतूंना उपजवितो, वा[4] प्रद्युम्नादिकांस[5] जन्मावितो[6] ॥
यास्तव कवि ह्मणति जनीं, **जनन** असें नाम आपणा धरितो ॥ ४६ ॥
जे जन्मवंत त्यांच्या, जन्माचें आदिकारण असे जो ॥
यास्तव कवि ह्मणती **जन,जन्मादि** असेंच नाम त्या साजो ॥ ४७ ॥

---

१ इंद्रादिकांकडून. २ प्रेरणा. ३ अथवा. ४ अथवा. ५ प्रद्युम्न सांब इत्यादि पुत्रांस. ६ उत्पन्न करितो.

आहे भयंकर खरा, किंवा भयहेतु जो समस्तांला ॥
यास्तव कविजन ह्मणती, भीम असें नाम जाहलें त्याला ॥ ४८ ॥
असुरादिकांस भीति, प्रद ऐशा जो पराक्रमा करितो ॥
यास्तव भीमपराक्रम, एसें तो नाम आपणा धरितो ॥ ४९ ॥
भूम्याद्याधारांचा, आहे आधारभूत जो धार्मे ॥
यास्तव कवि ह्मणति तया, झालें आधारनिलय हें नाम ॥ ५० ॥
नाहीं धारक ज्याहुनि, दुसरा त्या नाम यास्तव अधाता ॥
किंवा प्रळयीं सारें, जग पीतो ह्मणुनि नाम त्या धाता ॥ ५१ ॥
पुष्याचा हा[२]स तसा, प्रपंचरूपें विकास पावतसे ॥
जो परमात्मा त्याला, ह्मणती हें पुष्पहास नाम असे ॥ ५२ ॥
पुष्पापरि आल्हादक, हास्य निजजनास सर्वदा ज्याचें ॥
ह्मणउनि झालें आहे, नाम जनीं पुष्पहास हें त्याचें ॥ ५२ ॥
नित्यप्रबुद्ध ह्मणुनि, प्रकृष्ट जागर करी असें ह्मणती ॥
यास्तव तया प्रजागर, ऐसें हें नाम साधुजन देती ॥ ५३ ॥
सर्वांही लोकांच्या,* वरच्या स्थानास गमन जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, ऊर्ध्वग हें नाम आपणा धरितो ॥ ५४ ॥
लोकांस दाखवाया, सन्मार्गातें करी सदाचार ॥
यास्तव दिधलें आहे, नाम तयालागिं सत्पथाचार ॥ ५५ ॥
जो मृ[३]त प[४]रीक्षितादिक, त्यांतें जो जीववी स्वशक्तीनें ॥
यास्तव कविजन ह्मणती, प्राणद हें नाम घेतलें त्यानें ॥ ५६ ॥
परमात्म्याचा वाचक, ओंकार तयासचि प्रणव ह्मणती ॥
तो तद्रूपचि ह्मणुनि, प्रणव असें नाम त्यास मुनि देती ॥ ५७ ॥

---

१ स्थान आधार असून स्थान. २ विकास. ३ मेलेला. ४ परीक्षितराजा इत्यादि.
* भूर्भुवादि लोकांच्या.

घेऊनि पुण्यकर्में, पर्णरूपें[१] तत्फलांसि जो देतो ॥
अधिकाऱ्याला ह्मणउनि, **पण** ऐसें नाम आपणा घेतो ॥ ५८ ॥
विश्वांत नामरूपा, त्मक जो व्यवहार त्यास जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, **पण** ऐसें नाम आपणा धरितो ॥ ५८ ॥
संवित्[२] रूपी यास्तव, सर्वांलाही प्रमाण जो झाला ॥
ह्मणउनि वेदज्ञांनीं, **प्रमाण** हें नाम ठेविलें त्याला ॥ ५९ ॥
प्राणांचा लय होतो, ज्याचे ठायीं असें श्रुती गाती ॥
ह्मणुनि **प्राणनिलय** हें, नाम तयाला श्रुतिज्ञ कवि देती ॥ ६० ॥
प्राण्यांच्या प्राणांचें, पोषण अन्नादिकेंचि जो करितो ॥
यास्तव कवि ह्मणती तो, अभिधान **प्राणभृत्** असें धरितो ॥ ६१ ॥
प्राणापानादि पवन[३], रूपें प्राण्यांस नित्य वांचवितो ॥
यास्तव कवि ह्मणती **प्राणजीवन** असेंच नाम तो धरितो ॥ ६२ ॥
ऋत सत्य तत्व ऐशीं, नामें हीं ब्रह्मवाचकें असती ॥
यास्तव **तत्व** असें हें, नाम ब्रह्मज्ञ त्याजला देती ॥ ६३ ॥
आपुलिया रूपातें, याथातथ्यें करून जो जाणे ॥
यावरुनि **तत्ववित्** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्याणें ॥ ६४ ॥
आहे एकचि आत्मा, राहे सर्वत्र एकरूपानें ॥
यास्तव **एकात्मा** हें, कवि ह्मणती नाम घेतलें त्यानें ॥ ६५ ॥
जन्मादि[४] षड्विकारां, प्रति उल्लंघूनि जो सदा राहे ॥
जन्मासहमृत्युजरातिग ऐसें नाम त्या ह्मणुनि आहे ॥ ६६ ॥

---

१ व्यवहाररूपानें. २ ज्ञानरूपी. ३ प्राणापानादि वायुरूपानें. ४ जन्म, वृद्धि क्षय इत्यादि. ५ जमन्मृत्यु जरातिग एवढेंच नाम.

भूरादिव्याहृतिच्या, कर्मांनीं जो जगास तारितसे ॥
ह्मणऊनि भूर्भुस्व,स्तरु ऐसें ह्मणति नाम त्यास असे ॥ ६७ ॥
भूरादि सर्वलोका,त्मक हा संसार वृक्ष ज्या ह्मणती ॥
ह्मणऊनि भूर्भुवस्व,स्तरु ऐसें नाम साधु त्या देती ॥ ६७ ॥
किंवा जगत्रयातें, वृक्ष तसा व्यापुनी सदा राहे ॥
ह्मणऊनि भूर्भुवस्व,स्तरु ऐसें नाम त्याजला आहे ॥ ६७ ॥
जो संसारसमुद्रा, पासुनियां तारितो स्वभक्तांला ॥
ॐ प्रणवरूप आहे, याजमुळें तार नाम हें त्याला ॥ ६८ ॥
ज्याला सर्वजनाचा, जनकचि जनकासमानहीं ह्मणती ॥
यास्तव तत्वज्ञ मुनी, सपिता हें नाम त्याजला देती ॥ ६९ ॥
ह्मणति विधीस पितामह, त्याचाही जो पिता स्वयें झाला ॥
यास्तव कवि ह्मणति जगीं, प्रपितामह नाम जाहलें त्याला ॥ ७० ॥
जो यज्ञात्मा आहे, किंवा करितात यजन मुनि ज्याचें ॥
यास्तव मुनिजन ह्मणती, यज्ञ असें नाम जाहलें त्याचें ॥ ७१ ॥
जो यज्ञांचा पालक, किंवा स्वामी असे असें ह्मणती ॥
यास्तव यज्ञपति असें, नाम तयातें श्रुतिज्ञजन देती ॥ ७२ ॥
यजन कराया यज्ञीं, आपण यजमान होउनी राहे ॥
यास्तव यज्वा ऐसें, अभिधान तयास जाहलें आहे ॥ ७३ ॥
यज्ञाचीं जीं अंगें, त्या अंगांनींच सिद्ध जो झाला ॥
तो यज्ञवराह ह्मणुनि, दिधलें यज्ञांग नाम हें त्याला ॥ ७४ ॥

---

१ भूः भुवः सुवः या मंत्राच्या २ हवनादि कर्मांनीं. ३ अथवा. ४ पिता. ५ ब्रह्मदेवास. ६ नाम.

किंवा यजनाचि[1] ज्याच्या, प्राप्तीस उपाय साधुजन वदती ॥
यास्तव **यज्ञांग** असें, नाम तयालागिं भक्तजन देती ॥ ७४ ॥
फलहेतुभूतयज्ञा[2], प्रति वाहे ह्मणुनि **यज्ञवाहन** तो ॥
किंवा यज्ञाचि ज्याचा, प्रापक ह्मणऊनि नाम तें घेतो ॥ ७५ ॥
जो यज्ञाचें धारण, किंवा पालन जगीं स्वयें करितो ॥
तो ह्मणुनि **यज्ञभृत्** हें, नाम कवी ह्मणति आपणा धरितो ॥ ७६ ॥
जगदारंभीं करितो, क्षयकाळीं नाशितो च यज्ञातें ॥
यास्तव झालें आहे, कवि ह्मणती नाम **यज्ञकृत्** त्यातें ॥ ७७ ॥
ज्याला आराधाया, यज्ञ जगीं अंगभूत[3] बहु असती ॥
यज्ञप्रधान ह्मणउनि, **यज्ञी** ऐसें तयास मुनि ह्मणती ॥ ७८ ॥
इंद्रादिदेवतांच्या, रूपानें भोगितो स्वयज्ञातें ॥
ह्मणऊनि **यज्ञभुक्** हें, कवि ह्मणती नाम ठेविलें त्यातें ॥ ७९ ॥
यज्ञेंचि साध्य होतो, किंवा जो साधितोचि यज्ञातें ॥
ह्मणऊनि **यज्ञसाधन,** हें मुनिनीं नाम ठेविलें त्यातें ॥ ८० ॥
फलदानानें किंवा, पूर्णाहुतिनें समाप्ति यज्ञाची ॥
करितो यास्तव आख्या, झाली **यज्ञांतकृत्** अशी त्याची ॥ ८१ ॥
निष्कामत्वहि तत्व, ज्ञानहि जें तेंच गुह्य यज्ञाचें ॥
तें भगवद्रूप ह्मणुनि, नाम असे **यज्ञगुह्य** हें त्याचें ॥ ८२ ॥
ज्याला भूतें खाती, खातो प्रळयांत सर्व भूतांतें ॥
ह्मणऊनि **अन्न** ऐसें, साधूंनीं नाम ठेविलें त्यातें ॥ ८३ ॥

---

१ यज्ञादिकर्म. २ उत्तमफलाच्याप्राप्तीस कारण भूत जो यज्ञ त्यातें. ३ प्रधान यज्ञाचे अंभूगत यज्ञ.

अन्नातें जें खातें, तें जग सारेंच रूप विष्णूचें ॥
यास्तव **अन्नाद** असें, कविनीं अभिधन ठेविलें त्याचें ॥ ८४ ॥
आपणचि आपणाला, हेतु उपादान ज्यास अन्य नसे ॥
यास्तव कविजन ह्मणती, त्याला अभिधान **आत्मयोनि** असे ॥ ८५ ॥
आपणचि आपणा जो, निमित्तकारण असेंच वदतात ॥
यास्तव कविजन ह्मणती, नाम तया जाहलें **स्वयंजात** ॥ ८६ ॥
भूमि खणुनि पाताळीं, वराहरूपें हिरण्यनेत्राला ॥
जो मारी ह्मणउनियां, झालें **वैखान** नाम हें त्याला ॥ ८७ ॥
सामें गाति जयाला, किंवा सामें स्वयेंहि जो गातो ॥
ह्मणऊनि **सामगायन**, ऐसें तो नाम आपणा घेतो ॥ ८८ ॥
याया पुत्रसुख तिला, देवकिचा नंदन स्वयें झाला ॥
ह्मणऊनि **देवकीनंदन** ऐसें नाम जाहलें त्याला ॥ ८९ ॥
करि जो सर्जन सर्वा, भूतांचें कीं समस्त लोकांचें ॥
यास्तव कविजन ह्मणती, **स्रष्टा** हें नाम जाहलें त्याचें ॥ ९० ॥
पृथ्वीचा ईश्वर जो, झाला दाशरथिरामरूपानें ॥
यास्तव कवि ह्मणति जगीं, **क्षितीश** हें नाम घेतलें त्यानें ॥ ९१ ॥
ध्यातां स्तवितां पुजितां, स्मरतां जो पापराशि नाशितसे ॥
ह्मणऊनि **पापनाशन**, कवि ह्मणती नाम हें तयास असे ॥ ९२ ॥
शंख अहंकारात्मक, धरि करिं ज्यों पांचजन्य नाम असे ॥
ह्मणऊनि **शंखभृत्** हें, नाम तया साधु ह्मणति योग्य दिसे ॥ ९३ ॥

---

१ नाम. २ उपादानकारण. ३ हिरण्याक्ष दैत्याला. ४ उत्पत्ति. ५ ज्या शंखास. तत्व तद्रूप.

नंदकनामा विद्या, मय खड्ग करांत जो धरी नित्य ॥
त्याला नाम कविमतें, झालें लोकांत **नंदकी** सत्य ॥ ९४ ॥
चक्र मनंस्तत्वात्मक, सुदर्शनाह्वय धरी करीं जो कीं ॥
यास्तव कवि ह्मणति तया, **चक्री** हें नाम जाहलें लोकीं ॥ ९५ ॥
राहे शार्ङ्ग धनु जया, पार्शी जें इंद्रियाँद्यहंकार ॥
ह्मणऊनि **शार्ङ्गधन्वा**, नाम तया सर्वदा नमस्कार ॥ ९६ ॥
हस्तांत बुंद्धितत्वा, त्मिक जो कौमोदकी गदा धरितो ॥
ह्मणऊनि आपणाला, नाम **गदाधर** असेंचि तो वरितो ॥ ९७ ॥
भीष्मातें माराया, जो घे हस्तांत चाकचि रथाचें ॥
यास्तव नाम तयाचें, लोकांत **रथांगपाणि** हें साचें ॥ ९८ ॥
ज्याला न दुष्टशत्रू, चेष्टांहीं क्षोभवाँवया शकती ॥
कीं तो गंभीरात्मा, यास्तव **अक्षोभ्य** नाम त्या देती ॥ ९९ ॥
जीं जीं हाणायाचीं, तीं असती सर्व आयुधें ज्याला ॥
ह्मणउनि **सर्वप्रहरण,आयुध** हें नाम जाहलें त्याला ॥ १००० ॥

॥ दशम शतक समाप्त ॥ एकंदर आर्या १०९.

---

१ मनोरूप तत्वतद्रूप. २ सुदर्शन नामक. ३ इंद्रियादिकांचा जो अहंकार तद्रूप. ४ बुद्धिरूप तत्व तत्स्वरूप. ५ दुष्टव्यापारांनीं. ६ चलित करावयास. ७ सर्वप्रहरणायुध एवढें नाम जाणावें.

॥ सहस्रनाम आर्या समाप्त ॥

ऐसें हें कीर्त्तनीयाचें केशवाचें महात्मिया ॥ सहस्र दिव्यनामांचें पूर्ण म्यां कथिलें तुला ॥ १॥
यातें जो कीर्त्तीतो नित्य किंवा आयिकतो नर ॥ न पावे अशुभातें तो या लोकीं परलोकिंहि ॥२॥
विप्र होतो ब्रह्मवेत्ता विजयी क्षत्र होतसे ॥ संपन्न होतसे वैश्य शूद्राहि सुख पावतो ॥ ३ ॥
धर्मार्थी पावतो धर्मा अर्थार्थी अर्थ पावतो ॥ कामार्थी पावतो कामा संतानार्थी सुसंतती ॥ ४ ॥
जो भक्तिमान् शुची नित्योद्योगी एकाग्रमानस ॥ सहस्र वासुदेवाच्या नामाचें हें पढे सदा ॥ ५ ॥
पावतो यश तो फार ज्ञातिप्राधान्य पावतो ॥ पावतो अचलश्रीतें तैसें श्रेयहि उत्तम ॥ ६ ॥
न पावे भय कोठेंही वीर्य तेजहि पावतो ॥ अरोगी कांतिमान् होतो बलरूपगुणान्वित ॥ ७ ॥
रोगार्ता सोडिती रोग बद्धा सोडिति बंधनें ॥ भयेंहि सोडिती भीता आपन्ना सोडि आपदा ॥ ८ ॥
जो या नामसहस्रानें विष्णूला भक्तिपूर्वक ॥ स्तवितो नर तो शीघ्र तरतो दुःखसागरा ॥ ९ ॥
जो वासुदेवाश्रित जो वासुदेवपरायण ॥ तो पापमुक्त होवोनी जातो ब्रह्मपदाप्रति ॥ १० ॥
जे भक्त वासुदेवाचे त्यांचें अशुभ जातसे ॥ जन्म मृत्यु जरा व्याधि यांचें ही भय त्यां नसे ॥११॥
जो या स्तवातें पढतो श्रद्धाभक्ति धरोनि तो ॥ जोडिजेतो सुखक्षांतिश्रीधृतिस्मृतिकीर्त्तिनीं ॥१२॥
पुरुषोत्तमभक्तीनें भक्त जे पुण्य जोडिती ॥ त्यांला न स्पर्शती लोभ क्रोध मात्सर्य दुर्मती ॥ १३ ॥
दिशा चंद्रार्क नक्षत्रें स्वर्ग भूमि समुद्र ही ॥ महात्म्या वासुदेवाच्या सामर्थ्यानेंच राहिलीं ॥ १४ ॥
हें सुरासुरगंधर्वयक्षोरगसमन्वित ॥ चराचर जगत् सर्व विष्णूच्याचि वशीं असे ॥ १५ ॥
इंद्रियें मन बुद्धीही सत्व तेज धृती बल ॥ वासुदेवात्मकाचि हीं क्षेत्रक्षेत्रज्ञ ही तसा ॥ १६ ॥
श्रुतिस्मृतिपुराणांचें सार आचार बोलती ॥ आचार पहिला धर्म धर्मांचा प्रभु अच्युत ॥ १७ ॥
ऋषी पितरही देव भूतें पांचाहि धातुही ॥ जंगमाजंगम जग आहे नारायणोद्भव ॥ १८ ॥
योग ज्ञान तसें सांख्य विद्या शिल्पादि ज्या कला ॥ वेदशास्त्रें सुविज्ञान ह्यांचा कर्त्ता जनार्दन ॥१९॥
एक विष्णू महाभूत अन्य भूतें अनेकशा ॥ व्यापून तीन लोकांला भोगी अव्यय विश्वभुक् ॥२०॥
भगवद्विष्णुचा जो हा व्यासानें कीर्तिला स्तव ॥ त्यातें पढो तो पुरुष इच्छी श्रेयः सुखास जो ॥२१॥
जगदुत्पत्तिसंहारकर्त्ता जो परमेश्वर ॥ त्याला भजति भावें ते न पावति पराभव ॥ २२ ॥

समाप्त.

श्रीमद्व्यासें कथिलीं श्रीविष्णूचीं सहस्र जीं नामें ॥ आर्याछंदें त्यांचा लिहिला म्यां अर्थ तद्व्जनकामें॥१॥
आर्यांस तोषवाया आर्याछंदांत लिहविला अर्थ ॥ हरिनें निजनामांचा बघतां देईल सत्य परमार्थ ॥ २ ॥
भवसागर उतराया दैवें हा दाविला नवा सेतू ॥ याच्या अवलंबानें होईल मुमुक्षुचा सफल हेतू ॥ ३ ॥
व्यासोक्त महाभारत त्यामध्यें शांतिपर्व हें सार ॥ त्यामाजि दानधर्मचि नामसहस्रचि तयामधें थोर ॥ ४॥

श्लोक

व्याख्या सहस्रनामाची नारायण सुतें भलीं ॥
करूनि देशभाषेनें हरिपादीं समर्पिली ॥ ५ ॥

आर्या

हरिकीर्ति ग्रंथ ललित रचिला भावें करूनि आर्यांहीं ॥
करुणा करुनि सकृत्तरि वाचावा हा समूळ आर्यांहीं ॥

ग्रंथसंख्या.

२१ उपोद्घात. १०७९ सहस्रनामाच्या आर्या.
२७ उपसंहार. एकंदर कविता वृत्तें ११२७

पुढील अनुक्रम नामावलीची सूचना.

विष्णुसहस्रनाम स्तोत्राचे मूळचे श्लोक १०७ आहेत त्यांतील सहस्रसंख्य नामें वर्णक्रमानें पुढें लिहिलीं आहेत. प्रत्येक नाम कितव्या श्लोकांत आहे हें समजण्याकरितां श्लोकाचा अंक नामाच्या डाव्याबाजूस किंवा मागें लिहिला आहे. आणि सहस्रसंख्य नामांतील अमुक नाम कितवें आहे हें समजण्याकरितां अनुक्रमाचा अंक नामाच्या उजव्या बाजूस किंवा पुढें घातला आहे. या अनुक्रमांकाचा आणखी उपयोग असा होईल कीं, प्रत्येक नाम कोणत्या शतकांत कितवें आहे हें व्याख्या ग्रंथांत सहज काढून पाहतां येईल.

वर्णानुक्रमानें नामें लिहिल्यापासून हें कळोन येईल कीं, सहस्रनामांतील किती एक नामें पुनः पुन्हा येतात तीं कोणतीं कितीदा आलीं आहेत.

श्रीविष्णुसहस्रनामांची वर्णानुक्रमनामावली.

कितीएक नामांवर एकीहून अधिक आर्या झाल्या आहेत त्या.

शतक १	शतक २	शतक ३	शतक ४	शतक ५	शतक ६	शतक ७	शतक ८	शतक ९	शतक १०	
१	१	१९	१५	५	१४	३	७	८०	५	
३	६	२८	३१	७	२१	७	४७	१३	१९	
५	८०	३४	३२	१५	३६	५४	६०	२२	२९	
३९	८७	३४	३२	१५	४४	९१	६२	२३	३६	
४५	९४	४५	४९	२२	५७		६४	२९	५२	
५७		४२	५७	३१	६१		६९	६६	५८	
		७३	५९	३२	९१		१००	९२	६७	
		७२	८५	३४	९६				६७	
		९३		३५					७४	
				४१						
				५६						
				५६						
				६७						
				६८						
				८५						
				८५						
६	५	९	८	१६	८	४	७	७	९	७९